सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. ०९ मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ३७ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## भारताच्या एअर डिफेन्स सिस्टीममुळे पाकिस्तानी हल्ला निष्क्रीय

अमृतसर, ०८ मे : पाकिस्तानने भारतीय शहरांना लक्ष्य करीत सोडलेले मिसाईल्स आणि ड्रोन्स भारतीय एअर डिफेन्स सिस्टीमने नष्ट केले आहेत. त्यामुळे पाकिस्तानचा हल्ल्याचा प्रयत्न पूर्णपणे निष्क्रीय ठरला आहे.

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी पाकिस्तानच्या जिहादी दहशतवाद्यांनी २६ हिंदू पर्यटकांचे टार्गेट किलिंग केले होते. या दहशतवादी हल्ल्याला उत्तर म्हणून भारताने ६ आणि ७ मे च्या रात्री पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळं उध्वस्त केलीत. यानंतर पाकिस्तानने ७ आणि ८ मे च्या रात्री भारताच्या १५ शहरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. परंतु, भारताच्या एअर डिफेन्स सिस्टीममुळे पाकिस्तानचा हल्ला पुर्णपणे निष्क्रीय झाला असून पाकिस्तानी मिसाईलचे अवशेष पडलेले आढळून आले आहेत. पंजाबच्या अमृतसर परिसरात अनेक ठिकाणी पाकिस्तानी मिसाईलचे अवशेष आढळून आलेत. स्थानिक ग्रामस्थांना आज, गुरुवारी सकाळी हे अवशेष आढळून आल्यानंतर याबाबत पोलिसांना आणि सैन्याला कळवण्यात आले. त्यानंतर पोलिस आणि सैन्य अधिकाऱ्यांनी हे तुकडे आपल्या ताब्यात घेतले आहेत. एकीकडे पाकिस्तानची स्वतःची एअर डिफेन्स सिस्टीम उध्वस्त झाली असतानाच भारतीय एअर डिफेन्स सिस्टीममुळे पाकिस्तानचा हल्ल्याचा प्रयत्न अपयशी ठरल्याचे दिसून आले.

# केंद्र सरकारने बोलावली सर्वपक्षीय बैठक

## अतिरेक्यांच्या पाकिस्तानमधील पायाभूत सुविधा नष्ट करणे हाच भारताचा हेतू होता : विक्रम मिस्री

नवी दिल्ली : पाकिस्तानमध्ये अतिरेक्यांच्या विरोधात केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' नंतर केंद्र सरकारने गुरुवार ८ मे रोजी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत सर्वपक्षीय प्रतिनिधींनी 'ऑपरेशन सिंदूर'ची थोडक्यात माहिती दिली जाईल. तसेच आता निर्माण झालेल्या परिस्थितीविषयी सांगितले जाईल. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारत हा विषय कसा हाताळत आहे त्याची कल्पना दिली जाईल. भारतीय सैन्य दले येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितले जाईल. भारताने 'ऑपरेशन सिंदूर' का केले आणि त्यातून काय साध्य झाले याबाबतही सर्वपक्षीय प्रतिनिधींनी सांगितले जाणार आहे.



पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी हल्ला केला. अतिरेक्यांनी २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाची हत्या केली होती. या घटनेनंतर भारताने पाकिस्तानमध्ये अतिरेक्यांच्या विरोधात केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' केले. यात भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील अतिरेक्यांचे तळ नष्ट केले. या पाकिस्तानमध्ये अतिरेक्यांच्या विरोधात केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती सर्वपक्षीय नेत्यांनी दिली जाणार असल्याचे संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले. सर्वपक्षीय बैठक गुरुवार ८ मे २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता संसद ग्रंथालय इमारतीच्या समिती कक्ष जी - ०७४ नवी दिल्ली येथे होणार आहे.

'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत बुधवारी पहाटे करण्यात आलेल्या हल्ल्यांमध्ये अतिरेक्यांच्या नऊ तळांना लक्ष्य करण्यात आले, ज्यात मुरीदके येथील लष्कर-ए-तोयबाचे मुख्यालय आणि अतिरेकी कारवायांचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बहावलपूरमधील प्रशिक्षण शिबिरांचा समावेश आहे. अवघ्या २५ मिनिटांत सैन्याने कारवाई पूर्ण केली. ही कारवाई बुधवार ७ मे २०२५ रोजी पहाटे एक वाजून पाच मिनिटे ते एक वाजून तीस मिनिटे या कालावधीत करण्यात आली. 'ऑपरेशन सिंदूर' ही एक नियंत्रित कारवाई होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कारवाई पूर्ण होताच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांना सैन्याच्या कामगिरीची माहिती दिली.

## पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टीम नष्ट

### भारतीय संरक्षण मंत्रालयाने जारी केले निवेदन

नवी दिल्ली, ०८ मे : पाकिस्तानने भारतावर केलेल्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरातील भारतीय कारवाईत लाहोर येथील पाकिस्तानचे मिसाईल डिफेन्स सिस्टीम उध्वस्त झाले आहे. दिल्लीत झालेल्या सर्वपक्षीय बैठकीनंतर संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात ही माहिती पुढे आली आहे. दरम्यान पाकिस्तानला जशास-तसे उत्तर दिले जाईल असे भारताने स्पष्ट केले आहे.

भारताने बुधवारी पहाटे केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये पाकिस्तानातील दहशतवादी तळं उध्वस्त केली आहेत. भारताने आज, गुरुवारी केलेल्या कारवाईत पाकिस्तानात विविध ठिकाणी उभारण्यात आलेल्या एअर डिफेन्स रडार सिस्टीमला लक्ष्य केल्याची माहिती या निवेदनात देण्यात आली आहे. या कारवाईत पाकिस्तानच्या लाहोर शहराजवळील एअर डिफेन्स सिस्टीम उद्धस्त झाली आहेत. भारतीय लष्कराच्या या कारवाईमुळे पाकिस्तानच्या हवाई कारवाया मोठ्या प्रमाणावर थोपवून धरण्यास मदत होणार आहे. पाकिस्तानकडून ७ आणि ८ मे च्या मध्यरात्री उत्तर आणि पश्चिम भारतातील अनेक लष्करी ठिकाणांवर हल्ले करण्याचे प्रयत्न झाले. त्यात अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कापुरथला, जलंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगड, नाल, फलोदी, उत्तरलाई आणि भुज या १५ शहरांचा समावेश आहे. पाकिस्तानकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वापर करून हे हल्ले करण्यात आले. इंटीग्रेटेड काऊंटर यूएएस ग्रिड आणि एअर डिफेन्स सिस्टीमच्या मदतीने पाकिस्तानचे हे प्रयत्न हाणून पाडण्यात आले. हे पाकिस्तानचेच हल्ले असल्याचे या ड्रोन व क्षेपणास्त्रांच्या अवशेषांवरून स्पष्ट होत असल्याचे संरक्षण मंत्रालयाच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## लाहोरमध्ये लागोपाठ तीन स्फोट, पाकिस्तानमध्ये भीतीचे वातावरण

लाहोर : भारतीय सैन्याने बुधवार ७ मे रोजी पाकिस्तानमध्ये अतिरेक्यांच्या विरोधात केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' नंतर गुरुवार ८ मे रोजी लाहोरमध्ये लागोपाठ तीन स्फोट झाले. या स्फोटांमुळे पाकिस्तानमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भारताने पुन्हा हवाई हल्ला केल्याची चर्चा पाकिस्तानमध्ये सुरू झाली आहे. स्फोट लाहोरच्या जुन्या विमानतळाच्या जवळ झाले.

लाहोरच्या जुन्या विमानतळाच्या आवारात ड्रोन पडला. यानंतर स्फोटाचा आवाज ऐकू आला, असे एका स्थानिकाने पाकिस्तानच्या प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी सांगितले. या घटनेनंतर लाहोरमधील विमानवाहतूक तातडीने थांबवण्यात आली आहे. लाहोरमधील वॉल्टन विमानतळ, गोपालनगर आणि नसराबाद या तीन ठिकाणी असे एकूण तीन स्फोट झाल्याचे वृत्त पाकिस्तानच्या प्रसारमाध्यमांनी दिले आहे. 'ऑपरेशन सिंदूर' नंतर हा दुसरा हल्ला झाल्याचे पाकिस्तानमधील निवडक वृत्तवाहिन्या सांगत आहे. भारताने या स्फोटांबाबत अद्याप काहीही सांगितलेले नाही.

स्फोटांचे आवाज ऐकू येताच लाहोरमध्ये ठिकठिकाणी सायरन वाजू लागले. लोक भराभर सुरक्षित ठिकाण गाठू लागले. व्हायरल झालेल्या एका व्हिडीओत वॉल्टन विमानतळ परिसरात स्फोटामुळे निर्माण झालेला धूर दिसत आहे. पाकिस्तानमधून आलेल्या ताज्या वृत्तानुसार कराची, लाहोर, सियालकोट येथील विमानवाहतूक बंद करण्यात आली आहे. पुढील आदेशापर्यंत ही विमानवाहतूक बंद राहणार आहे.

## उत्तरकाशीत हेलिकॉप्टर कोसळले, तीन मुंबईकरांचा मृत्यू

उत्तरकाशी : उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात हेलिकॉप्टर कोसळले. या दुर्घटनेत वैमानिकासह एकूण सहा जणांचा मृत्यू झाला असून एक प्रवासी गंभीर जखमी आहे. जखमी व्यक्तीला उपचारांसाठी एम्स ह्रषिकेश येथे दाखल करण्यात आले आहे.

हेलिकॉप्टर एअरोट्रान्स कंपनीचे होते. हे हेलिकॉप्टर सहस्रधारा हेलिपॅड येथून उड्डाण केल्यानंतर हर्षिलच्या दिशेने येत होते. या हेलिकॉप्टरमध्ये वैमानिक आणि सहा प्रवासी असे एकूण सात जण होते. प्रवाशांपैकी



चार जण मुंबईचे आणि दोन जण आंध्रचे रहिवासी होते. मृतांमध्ये तीन मुंबईकर आहेत.

उत्तरकाशी जिल्ह्यात गुरुवार ८ मे २०२५ रोजी सकाळी पावणेनऊच्या सुमारास गंगोत्री राष्ट्रीय महामार्गावर गंगनानी जवळ हेलिकॉप्टर कोसळले. दुर्घटनेची माहिती मिळताच एसडीआरएफ, पोलीस, वैद्यकीय पथक, रुग्णवाहिका, अग्निशमन दलाचे पथक आणि स्थानिक यांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरू केले.

अपघाताची माहिती मिळताच उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी एक्स पोस्ट करुन शोक व्यक्त केला. दुर्घटनेच्या चौकशीचे आदेश दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. नियमानुसार मृतांच्या नातलगांना आणि जखमी व्यक्तीला उपचारांसाठी आर्थिक मदत दिली जाणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. उत्तराखंडमध्ये मागील दोन - चार दिवसांपासून वातावरण प्रतिकूल आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत अवकाळी पाऊस सुरू आहे. काही ठिकाणी गारपीट झाली आहे. वादळी वारे वाहू लागल्यामुळे काही ठिकाणी नुकसान झाले आहे.

**हेलिकॉप्टर अपघातातील मृतांची यादी**

कला सोनी, ६१, मुंबई, विजया रेड्डी, ५७, मुंबई, रुची अग्रवाल, ५६, मुंबई, राधा अग्रवाल, ७९, उत्तर प्रदेश, वेदवती कुमारी, ४८, आंध्र प्रदेश, वैमानिक रॉबिन सिंह, ६०, गुजरात,

**गंभीर जखमी** – मस्तू भाकर, ६०, आंध्र प्रदेश

## भारताच्या हल्ल्यात मारला गेला जैश - ए - मोहम्मदचा कमांडर रउफ असगर, भारतीय विमान अपहरणाचा होता सूत्रधार

इस्लामाबाद : भारताने अतिरेक्यांच्या विरोधात पाकिस्तानमध्ये केलेल्या ऑपरेशन सिंदूर केले. यात पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील एकूण नऊ अतिरेकी तळांवर हल्ला करण्यात आला. यापैकी एक हल्ला हा बहावलपूर येथील जैश - ए - मोहम्मद या पाकिस्तान पुरस्कृत अतिरेकी संघटनेच्या तळावर करण्यात आला. बहावलपूरच्या हल्ल्यात जैश - ए - मोहम्मदचा एक कमांडर रउफ असगर ठार झाला. भारताने बुधवार ७ मे रोजी मध्यरात्री केलेल्या हल्ल्यात रउफ असगर ठार झाला. या संदर्भातले वृत्त गुरुवार ८ मे रोजी आले.

जैश - ए - मोहम्मदचा म्होरक्या मसूद अजहरच्या कुटुंबातील दहा आणि त्याचे विश्वासू असलेले चार असे एकूण चौदा जण बहावलपूरच्या हल्ल्यात ठार झाले. या चौदा जणांमध्ये अतिरेकी रउफ असगर होता. रउफ असगर हा भार इंडियन एअरलाईन्स कंपनीच्या आयसी ८१४ या विमानाच्या अपहरणाचा सूत्रधार होता. हे विमान कंदहार येथे नेण्यात आले होते. हे विमान आणि त्यातील प्रवासी यांच्या सुरक्षित सुटकेसाठी भारत सरकारला पाच अतिरेक्यांची सुटका करावी लागली होती. या अतिरेक्यांमध्ये मसूद अजहर पण होता.

रउफ हा अतिरेकी फक्त विमान अपहरणातच नाही तर पठाणकोट येथील हल्ला आणि भारताच्या संसदेवर झालेला अतिरेकी हल्ला या दोन हल्ल्यांचाही सूत्रधार होता.

अतिरेक्यांच्या अंत्ययात्रेत पाकिस्तानच्या सैन्यातले अधिकारी

भारताने ऑपरेशन सिंदूर केले. या ऑपरेशनमध्ये ठार झालेल्या अतिरेक्यांच्या अंत्ययात्रेत पाकिस्तानच्या सैन्यातले आणि गुप्तचर यंत्रणेतले अधिकारी सहभागी झाले. अतिरेकी रउफ असगरचा सुपुर्द - ए - खाक हा विधी पाकिस्तानच्या सैन्यातल्या आणि गुप्तचर यंत्रणेतल्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाला. जो रउफ भारतात अनेक वर्षे मोस्ट वॉंटेड होता त्याचा जनाजा (अंत्ययात्रा) निघाला असताना पाकिस्तानच्या सैन्यातल्या आणि गुप्तचर यंत्रणेतल्या अधिकाऱ्यांची उपस्थितीतच पाकिस्तान आणि अतिरेकी यांचे लागेबांधे सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

## अमृतसरमध्ये ब्लॅकआऊट आणि मॉक ड्रिल, सुरक्षा पथकांना हाय अलर्ट

अमृतसर : भारताने पाकिस्तानमध्ये अतिरेक्यांच्या विरोधात केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर' केल्यानंतर अमृतसरमध्ये ब्लॅकआऊट आणि मॉक ड्रिल करण्यात आले. संपूर्ण पंजाबमध्ये सुरक्षा पथकांना हाय अलर्ट देण्यात आला आहे. सुटीवर असलेल्या सुरक्षा पथकांच्या सदस्यांना तातडीने कामावर परत बोलावण्यात आले आहे. देशव्यापी नागरी संरक्षण सरावाचा एक भाग म्हणून, अमृतसर जिल्हा प्रशासनाने सार्वजनिक सुरक्षा आणि तयारी सुनिश्चित करण्यासाठी ब्लॅकआऊट आणि मॉक ड्रिल केले. नागरिकांना महत्त्वाचे काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नका आणि रात्री शक्यतो घरातच थांबा असे आवाहन करण्यात आले आहे. बुधवारी ७ मे रोजी रात्री साडेदहा ते अकरा असा अर्धा तास ब्लॅकआऊट करण्यासाठी पूर्ण अमृतसरचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आला होता.

दिवसा हवाई हल्ला झाला तर त्याला प्रतिकार करणे हे रात्रीच्या तुलनेत सोपे जाते. यामुळे हवाई हल्ले हे अनेकदा रात्री केले जातात. रात्री हवाई हल्ला करणाऱ्या विमानांना नागरी वस्ती, महत्त्वाच्या इमारती, कारखाने, तेलसाठे आदी दिसू नये यासाठी ब्लॅकआऊट करतात. काळोखामुळे विमानांना शहर पटकन दिसत नाही आणि हल्ला टळण्याची शक्यता वाढते. याच कारणामुळे भारत - पाकिस्तान दरम्यान निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्राच्या सूचनेनुसार खबरदारीच्या उपायांचा सराव सुरू आहे. नागरिकांनी घाबरू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात, हिमाचल प्रदेश आणि बिहारसह अनेक राज्यांमध्ये बुधवारी ब्लॅकआऊट आणि मॉक ड्रिल करण्यात आले. ब्लॅकआऊटसाठी रात्री काही काळासाठी विजेचा पुरवठा खंडीत करण्यात आला होता. देशातील अनेक महत्त्वाच्या शहरांमध्ये हा प्रयोग करण्यात आला. राजधानी नवी दिल्ली, अमृतसर, बाडमेर, सूरत, सिमला, पाटणा आदी शहरांमध्ये रात्री काही काळासाठी विजेचा पुरवठा खंडीत करुन ब्लॅकआऊटचा सराव करण्यात आला.

## मालेगाव स्फोट प्रकरणाचा निकाल पुन्हा लांबणीवर

मुंबई, ८ मे : मालेगावमध्ये २००८ साली झालेल्या स्फोटाच्या खटल्याचा निकाल तब्बल १७ वर्षांनी आज, गुरुवारी लागण्याची शक्यता होती.१९ एप्रिलला मुंबई सत्र न्यायालयातील एनआयए कोर्टाचे न्यायाधीश एल के लाहोटी यांनी या खटल्याची सुनावणी पूर्ण करत आपला निकाल राखून ठेवला होता. यानंतर आज पार पडलेल्या सुनावणीत या प्रकरणाचा निकाल पुढे ढकलण्यात आला आहे. १ लाख पेक्षा जास्त आरोपपत्र पान असल्याने वेळ लागणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ३१ जुलै रोजी होणार आहे.

एनआयएने दोषींना शिक्षा सुनावण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाकडून वेळ मागितला होता. त्यानुसार हा वेळ देण्यात आला आहे. गुरुवारी झालेल्या सुनावणीसाठी साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांच्यासह सर्व आरोपी उपस्थित होते. पुढच्या वेळी निकाल नक्की लागेल. सत्यमेव जयते, सत्याचा नेहमी विजय होतो आणि होईल, असा विश्वासही प्रज्ञासिंह यांनी माध्यमांशी संवाद साधताना व्यक्त केला. दरम्यान, या प्रकरणाबाबत न्यायालयाची सुनावणी आणि सर्व प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यामुळे केवळ निकाल जाहीर होणे अपेक्षित होते. मात्र आता हा निकाल पुन्हा लांबणीवर पडला आहे.

मुंबईपासून सुमारे २०० किमी अंतरावर असलेल्या मालेगाव येथील मशिदीजवळ २९ सप्टेंबर २००८ रोजी मोटारसायकलचा स्फोट होऊन सहा जण ठार आणि १०१ जण जखमी झाले होते. मालेगाव स्फोट खटल्याचा प्राथमिक तपास करणाऱ्या दहशतवाद विरोधी पथकानं ११ जणांना अटक करून त्यांच्यावर मकोका अंतर्गत आरोपपत्र दाखल केलं होतं.हे सर्वजण अभिनव भारत या संघटनेशी संबंधित असून त्यांनी हिंदू राष्ट्र निर्माण करण्यासाठी काही तरुणांना भोसला मिलिट्री स्कूलमध्ये शस्त्र आणि स्फोटकांचं प्रशिक्षण दिल्याचा आरोप एटीएसनं केला होता. यात ज्या एलएमएल फ्रिडम मोटरसायकलवर हा बॉम्ब लावला होता, त्याची मालकी असलेल्या साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांना एटीएसने अटक केली.




## संक्षिप्त वृत्त...

### जबरी चोरी प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत जबरी चोरी प्रकरणातील आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नांदेड जिल्ह्यातून ताब्यात घेतले.

आरोपी विनोद शिंदे याच्यावर परभणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरनं ५/२०२५ मध्ये भारतीय न्याय संहितेचे कलम ३१० (२), ३११, ६४ (एल), ७० (१), ३३३, ३५१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपी हा मंगळवारी नांदेड परिसरातील खानापूर फाटा येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने सदर ठिकाणी केलेल्या कारवाईत आरोपी विनोद शिंदे यास ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी आरोपीला ग्रामीण पोलीस ठाण्याकडे सुपुर्द करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, पोलीस अंमलदार मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, शंकर गायकवाड, दिपक मुदीराज, गणेश कौटकर यांच्या पथकाने केली.

### कुलगुरु इंद्र मणि यांची मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यालयाला भेट

**परभणी,/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. इन्द्र मणि यांनी बुधवार ७ मे रोजी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी मंडळाच्यावतीने विधान परिषद सदस्य व विद्यापीठाचे कार्यकारी परिषद सदस्य आमदार सतिश चव्हाण यांनी त्यांचा यथोचित सन्मान केला.

यावेळी माननीय कुलगुरू इन्द्र मणि यांनी देवगिरी महाविद्यालयाच्या परिसरातील शारदाबाई गोविंदराव पवार मुलींच्या वसतिगृहाची पाहणी केली. त्यांनी वसतिगृहात मुलींना उपलब्ध करून दिलेल्या भौतिक सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता आणि शिक्षणास पोषक वातावरण यांचे विशेष कौतुक केले. त्यानंतर त्यांनी देवगिरी महाविद्यालयालाही भेट देऊन महाविद्यालयात राबवले जाणारे अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती तसेच विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची माहिती घेतली. या सर्व गोष्टींबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले व संस्थेच्या शैक्षणिक कार्याचे अभिनंदन केले.

या प्रसंगी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रवीण तेजनकर, फळ संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. संजय पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

### डॉ. संजय रोडगे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त रुग्णांना फळ वाटप

**सेलू,/प्रतिनिधी :** सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय रोडगे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त बुधवारी (दि.०७) येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.

अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त घटक संस्थेतील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने डॉ. रोडगे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेच्या सचिव डॉ. सविता रोडगे, अध्यक्ष, डॉ. रामराव रोडगे (भाऊ), डॉ. गणेश पारवे, डॉ. अपूर्वा पारवे- रोडगे, अशोक पटवारी, प्रफुल्ल बिनायके आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. मिनाक्षी रत्नपारखी यांनी केले. यावेळी अशोक बोडखे व अशोक पटवारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डिगांबर टाके व सौ. कल्पना भाबट यांनी केले तर आभार आकात यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी घटक संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. दरम्यान, डॉ. रोडगे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्त तसेच १४ मे रोजी सायंकाळी ६ वाजता हभप निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांचा हरिकीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

### मोफत उन्हाळी टेबल टेनिस प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील बी रघुनाथ महाविद्यालय परभणी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी जिल्हा हौशी टेबल टेनिस संघटना व चेतनानंद टेबल टेनिस प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बी. रघुनाथ महाविद्यालयात ८ ते १५ मे या कालावधीत उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये मुलांना विरंगुळा म्हणून विशेष आठ दिवसाचे टेबल टेनिस या खेळाचे प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

टेबल टेनिसच्या क्षेत्रामध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या व आवड असणाऱ्या सर्व विद्यार्थी व टेबल टेनिस प्रेमींनी या शिबिरचा लाभ घेण्याची संधी बी. रघुनाथ महाविद्यालयाने परभणी शहरात उपलब्ध करून दिलेली आहे. या उन्हाळी विशेष प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्यासाठी प्रा.डॉ. विनोद गणाचार्य व चेतन मुक्तावार(९७६६६७९६३६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी व परभणी जिल्हा हौशी टेबल टेनिस संघटनेकडून करण्यात आले आहे.

### नीट परिक्षेच्या विद्यार्थी व पालकांसाठी उभारले विश्रांतीगृह

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील कै. भास्करराव कुलकर्णी (पिंपळगावकर) सेवाभावी संस्थेचे गिरीश पिंपळगावकर यांनी नीट परिक्षेच्या विद्यार्थी व पालकासाठी विश्रांतीगृह उभारुन एक नाविन्यपूर्ण सेवाभावी उपक्रम राबविला. शहरातील नीट परीक्षेसाठी शारदा विद्यालय, कै. जामकर विद्यालय, ज्ञानोपासक महाविद्यालय व इतर अनेक परिक्षा केंद्र होती.परिक्षेसाठी जिल्ह्यातुन व जिल्ह्याबाहेरून अनेक विद्यार्थी व त्यांचे पालक आले होते. परंतु, दिवसभरासाठी त्यांना थांबण्यासाठी कोठेही योग्य जागा मिळत नव्हती, तसेच पिण्याचे पाणी देखिल उपलब्ध नव्हते. भर उन्हाळयामधील ही अडचण लक्षात घेऊन पिंपळगावकर यांनी जेल रोड वरील शासकीय एम. बी. बी. एस. विद्यार्थी वस्तीगृह परिसरात विद्यार्थी व पालकांकरीता सावलीसाठी मंडप व्यवस्था, बिछायत व पिण्याचे थंड पाणी उपलब्ध करुन दिले. त्यामुळे विद्यार्थी आणि पालक याची मोठी सोय झाली. या उपक्रमासाठी सुनिल घाटुळे, प्रा. रमेश भालेराव, दत्तात्रय गव्हाणे उपस्थित होते.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिकविम्याची रक्कम तातडीने अदा करावी- पालकमंत्री मेघना बोर्डीकर

**मोहन धारासूरकर**

**परभणी,/प्रतिनिधी-** मागील दोन वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या परभणी जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिकविमा योजनेतंर्गत नुकसान भरपाईचा निधी अद्याप मिळाला नाही, त्यांना हा निधी तातडीने वितरीत करण्याचे निर्देश पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले. संबंधित विमा कंपनीने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पिकविम्याची रक्कम शेतकऱ्यांना देण्यास दिरंगाई करु नये, अशी सूचनाही त्यांनी केली.

सन २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या ज्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिकविमा योजने अंतर्गत नुकसान भरपाई मिळाली नाही, या अनुषंगाने आज पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या. पालकमंत्री मेघना बोर्डीकर व आमदार राहूल पाटील हे दूरदृश्य प्रणालीव्दारे बैठकीत सहभागी झाले होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित या बैठकीस आमदार राजेश विटेकर, आमदार रत्नाकर गुट्टे, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी संगीता सानप, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. चव्हाण, जिल्हा अग्रणी बँकेचे अधिकारी श्री. कुलकर्णी, आयसीआयसीआय लोंम्बार्ड कंपनीचे वरिष्ठ अधिकारी व जिल्हा व्यवस्थापक, तालुका कृषी अधिकारी आदी उपस्थित होते.

सन २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षातील प्रधानमंत्री पिकविमा योजने अंतर्गत नैसर्गिक आपत्तीचा निधी परभणी जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना मिळाला नसल्याच्या तक्रारींची दखल घेऊन पालकमंत्री यांनी या विषयासंदर्भात बैठक आयोजित करण्याची सूचना प्रशासनाला केली होती. आज सदर विषयाबाबत बैठकीत सविस्तर चर्चा झाली.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर म्हणाल्या की, नैसर्गिक आपत्तीमुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले, त्यांना पिकविमा पोटी राज्य शासनाने आर्थिक मदत जाहीर केली आहे. बहुतांश शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळाली आहे, ज्या शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळाली नाही, त्यांना तात्काळ मदत देण्याची कार्यवाही केली जाईल, त्यामुळे शेतकऱ्यांनी अजिबात काळजी करु नये. संबधित विमा कंपनी व कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल घेऊन नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानापोटी पिकविम्याचा निधी शेतकऱ्यांना तातडीने वितरीत करावा. याबाबत कुठल्याही प्रकारे दिरंगाई करु नये. यावेळी आमदार श्री. विटेकर, श्री. गुट्टे, श्री. पाटील यांनी शेतकऱ्यांना नसैगिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानपोटी पिकविम्याची रक्कम तातडीने अदा करण्याची मागणी केली.



प्रधानमंत्री पिक विमा योजना रब्बी २०२३-२४ स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत २४,६५१ शेतकऱ्यांना रु. ३७.७३ कोटी निधी मंजूर झाला. यापैकी २४,५८७ शेतकऱ्यांना रु. ३७.६५ कोटी निधी वाटप करण्यात आला. प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२४-२५ हवामानातील प्रतिकूल परिस्थिती अंतर्गत ६,७३,००० शेतकऱ्यांसाठी रु. २९९.२३ कोटी निधी मंजूर झाला. यापैकी ६,७०,२१७ शेतकऱ्यांना रु. २९८.७५ कोटी निधी वाटप करण्यात आला. तर २,७८३ शेतकऱ्यांना निधी वाटपाची प्रक्रीया सुरु आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२४-२५ स्थानिक नैसर्गिक आपत्ती अंतर्गत ५०,२७० शेतकऱ्यांना रु. १०४.७७ कोटी निधी मंजूर झाला. यापैकी ५०,२४७ शेतकऱ्यांना रु. १०४.७३ कोटी निधी वाटप करण्यात आला. तर २३ शेतकऱ्यांना निधी वाटपाची प्रक्रीया सुरु आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०२४-२५ काढणी पश्चात अंतर्गत ९,३१७ शेतकऱ्यांसाठी रु. २४.१८ कोटी निधी मंजूर असून शासनस्तरावरुन हा निधी प्राप्त झाल्यानंतर त्याचे वितरण करण्यात येईल, अशी माहिती श्री. चव्हाण यांनी दिली.

# ०१ जून रोजी सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळा

## संबोधी अकादमीच्यावतीने आयोजन : २५ मे पर्यंत नोंदणी करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी :** संबोधी अकादमी महाराष्ट्र यांच्या वतीने रविवार १ जून रोजी जिंतूर रस्त्यावरील महात्मा फुले विद्यालयाच्या प्रांगणात सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या सामुहिक विवाह सोहळ्यास देश विदेशातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नांदेड येथील पुज्य भदंत पय्याबोधी व भिक्खू संघ यांच्या हस्ते परिणय विधी संपन्न होणार आहेत, अशी माहिती आयोजक भिमराव हत्तीअंबीरे यांनी दिली.



संबोधी अकादमीच्या विवाह सोहळ्यात आजपर्यंत २५०० पेक्षा अधिक जोडपी विवाहबध्द झालेले आहेत. या विवाह सोहळ्यात सहभागी होणाऱ्या जोडप्यास महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत कन्यादान योजनेतंर्गत २० हजारचे अनुदान मिळणार आहे. तसेच संबोधी अकादमी, महाराष्ट्रच्या वतीने वधू-वरांना शुभ्र वस्त्र, सर्वांना सुरुची भोजन, वाजंत्री आदी सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत. वधु-वर नोंदणीसाठी मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण तर मुलाचे वय २१ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे.

वयाचा पुरावा म्हणून टी.सी.,/ दहावीची सनद / जन्म प्रमाणपत्र यापैकी एक, चार पासपोर्ट फोटो, वधू किंवा वर यापैकी किमान एका जणाचे जातीचे प्रमाणपत्र, वधु-वराचे रहिवाशी प्रमाणपत्र नोंदणी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

इच्छूकांनी २५ मे पर्यंत सुपर मार्केट परिसरातील गाळा क्रमांक ६ मधील संबोधी अकादमीच्या कार्यालयाशी किंवा अविनाश मालसमिंदर (मो.नं. ७७९८५४४७८६) यांच्याशी संपर्क करावा व जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन विवाह सोहळ्याचे आयोजक संबोधी अकादमीचे अध्यक्ष समाजभूषण डॉ. भीमराव हत्तीअंबीरे यांच्यासह भगवानराव जगताप, डॉ. अरविंद सावते, शेषराव जल्हारे, सिध्दार्थ भराडे, गौतम साळवे, भीमराव पतंगे, शशिकांत हत्तीअंबीरे, बबन शिंदे, बाळासाहेब अंभिरे, डॉ. लक्ष्मण कांबळे, मुरलीधर ढेंबरे, ॲड. सुनिल बगाटे, बाळासाहेब किर्तने, विश्वनाथ डबडे, दि.फ. लोंढे, नवनाथ पैठणे, माधव मोते, गौतम कठाळे, राजेश चांदणे, एल.आर. कांबळे, भीमराव धबाले, राजेश पंडीत, बाबासाहेब भराडे, संतोष भराडे, संभाजी खिल्लारे, गंगाधर परसोडे, धनंजय रणविर, सोनाजी लांडगे, बाबासाहेब भुजावळे, दिपक जाधव, हेमंत घुगे, साहेबराव ढगे, उत्तम साळवे, अरुण पंचांगे, एकनाथ खंदारे, डॉ. नामदेव मुळे, प्रभाकर कांबळे, भीमराव श्रीखंडे, बंडू नरवाडे, सुर्यकांत उजगरे, सुरेश मगरे, बाबुराव गवळी, रोहिदास साखरे, गोमाजी श्रावणे, पवन कांडलीकर यांनी केले आहे.

# वीज पडून पाच जनावरे दगावली

### आहेरवाडी शिवारातील घटना : आखाडयावरील शेती साहित्य, खताच्या गोण्याही जळून झाल्या खाक

**संपत तेली**

**पूर्णा,/प्रतिनिधी :** वीज पडून पाच जनावरे दगावली : आहेरवाडी शिवारातील घटना : आखाड्यावरील शेती साहित्य, खताच्या गोण्याही जळून खाक झाल्याची घटना घडली. पूर्णा तालुक्यातील आहेरवाडी शिवारातील शेत आखाड्यावर मंगळवारी (दि.०६) वीज पडून पाच जनावरे दगावल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेत आखाड्यावरील शेती साहित्य, खताच्या गोण्याही जळून खाक झाले होते.



याबाबत सविस्तर माहिती अशी की, पूर्णा तालुक्यातील आहेरवाडी येथील शेतकरी दिगंबरराव मोरे यांच्या शेत आखाड्यावर मंगळवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास वीज पडून आखाड्यावरील दोन गाई व तीन जनावरे दगावली तर पाच जनावरे गंभीर जखमी झाली. तसेच आखाड्यावरील एक लाख रुपयांच्या खताच्या गोण्या जळून खाक झाल्या. सुदैवाने घटनास्थळावर असलेले सालगडी बचावले. मात्र त्यांचे संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले. या दुर्घटनेत एकूण पाच लाखांपेक्षा अधिक रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या शेत आखाड्यावर लहान - मोठी एकूण ३३ जनावरे होती. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी तात्काळ धाव घेत घटनेचा पंचनामा केला. अचानक उद्भवलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्याला राज्य शासनाने आर्थिक मदत देण्याची मागणीही होत आहे.

दरम्यान, मागील दोन दिवसांपासून जिल्ह्याच्या वातावरणात सायंकाळ नंतर अचानक बदल होऊन वादळी वारा आणि अवकाळी पाऊस पडत आहे. त्यामुळे वादळी वाऱ्याने नुकसान होण्याच्या, वीज पडण्याच्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### मराठवाडा शाळेचे बारावी परिक्षेत यश

**परभणी-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षेत नूतन विद्या समिती संचलित मराठवाडा कनिष्ठ महाविद्यालयाचा कला शाखेचा ९१.१७ टक्के तर विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल लागला आहे.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळाचा उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ चा निकाल सोमवार ५ मे रोजी जाहीर करण्यात आला. यामध्ये एनव्हीएस मराठवाडा कनिष्ठ महाविद्यालयाचा कला शाखेचा निकाल ९१. १७ टक्के तर विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल लागला असून कला शाखेतून कुमारी भक्ती मारोतराव शहाणे तर विज्ञान शाखेतून कुमारी अधिरा बालाजी कोकड या विद्यार्थीनींनी प्रत्येकी ८२ टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला.दरम्यान, व्यापारी प्रशांत जैन यांनी तात्काळ धाव घेवून या दोघांवर प्रथमोपचार केले व नवा मोंढा पोलिसांशी संपर्क साधून तक्रार होर्डींगधारकाविरोधात तक्रार नोंदविण्याची विनंती केली असून यावेळी परीक्षेत चांगले मार्क घेतलेल्या विद्यार्थ्यांचा प्रशालेकडून गौरव केला.

### अवकाळी वाऱ्यामुळे परभणी जिल्हयात पिकासह अन्य वस्तुंचे देखील मोठे नुकसान

**परभणी-** परभणी जिल्हयात गेल्या दोन ते तीन महिन्यापासून अवकाळी पावसामुळे अनेकजणांना त्रास सहन करावा लागला होता. यामुळे अनेक नागरिकांना आपला जीव मुठीत घेवून सायंकाळच्या सुमारास प्रवास करावा लागत होता. त्यातच यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे खासकरुन आंबा पिकांचेदेखील मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. काही ठिकाणी विजामुळे जनावरे दगावल्याची घटना घडली. तसेच शहरी भागात होर्डिंग्ज मोठया प्रमाणात पडल्यामुळे नागरिकांना देखील अनेक त्रासास सामोरे जावे लागत होते. त्यामुळे या अवकाळी वाऱ्याचा सर्वच नागरिकांना मोठया प्रमाणात त्रास झाला होता.

# सर्वोच्च न्यायालयाने दिले स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडूका चार महिन्यात घेण्याचे आदेश

**परभणी ,/प्रतिनिधी-** गेल्या अडीच-तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चार आठवड्यात निर्णय घ्या, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने आज मंगळवार ०६ मे रोजी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला दिले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. के. सिंग यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.



आयोगाच्या २०२२ च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समाजाला आरक्षण देऊन या निवडणुका घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जे. के. बांठिया आयोगाच्या २०२२ च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समुदायांना आरक्षण दिले जाईल, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एनके सिंह यांच्या खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिसूचित करण्याचे निर्देश दिले. चार महिन्यांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश खंडपीठाने दिले. गरज पडल्यास निवडणूक आयोगाला मुदतवाढ मागण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे मुंबईसह राज्यसभरातील महापालिकांच्या निवडणुका लवकरच लागण्याची शक्यता आहे. गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने आणि ओबीसी आरक्षणासहित निवडणुका व्हाव्यात की नाही आदी विविध विषयांवर सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित होती.

# वरखेडी बु विजेच्या शॉकने तरुणांचा मृत्यू



फर्दापूर दि ८ - वरखेडी बु. येथे विजेचा शॉक लागून एका ४० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना बुधवार दि.७ दुपारी १:४५ वाजेच्या सुमारास घडली.राजेश सोना चव्हाण (वय.४० रा. वरखेडी बु.) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार वरखेडी बु.येथील रहिवाशी राजेश चव्हाण हा दुपारच्या वेळेस घरावर पाणी मारत होता.पाणी मारण्यात व्यस्त असताना नकळत त्याला विजेचा जोराचा शॉक लागला असता त्याचा जागीच मृत्यू झाला.यादरम्यान, गावातील काही नागरिकांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी फर्दापूर पोलीस स्टेशनला संबंधित घटनेविषयी माहिती दिली.फर्दापूर पोलीस स्टेशनचे पो.ना.निलेश लोखंडे व सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत घटनास्थळाचा पंचनामा केला व सदरील व्यक्तीला मृतावस्थेत सोयगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृत व्यक्तीच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली असा परिवार आहे. सदरील घटनेचा तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ना.निलेश लोखंडे हे करीत आहे.

## बाहेती रिसायकलिंग इंडस्ट्रीजने मजबूत वाढ नोंदवली

नाशिक : बाहेती रीसायकलिंग इंडस्ट्रीज लिमिटेड ), ही ल्युमिनियम रीसायकलिंग आणि ल्युमिनियम मिश्र धातु आणि डी-ऑक्स मिश्र धातुंच्या निर्मितीमध्ये गुंतलेली एक आघाडीची कंपनी आहे.कंपनीने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या सहामाही आणि पूर्ण वर्षाचे आर्थिक निकाल जाहीर केले आहेत, ज्यात आवक आणि निव्वळ नफ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या सहामाही कालावधीसाठी, कंपनीने २६,७१६.९० लाख रुपयांची आवक नोंदवली जी मागील वर्षाची २२,२६५.९२ लाख रूपये आवकपेक्षा २०% जास्त आहे. निव्वळ नफा १५८.७% ने वाढून १,०९८.९३ लाख रुपये केला, जो मागील वर्षात ह्याच कालावधीत ४२४.७७ लाख रुपये होता. हे उत्कृष्ट परिणाम कंपनीची मजबूत ऑपरेशनल कार्यक्षमता आणि वाढती मागणी दर्शवतात.

## 1,100 कोटी रुपयांचा थीम्ड मेगा टाऊनशिप प्रकल्प उभारणार

मुंबई : डेला रिसॉर्ट्स अँड ऍडव्हेंचरने हिरानंदानी कम्युनिटीज अँड क्रिसला डेव्हलपर्ससोबत प्रोप्रायटरी सीडीडीएमओढच् मॉडेलसाठी हातमिळवणी केली आहे. तब्बल ११०० कोटी रुपये उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता असलेली रेसकोर्स थीम्ड मेगा टाऊनशिप उभारण्यासाठी ही भागीदारी करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे भारतीय स्थावर मालमत्ता उद्योगक्षेत्रात हे पाऊल पहिल्यांदाच उचलले गेले आहे. विशिष्ट संकल्पनेवर आधारित, हॉस्पिटॅलिटी-चलित मॉडेलने स्थावर मालमत्ता क्षेत्रात एक नवीन गुंतवणूक वर्ग खुला आहे, ज्यामध्ये गुंतवणुकीवर ९% पर्यंत परतावा देण्याची क्षमता आहे. या मॉडेलमुळे हा मूल्य प्रस्ताव स्थावर मालमत्तेच्या पलीकडे जाऊन, एक खास निवडण्यात आलेली लाईफस्टाईल इकोसिस्टिम निर्माण करतो, ज्यामध्ये अतुलनीय लक्झरी, कम्युनिटी आणि अनुभवात्मक हॉस्पिटॅलिटी यांचा मिलाप आहे.


## रोग व व्याधींपासून मुक्ती मिळवण्यासाठी विनामूल्य महायज्ञ

महाराष्ट्र: अंतर योग फाउंडेशन एक पवित्र आणि परिवर्तनात्मक आध्यात्मिक चळवळ गणेश विद्या महायज्ञ आयोजित करत आहे. हा एक ऐतिहासिक महासोहळा असून भारताला विश्वगुरु बनविण्याच्या दिशेने टाकलेले एक महान पाऊल आहे. महायज्ञ सोहळा रविवारी , ११ मे २०२५ रोजी ,सकाळी ७.३० ते रात्री १०.३० दरम्यान ,सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे आचार्य उपेन्द्रजी यांच्या नेतृत्वाखाली तो संपन्न होत आहे. अंतर योग गणेश विद्या महायज्ञ कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. आयुष्यभरात कधीही न विसरण्यासारखा असा हा अत्यंत दिव्य असा अनुभव असून यामध्ये सामूहिक रित्या श्री गणेशाच्या ५ कोटी बीज मंत्रांचा जप आणि २ लाख वैयक्तिक जप साधना पूर्ण करून, आचार्य उपेन्द्रजी व जगभरातील अंतर योग साधकांनी येणाऱ्या काळातील संकटांपासून भारताचे रक्षण करण्याचा संकल्प केला आहे. या अद्वितीय यज्ञामध्ये आचार्यजी दुर्मिळ आध्यात्मिक साधनांच्या माध्यमातून उपस्थितांना त्यांच्या जीवनातील अडथळे दूर करण्यासाठी, अमाप धन व यश मिळविण्यासाठी आणि आजारांपासून त्वरित मुक्ती मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत.

## मे महिन्यात अल्ट्रा झकास ओटीटी सादर करत आहे दमदार चित्रपट आणि सिरीज...

मुंबई : 'मे' महिन्यात सुट्टीचा आनंद द्विगुणीत होणार, जेव्हा अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर एका पेक्षा एक सुपरहिट मराठी कंटेंट घरबसल्या पहायला मिळणार. महिन्याच्या दर शुक्रवारी तुम्हाला पाहता येणार नवीन रोमांचक सिनेमे, वेब सिरीज आणि साऊथ ब्लॉकबस्टर चित्रपट. चला तर मग या सुट्टीच्या दिवसांत ओटीटीवरील सुपरहिट मनोरंजनाचा आनंद घेऊया, आणि मे महिन्याच्या सुट्टीला खास बनवूया. गरुडान' हा मल्याळम भाषेतील ब्लॉकबस्टर क्शन-ड्रामा चित्रपट आहे ज्याचे दिग्दर्शन अरुण वर्मा यांनी केले आहे. हा चित्रपट प्रामाणिक पोलीस हरीश माधव आणि प्राध्यापक निशांत यांच्या आयुष्यावर आहे. अनपेक्षितपणे एका गुन्ह्यात अडकलेल्या या दोघांपैकी हरीशला आपली निष्ठावान प्रतिमा जपायची असते तर निशांतला न्याय मिळवायचा असतो. आता दोघे एकमेकांना कसे सामोरे जातील हे बघणं नक्कीच रोमांचक ठरेल. हा सुपरहिट चित्रपट ०९ मे २०२५ ला अल्ट्रा झकास मराठी ओटीटीवर तुमच्या भेटीला येत आहेत.

## टोयोटा अर्बन क्रूझर टैसरः स्टाईल, परफॉर्मन्स आणि सुरक्षा यांचा परिपूर्ण मिलाफ



संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटरने भारतीय बाजारात नवीन टोयोटा अर्बन क्रूझर टैसर सादर केली असून, ती आकर्षक डिझाइन, प्रगत वैशिष्ट्ये आणि उत्कृष्ट ड्रायव्हिंग अनुभवासाठी प्रसिद्ध आहे. १.० लिटर टर्बो, १.२ लिटर पेट्रोल आणि ई-सीएनजी अशा पॉवरट्रेन पर्यायांमध्ये उपलब्ध या एसयूव्हीची किंमत ७.७३ लाख (एक्स-शोरूम) रुपयांपासून सुरू होते. अर्बन क्रूझर टैसरमध्ये टोयोटाच्या एसयूव्ही परंपरेची झलक देणारे प्रीमियम फ्रंट ग्रिल, क्रोम गार्निश, १६ अलॉय व्हील्स (एस+ आणि जी मध्ये ऑल ब्लॅक), एलईडी हेडलॅम्प्स, ट्विन एलईडी डीआरएल्स, कनेक्टेड एलईडी टेल लॅम्प्स, रूफ रेल्स, स्पोर्टी स्किड प्लेट्स, व्हील आर्च क्लॅडिंग, शार्क फिन अँटेना, रियर स्पॉयलरसह हाय-माउंट स्टॉप लॅम्प आणि यूव्ही कट ग्लास देण्यात आले आहेत.

इंटिरियरमध्ये ड्युअल टोन डॅशबोर्ड, सिल्व्हर मेटल ॲक्सेंट, प्रीमियम फॅब्रिक सीट्स, लेदर रॅप्ड फ्लॅट-बॉटम स्टीयरिंग व्हील (टिल्ट व टेलिस्कोपिक ॲडजस्टमेंटसह), स्लाइडिंग फ्रंट आर्मरेस्ट, हाइट ॲडजस्टेबल ड्रायव्हर सीट, ऑटोमॅटिक क्लायमेट कंट्रोल, रियर एसी वेंट्स, ६०:४० स्प्लिट रियर सीट्स, अँटी-पिंच टेक्नॉलॉजीसह पॉवर विंडो आणि वाढीव बूट स्पेस दिले आहे.

अर्बन क्रूझर टैसरमध्ये टोयोटा आय-कनेक्ट सिस्टीम, स्मार्टवॉच व व्हॉईस असिस्टंट (हे सिरी) सपोर्ट, रिमोट लॉक/अनलॉक, क्लायमेट कंट्रोल, हेडलॅम्प ऑन/ऑफ कंट्रोल, व्हेईकल लोकेशन व हेल्थ ट्रॅकिंग सारखी वैशिष्ट्ये मिळतात. ९ स्मार्टप्ले टचस्क्रीन (ओटीए अपडेटसह), वायरलेस अँड्रॉइड ऑटो व ॲपल कारप्ले, ३६० डिग्री कॅमेरा, हेड-अप डिस्प्ले, वायरलेस चार्जर, पॅडल शिफ्टर्स, क्रूझ कंट्रोल, रिव्हर्स पार्किंग कॅमेरा व ६ स्पीकर्ससह -ठघ-चधड साउंड सिस्टीमने इन-कार अनुभव अधिक समृद्ध करण्यात आला आहे.

# सर्वसामान्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी प्रधानमंत्री यांचे कान नाक डोळे बनवून आलो : मंत्री विरेंद्र कुमार

## तिसगांव तांडा केंद्रिय मंत्री यांची चौपाल बैठक

खुलताबाद प्रतिनिधी - खुलताबाद तालुक्यातील तिसगाव तांडा येथे गुरुवारी सकाळी केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री विरेंद्र कुमार यांनी तांडा वस्तीवरील नागरिकांची चौपाल बैठक घेऊन त्यांच्याशी थेट संवाद साधला, आपण तळागाळातील सर्वसामान्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी प्रधानमंत्री मोदीजी यांचे कान नाक डोळे बनून आलो असून भटक्या विमुक्त जाती, जमाती व सर्वसामान्य नागरिकांपर्यंत केंद्र सरकारच्या विविध विकास योजना कशा पोहोचतील या साठी आपण विशेष प्रयत्न करत असून सर्वसामान्यांना लाभ मिळावा असा आपला उद्देश असल्याचे ते या वेळी बोलताना म्हणाले.

दरम्यान या चौपल बैठकीत गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत बंब,



भारत सरकार डी.एन.टी.बोर्ड सदस्य प्रवीण घुगे, डी.डब्ल्यू.बी. डी.सी. सीईओ आप्पारावजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी नागरिकांशी थेट संवाद साधताना केंद्रीय मंत्री विरेंद्रकुमार पुढे म्हणाले की, तळागाळातील भटक्या विमुक्त जाती जमातीतील नागरिकांना तसेच ज्येष्ठ नागरिक दिव्यांग आदी सर्वांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या विविध योजनांचा लाभ मिळालाच पाहिजे यासाठी तालुकास्तरावरील सर्व अधिकारी यांनी विशेष शिबिराचे आयोजन करून तळागाळातील नागरिकांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे विशेषता महिलांसाठी स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून त्यांचा आर्थिक विकास साधला पाहिजे व महिलांचे सशक्तीकरण झाले पाहिजे असे गौरव गार त्यांनी यावेळी बोलताना काढले, मंत्री महोदय यांनी थेट संवाद साधताना महिला ज्येष्ठ नागरिक सर्वांच्याच समस्या जाणून घेतल्या व त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित विभागा विभागाला त्यांनी दिले.

या वेळी जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष एल.जी. गायकवाड,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे,भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, भाजपा गंगापूर तालुकाध्यक्ष रविंद्र चव्हाण, , युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, कन्नड-सोयगाव विधानसभा निवडणूक प्रमुख प्रा.डॉ.संजय गव्हाणे, कन्नड तालुकाध्यक्ष गणेश घुगे, माजी तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील नलावडे, दिपक बढे, नंदकुमार गांधीले, सरपंच पांडव, भीमराव खंडागळे, दिनेश अंभोरे, आमदार आमदार प्रशांत बंब यांचे स्वीय सहाय्यक रज्जाक पठाण, गोपाल वर्मा, आदर्श ग्रामीण विकास सेवाभावी संस्थेचे सचिव अनिल घुगे, राजेंद्र बढे, अरुण पाटे, अनिल करपे, यांच्या सह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अखेर रस्ता केला मोकळा ; जवखेडा खुर्द शिवारातील घटना

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०८ मे- तालुक्यातील जवखेडा खुर्द शिवारातील दोन गटातील रस्ता तहसिलदार यांच्या आदेशाने पोलिस बंदोबस्तात मंगळवारी (दि.६) सांयकाळी मोकळा करण्यात आला. कन्नड तहसीलदार विद्याचरण कडवकर यांच्या आदेशाने नायब तहसीलदार दिलीप सोनवणे, शैलेश राजपुत यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि.६) जवखेडा खुर्द शिवारातील गट क्रमांक ८२ व ९६ मधील नाल्यावर झालेले



अतिक्रम काढून देण्यासाठी गेलेले मंडळ अधिकारी विकास वाघ व ग्राम महसूल अधिकारी सीमा राजळे गेले असता शेतकऱ्यांच्या मागणी प्रमाणे नाल्याच्या बाजूने रस्ता कडून देण्यात आला. यावेळी काही नागरीकांनी मंडळ अधिकारी यांच्याशी वाद करून अतिक्रमण काढण्यास विरोध केला तसेच जेसीबी यंत्रा समोर आडवे झोपून काम सुरू करण्यास अडथळा केला. त्यामुळे मंडळ अधिकारी विकास वाघ यांनी या कामात अडथळा आनणाऱ्या विरुध्द पिशोर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवून गुन्हा दाखल केला. त्यानंतर मंगळवारी (दि.६) सायंकाळी पोलिस बंदोबस्तात सदर नाला व रस्ता मोकळा करून देण्यात आला. यावेळी मंडळ अधिकारी विकास वाघ, ग्राम महसूल अधिकारी सीमा राजळे, पोलिस पाटील श्रीमती सोनगिरे ,पोलिस कर्मचारी लोखंडे, खांबाट उपस्थित होते.

# ५४२ मोटार अपघात दावे प्रकरणात ४ कोटी ३० लाखांची नुकसान भरपाई; पक्षकारांना संपर्क साधण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.८(जिमाका)- जिल्हा न्यायालयात जुन्या व निकाली निघालेल्या ५४२ मोटार वाहन अपघात दावे प्रकरणातील ४ कोटी ३० लाख ६२ हजार ८१५ रुपये नुकसान भरपाईची अवितरीत रक्कम संबंधित पक्षकारांना देण्यात येणार आहे. या सर्व पक्षकारांची यादी ु.रीरपसरलरव.वर्लेीीी.सीं. ळप या संकेतस्थळावर व जिल्हा न्यायालयाच्या सुचना फलकावर आहे. संबंधित पक्षकारांनी जिल्हा न्यायालयात संपर्क साधून आपली रक्कम प्राप्त करुन घ्यावी,असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव वैशाली फडणीस यांनी केले आहे.

सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशान्वये जिल्ह्यातील मोटार अपघात दावे प्रक्ररणातील अवितरीत रक्कम संबंधिताना प्रदान करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यात एकूण ५४२ प्रकरणात ४ कोटी ३० लाख ६२ हजार ८१५ रुपयांची नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. ही रक्कम अवितरीत आहे. अशा ५४२ लोकांची यादी ही www.aurangabad.dcourts.gov.in या संकेतस्थळावर व जिल्हा न्यायालयाच्या सुचना फलकावर आहे. लोकांनी ही यादी पहावी. त्यानुसार येत्या आठ दिवसांच्या आत संबंधितांनी आपल्या रकमा सहा. अधीक्षक, वित्त व लेखा विभाग, ३ रा मजला, जिल्हा सत्र न्यायालय, छत्रपती संभाजीनगर येथे समक्ष उपस्थित राहून रक्कम तात्काळ घेऊन जावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी सहा. अधीक्षक लेखा विभाग ०२४०-२३५३१५८, प्रबंधक जिल्हा व सत्र न्यायालय ०२४०-२३३४८३९, अधीक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण -८५९१९०३६२० या क्रमांकावर संपर्क साधावा,असेही आवाहन करण्यात आले आहे.

# पाल येथील दारूचे दुकान बंद करण्यासाठी ग्रामस्थ एकवटले

सिल्लोड फुलंब्री (प्रतिनिधी ) गावातील शाळकरी मुलं, महिला, वडीलधारी माणसं हे दारूपाई अक्षरशः व्यथित झालेले असल्याने पाल येथील सर्वपक्षीय कार्यकर्ते/पदाधिकारी व ग्रामस्थान्नी शासकीय नियमावलीची परिपूर्ण पूर्तता करण्यासाठी संघर्ष समितीची स्थापना करून संविधानिक मार्गाने दारूचे दुकान बंद करण्याची प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,

पाल येथील दारूचे दुकान बंद करणे बाबतचा ग्रामसभेचा ठराव जोडून मा.जिल्हाधिकारी व अधीक्षक,राज्य उत्पादक शुल्क यांना दिनांक ०६/०७/२०२३ रोजी निवेदन देण्यात आले होते. त्यावर मुंबई दारुबंदी (ग्रामसभा ठराव पारित केल्यामुळे अथवा नगर परिषद,



महानगर पालिकेच्या वार्डातील मतदारांनी निवेदन दिल्यामुळे बंद करणे) आदेश २००८ नुसार व सुधारीत अधिसुचना १२ फेब्रुवारी २००९ मधील अंतर्भुत केलेल्या तरतुदीनुसार पुर्तता होवु शकत नाही त्यामुळे मो.पाल ता. फुलंब्री जि.औरंगाबाद येथील देशी दारु दुकान गावाबाहेर हलविण्यांत यावे(बंद करण्यात यावे)असे दि ०६-०७-२०२३ रोजी सादर केलेला विनंती अर्ज/निवेदन दसरी दाखल करण्यात येत आहे. असे अधीक्षक राज्य उत्पादक शुल्क छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून दि ०१/०८/२०२३ रोजीचा पत्राद्वारे कळविलेले होते.

अधीक्षक,राज्य उत्पादक शुल्क छ. संभाजीनगर यांनी कळविल्या प्रमाणे पाल येथील सर्वपक्षीय कार्यकर्ते/पदाधिकारी आणि ग्रामस्थ एकत्र येऊन दारूचे दुकान बंद करण्यासाठी मुंबई दारुबंदी आदेश २००८ नुसार व सुधारीत अधिसुचना १२ फेब्रुवारी २००९ मधील अंतर्भुत केलेल्या तरतुदीनुसार पुढील प्रमाणे ३ टप्पे यशस्वी राबविण्यासाठी सर्वांनी आपापले मोलाचे योगदान देण्याचे दिनांक १ मे २०२५ रोजी ठरविले.

निवेदनावर २५ टक्के पेक्षा जास्त महिलांच्या स्वाक्षरी घेणे, स्वाक्षरी करून निवेदन दाखल झाल्यानंतर निवेदनावर करण्यात आलेली स्वाक्षरी/अंगठा राज्य उत्पादक शुल्कचे निरीक्षक/कर्मचारी यांच्या समोर पडताळणी व राज्य उत्पादक शुल्क कार्यालयाकडून/ तहसील कार्यालयाकडून विधिवत मतदान प्रक्रिया राबवून गावातील दारूचे दुकान बंद करण्यासाठी सर्वपक्षी कार्यकर्ते पदाधिकारी व ग्रामस्थांनी यावेळी निर्णय घेतलेला आहे.

# शिवसेनेच्या शिवकार्य अभियान अंतर्गत शिवसेनेची सदस्य नोंदणी सुरू



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.८ मे

शिवसेनेच्या शिवकार्य अभियान अंतर्गत शिवसैनिकांनी मतदारसंघातील प्रत्येक गाव,वाडी वस्त्यांमध्ये शिवसेनेची सदस्य नोंदणी करून युवकांची मजबूत फळी निर्माण करा असे आवाहन युवानेते तथा माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी केले.सोयगाव तालुक्यातील फर्दापूर येथे युवानेते अब्दुल समीर यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवकार्य सदस्य नोंदणी बाबत आढावा बैठक पार पडली.या आढावा बैठकीस उपस्थितांना मार्गदर्शन करतांना अब्दुल समीर बोलत होते.पुढे बोलत असताना अब्दुल समीर म्हणाले की, शिवसेना नेते व उपमुख्यमंत्रीपद एकनाथराव शिंदे यांनी घेतलेले जनकल्याकारी निर्णय व योजनांची माहिती तसेच आमदार अब्दुल सत्तार यांनी मतदारसंघात केलेल्या विकास कामांची माहिती घराघरात पोहचवून सर्व सामान्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी शिवसैनिकांनी पुढाकार घ्यावा,पक्ष संघटनेवर भर द्या.महिलांचे संघटन करा,युवकांची मजबूत फळी निर्माण करा.,आगामी प्रत्येक निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्याच्या दृष्टीने सज्ज व्हा असे आवाहन अब्दुल समीर यांनी याप्रसंगी केले.या बैठकीस शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती दारासिंग चव्हाण,शिवप्पा चोपडे, शिवसेना तालुकाप्रमुख धरमसिंग चव्हाण,शहर प्रमुख संतोष बोडखे,सोयगाव नगर पालिकेतील शिवसेनेचे गटनेते अक्षय काळे,युवा सेनेचे कुणाल राजपूत,जिल्हा परिषद माजी सदस्य गोपीचंद जाधव,इलियास पठाण, मोतीराम पंडित,राजू दुत्तोंडे,फिरोज पठाण,विलास वराडे, अशोक खेडकर,नारायण घनगाव,रवींद्र बावस्कर,भीमराव बोराडे,तारीख शेख,मेघराज राठोड,गजानन ढगे,विनोद जाधव,शेख मुख्तार,अजीम शेख,राजेश दिंडे,श्रावण चव्हाण,सांडू मानसिंग,हिरा चव्हाण,शिवाजी राजपूत, शिवदास राजपूत,नाजिम पठाण,सिराज पठाण,नारायण मानसिंग,गणेश खैरे,सलीम खा पठाण,अनिस खा पठाण, ज्ञानेश्वर वारांगणे,श्रावण राठोड आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी प्रमुख कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

# राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सत्कार

छत्रपती संभाजीनगर, दि.८ - राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांचा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात मंगळवारी (दि.६) सत्कार करण्यात आला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील बजाज अध्ययन संकूल येथे हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमास मनपा आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. अविंद गायकवाड, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. भरत सोनवणे, डॉ. बालाजी गोरे, डॉ. वैशाली उणे, डॉ. गायत्री तडवलकर तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी व डॉक्टर्स आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी व अधिष्ठाता डॉ. सुक्रे यांनी श्री. वाघमारे यांनी वैद्यकीय शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव असतांना केलेल्या कार्याची आठवण सांगून त्यांच्या कार्यकाळातील रुग्णहिताच्या निर्णयांची व उपक्रमांच्या आठवणी सांगितल्या. वाघमारे यांनी प्रशासकीय सेवेतून शोषितांच्या सेवेची संधी मिळाली. ही सेवा आपण केली. सेवा ही नम्र भावनेने केली, अशा शब्दात आपल्या भावना सत्काराला उत्तर देतांना व्यक्त केल्या. प्रास्ताविक डी.जे.वाकोडे यांनी केले. सुत्रसंचालन अक्षता अंभारे यांनी तर डॉ. काशिनाथ राऊळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा

छत्रपती संभाजीनगर, दि.८ - पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. हे अर्ज ऑनलाईन पद्धतीने करण्याची सुविधा उपलब्ध आहे. एखाद्या योजनेसाठी अर्ज केल्यानंतर दरवर्षी पुन्हा अर्ज करावे लागू नये, यासाठी पाच वर्षे प्रतिक्षा यादी ठेवण्याची सोय केली आहे. सन २०२५-२६ या वर्षात पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री, शेळीपालक असे पर्याय निवडण्याची सोय देण्यात आली आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी https://ah.mhabms.com वर अर्ज करावा. तसेच AH-MAHABMS या मोबाईल पवर सुद्धा अर्ज करता येणार आहे. हे प गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. ऑनलाईन अर्ज दि.१ जून २०२५ पर्यंत करता येणार आहेत. अधिक माहिती वा तांत्रिक अडचणींसाठी १९६२ याता टोल फ्री क्रमांकावर सोमवार ते शनिवार सकाळी ७ ते सायं.६ यावेळात संपर्क साधावा अथवा नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखाना, पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती, जिल्हा परिषद, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

ऑनलाईन अर्ज मागविणे व लाभार्थी निवड प्रक्रियेचे वेळापत्रकही विभागाने जाहीर केले आहे. दि.२ जून पर्यंत ऑनलाईन अर्ज स्विकारणे, दि.३ ते ७ जून- रॅन्डमायझेशन पद्धतीने लाभार्थ्यांची प्राथमिक निवड, दि.८ ते १५ जून मागील वर्षी तसेच या वर्षीच्या लाभार्थ्यांमार्फत कागदपत्रे अपलोड करणे, दि.१६ ते २४ जून पशुधन विकास अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्यामार्फत कागदपत्रे पडताळणी करुन निवड पूर्ण करणे, दि.२५ ते २७ जून लाभार्थ्यांमार्फत कागदपत्रातील त्रुटी दूर करणे, दि.२८ -३० जून कागदपत्रे अंतिम पडताळणी, दि.१ जुलै राखीव व दि.२ जुलै रोजी अंतिम लाभार्थी पात्रता यादी तयार करणे असा कालबद्ध कार्यक्रम जाहीर केला असून लाभार्थ्यांनी अर्ज करावे,असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. एन.एस. कदम यांनी केले आहे.

## संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध लोकोपयोगी मशिनरीची पाहणी

छत्रपती संभाजीनगर दि.८: केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री विरेंद्र कुमार व राज्याचे सामाजिक न्याय मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध लोकोपयोगी मशिनरीची पाहणी केली. केंद्रीय मंत्री श्री. कुमार यांनी महानगरपालिकेच्या तांत्रिक सुसज्जतेबद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी आ. अनुराधा चव्हाण, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील, यांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता प्रेषित वाघमारे, शुभम भुमरे व यंत्रचालक उपस्थित होते.

## रोशनगेट उपकेंद्रावरील ६ हजार ग्राहकांना मिळणार अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा

### 10 एमव्हीएचा नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित


छत्रपती संभाजीनगर : रोशनगेट परिसरातील ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणने ३३ केव्ही उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ केली आहे. रोशनगेट उपकेंद्रातील १० एमव्हीएचा ट्रान्सफॉर्मर बुधवारी (७ मे) कार्यान्वित करण्यात आला. यामुळे ६ हजार वीजग्राहकांना दिलासा मिळाला आहे. रोशनगेट उपकेंद्रात १० व ५ एमव्हीए क्षमतेचे दोन पॉवर ट्रान्सफॉर्मर होते. उपकेंद्रातून परिसरातील जवळपास ११ हजार ग्राहकांना वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र दिवसेंदिवस वाढणारी ग्राहकांची संख्या व विजेच्या मागणीमुळे जसवंतपुरा फीडरवर परिसरास सुरळीत वीजपुरवठा करण्यात अडथळा निर्माण होत होता. यावर उपाय म्हणून महावितरणने संचालक (संचालन) अरविंद भादिकर, प्रभारी व्यवस्थापकीय संचालक धनंजय औंढेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० मध्ये उपकेंद्रात ५ एमव्हीएच्या पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ करून तो १० एमव्हीए करण्याचा निर्णय घेतला.

## शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांचे पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर यांच्या हस्ते सत्कार



सोयगाव,दि.८ मे - सोयगाव केंद्रांतर्गत महाराष्ट्र राज्य परिक्षा-२०२५ शिष्यवृत्ती परिक्षेत विद्यार्थी पात्र झाल्याबद्दल सोयगाव पोलीस ठाण्याच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,डॉ.प्रविण पाटील,कृषी भूषण व समाजसेवक अरुण सोहनी,पत्रकार योगेश बोखारे,समाजसेवक तथा आरोग्य दूत डिंगाबर वाघ यांच्या वतीने शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेले विद्यार्थी साई योगेश बोखारे,सुरज राजू कुडके,सायली आन्ना वाघ,वेदांत शरद पवार यांचा फुलगुच्छ व भेट वस्तू देऊन सन्मानित करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सूर्यभान बोडखे यांचे निधन



सोयगाव,दि.२ मे - येथील सूर्यभान महादू बोडखे (वय.६२) यांचे दि.८ गुरुवार रोजी सकाळी १०:०० वा.अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर संध्याकाळी ५:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे,असा परिवार आहे.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२४/२०२५ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ०-००-२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **देवेश रमेश जाधव** यांनी मोहल्ला **वार्ड क्र. १५** स.नं. ----- मधील प्लॉट **१३३८/२** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : समाधान कचरू चौधरी यांची जागा** **पश्चिम : ६ मिटर चा रस्ता**
**दक्षिण : ९ मिटर चा रस्ता** **उत्तर : दिलीप विक्रम पाटील यांची जागा**

आकार : पूर्व पश्चिम **१०३२** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

## अग्रलेख...

# दहशतीचे उत्तर दबंगाईनेच दिले पाहिजे

पहलगाममधील भ्याड हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर केलेला हवाई हल्ला हे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाला दिलेले दबंग स्वरूपाचे उत्तर आहे. या कारवाईने पाकिस्तानची घाबरगुंडी उडणे आणि उर्वरित जगाला आश्चर्य वाटणे स्वाभाविकच. कारण विश्वशांतीसाठी निरंतर प्रयत्नशील असलेल्या भारताचा हा स्वभाव नाही. परंतु, यावेळी भारताचा नाईलाज झाला. कितीही शांतता पाळली, संयम दाखविला तरी आपल्या अंगावर कुणी वारंवार धावून येत असेल, आपल्या निरपराध नागरिकांची निर्घृण हत्या करीत असेल तर असा दबंगपणा आवश्यकच असतो. शक्तिशाली माणसाचाच शांतिपाठ जग ऐकत असते ही रीत आहे. त्यामुळे आपण शक्तिशालीच नव्हे तर महाशक्तिशाली आहोत, हे दाखविणे भारताला भाग होते. भारताच्या तिन्ही सैन्य दलांनी मिळून पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर केलेली लष्करी कारवाई हा आमच्यावरचा हल्ला आहे, असे पाकिस्तानला कितीही म्हणू देत; वास्तव असे की, जशास तसेच उत्तर द्यावे लागते आणि तेच भारताने दिलेले आहे.

हजारो वर्षांचा इतिहास असलेला भारत हा देश शांतता, सहिष्णुता आणि जागतिक सौहार्दाचा पुरस्कार करणारा देश आहे. धर्माधिष्ठित फाळणीनंतर निर्माण झालेल्या पाकिस्तानला या इतिहासाचा काहीच गंध उरलेला नाही. फाळणीच्या आधी आपली सध्याची भूमी ही त्याच हिंदू पुण्यभूमीचा भाग होती, हे पाकिस्तानी सरकार, तिथले दहशतवादी आणि तिथले लष्कर पूर्णपणे विसरले. त्यामुळेच त्यांना भारत सदैव शत्रूच वाटत राहिला. त्याचसाठी त्यांनी नेहमी दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले, रसद पुरविली आणि पाठिंबा दिला. भारताचा अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमला पाकिस्तानने आश्रय दिला. भारतीय संसदेवरील हल्ल्यापासून पुलवामा आणि पहलगामपर्यंत सर्व अतिरेकी हल्ल्यांचे धागेदोरे पाकिस्तानशी जुळलेले. दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये धर्म विचारून भारतीय नागरिकांना गोळ्या घातल्या आणि वरून तुमच्या पंतप्रधानांना जाऊन सांगा, अशी गुर्मीही दाखविली. तरीही भारताने प्रत्युत्तर द्यायचे नाही, अशी पाकिस्तानची अपेक्षा असेल तर ती चूक आहे. असे पाकिस्तानमध्ये घडले असते तर तो देश शांत बसला असता काय? दहशतवादाला ताकदीनिशी प्रत्युत्तर देण्यास भारताला भाग पाडले गेले आहे. पाकिस्तान दहशतवादाला पाठिंबा देतो की, तिथले सरकार व लष्करच दहशतवादी चालवितात, हेच जगाला कळेनासे झालेले आहे. सरकार आणि दहशतवाद यांच्यातील दिलदारी सर्वज्ञात आहे. अशा स्थितीत लष्करी कारवाई करणे न्याय्य, नैतिक आणि अपरिहार्य ठरते.

पाकिस्तानी नागरिक अजमल कसाबने केलेल्या २६/११ च्या मुंबई हल्ल्यामागील चिथावणीपासून ते पाकिस्तानी भूमीवर असलेल्या मसूद अझहर आणि हाफिज सईद यांच्यासारख्या जागतिक पातळीवर कुख्यात असलेल्या दहशतवाद्यांना पोसण्याच्या पापापर्यंत सारेच पाकिस्तान वारंवार करीत आला आहे. शांतताप्रिय भारताच्या संयमाची परीक्षा वारंवार घेतली गेली. बहुतेकदा भारताने संयम राखला. पण, संयमाची किंमत वारंवार निष्पापांच्या जिवाने मोजावी लागत असेल तर त्याचा त्याग करावा लागतो. अहिंसेची स्थापना करण्यासाठी काही वेळा हिंसा न्याय्य ठरते. तेच भारताने केले आहे. पहलगाम हल्ला हा समस्त भारतीयांसाठी मानसिक धक्का होता. यातून सारेच तत्काळ सावरले. केंद्र सरकारने तयारी केली आणि घरात घुसून मारण्याची आपली क्षमता असल्याचे जगाला दाखवून दिले. भारतासोबत सतत असे घडत राहिले तरी तो शांत राहील, अशी स्थिती राहिलेली नाही. यह नया भारत है, असे लोक उगाच म्हणत नाहीत. भारत ही जगातील पाचवी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था आहे. ती लवकरच चौथ्या क्रमांकावर येणार असल्याचा अंदाज जागतिक पातळीवर वर्तविला जात आहे. पृथ्वीवरील सर्वांत शक्तिशाली सशस्त्र दलांपैकी एक लष्कर भारताचे. तथापि, भारताने कधीही कुणाचा भूभाग हडपण्यासाठी किंवा वर्चस्व गाजवण्यासाठी आपल्या शक्तीचा वापर केलेला नाही. दहशतवादाची जगभरात निर्यात करणाऱ्या पाकिस्तानसारख्या वाहियात देशांमध्ये आणि संकटाच्या प्रसंगी संपूर्ण मानवतेच्या मदतीला धावणाऱ्या भारतामध्ये हा सर्वांत मोठा फरक. भारताच्या सहनशीलतेला कमकुवतपणा समजण्याची नादानी आतापर्यंत पाकिस्तानने वारंवार केली. २०१६ मध्ये उरी हल्ल्यानंतर झालेल्या सर्जिकल स्ट्राईकने पाकिस्तान आणि त्यांच्या दहशतवादी पिलावळीने सुधारायला हवे होते. तसे झाले नाही. पहलगाममध्ये त्यांनी अधिक धारिष्ट्य केले. त्याची किंमत भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे तळ ध्वस्त करून वसूल केली आहे. भारत हे शांततेला प्राधान्य देणारे राष्ट्र असले तरी त्याला गृहीत धरता येत नाही, हेही आपल्या लष्कराने दबंगगिरी करीत सांगून टाकले आहे. हे करताना देखील भारताने नागरिकांना आणि अन्य ठिकाणांना हानी पोहोचणार नाही, याची काळजीच घेतली. पाकिस्तानला अशी मानवता कधी दाखविता येईल? आमच्यावर अन्याय झाल्याचे रडगाणे गाणाऱ्या पाकिस्तानचे पंतप्रधान, लष्करप्रमुख, आयएसआयचे प्रमुख यांच्यातल्या कुणीही याचे उत्तर देऊ शकत नाही. लष्करावर पूर्णपणे अवलंबून असलेले आणि भारतद्वेषाने पछाडलेले सत्ताधीश, स्वार्थासाठी देशाच्या सत्तेवर अंकुश ठेवू इच्छिणारे लष्कर आणि सतत भारताच्या व हिंदूंच्या विरोधात प्रचार करणाऱ्या मुल्ला-मौलवींच्या छत्रछायेत तयार झालेली पाकिस्तानी जनतेची मानसिकता असे चित्र असेल तर त्या देशाला कोणतेही भविष्य नाही. भारताने कधीही धर्मांधतेला थारा दिला नाही. त्याने ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान यांत जगाच्या बरोबरीने प्रगती केली. भारतीय डॉक्टर्स, अभियंते, शास्त्रज्ञ यांचा जगात डंका वाजतो. आणि पाकिस्तानचे नाव गाजते ते दहशतवाद्यांसाठी! खरे तर पाकिस्तानच्या सत्ताधीशांना या गोष्टीची लाज वाटली पाहिजे. अशा गोष्टींवर विचार व कृती करायची सोडून समस्त पाकिस्तानी व्यवस्था भारताच्या विरोधात कुरघोड्या करण्याच्या मागे असेल तर कधी तरी त्याला असा धडा शिकवायलाच हवा होता. अजमल कसाब हे पाकिस्तानचे अपत्य. अतिरेक्यांना आश्रय देण्याच्या पाकिस्तानच्या परंपरेचे प्रतीक म्हणून त्याने भारतात येऊन हल्ला केला. आजही पाकिस्तानात हाफिज सईद भारतद्वेषाचा प्रचार करीत मुक्तपणे फिरतो. संयुक्त राष्ट्रांनी जागतिक दहशतवाद्यांच्या यादीत नाव टाकले असले तरी मसूद अझहर हा तिथल्या राज्यकर्त्यांचे आतिथ्य उपभोगतो. जगातील सर्वांत खतरनाक दहशतवादी ओसामा बिन लादेन अफगाणिस्तानातील गुहांमध्ये लपलाय, असे वाटत होते. पण, त्याला पाकिस्तानने आश्रय दिला होता. पाकिस्तानच्या लष्करी अकादमीपासून थोड्या अंतरावर असलेल्या अबोटाबादमधील एका बंगल्यात ओसामा राहत होता. अमेरिकन लष्कराने तेथे थेट जाऊन त्याला ठार केले. अमेरिकेचे ते कृत्य बरोबर असेल तर भारताचेही बरोबरच आहे. अद्याप शांततेची पुंगी वाजवीत असलेल्या देशी व विदेशी थोर माणसांनी आता तरी भारताची कारवाई जागतिक परिप्रेक्ष्यात समजून घेतली पाहिजे. अमेरिकेने पाकिस्तानची परवानगी न घेता ओसामा बिन लादेनला संपवण्याचा आपला अधिकार वापरला. इस्रायलने गाझा आणि वेस्ट बँकमध्ये हमासच्या कार्यकर्त्यांना संपवण्यासाठी वारंवार लक्षित कारवाया केल्या. आपल्या देशावर किंवा नागरिकांवर परकीय शक्ती हल्ला करतो तेव्हा स्वसंरक्षणासाठी कुणाची परवानगी घेण्याची रीत नाही, असेच ही उदाहरणे सांगतात. भारताची कारवाई याच उदाहरणांत बसणारी आहे. भारताने हवाई हल्ल्यांच्या माध्यमातून पाकिस्तानी जनतेला किंवा पायाभूत सुविधांना लक्ष्य केले नाही. पाकिस्तानी व्यवस्थेचे संरक्षण असलेल्या व दहशतवाद्यांकडून वापरल्या जात असलेल्या शिक्षण शिबिरांना आणि लाँच पॅड्सना लक्ष्य केले. त्यात जे ठार झाले, त्यांचा संबंध दहशतवादाशीच होता. दहशतवादाची मुळे खोलवर गेलेली आणि शाखांचा विस्तार नजरेच्या टप्प्यांत न येणारा असतो. त्यामुळे त्याला लांबी-रुंदीसह संपवायचे असते. सापावर दया दाखवायची नसते. ती दाखविली तर अंत निश्चित असतो. अमेरिकेला त्यांनी छळले. युरोपमध्ये अस्थिरता निर्माण केली. आशियातही त्यांच्या कारवायांना सुमार राहिलेला नाही. दहशतीला दबंगाईनेच उत्तर द्यायचे असते. ते देण्याची ही नुसती सुरुवात आहे. आगे-आगे देखिए होता है क्या!

## विशेष

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर**

# भारताने ताकद दाखवली

७ मे या दिवसाची भारतच नव्हे, तर जग आवर्जून नोंद घेत राहील. कारण याच दिवशी पहलगाममध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांनी घडवून आणलेल्या भ्याड हल्ल्याला तीव्र स्वरूपाचे प्रत्युत्तर दिले गेले. निरपराध पर्यटकांवर गोळीबार करणाऱ्या, जीवे मारताना धर्म विचारणाऱ्या पाशवी वृत्तीला मिळालेली ही सणसणीत चपराक म्हणायला हवी. पहलगाममधील घटनेनंतर भारत या हल्ल्याचा बदला कधी घेणार, हा प्रश्न विचारला जात होता. मात्र एकीकडे सर्वसामान्य जनता बहुचर्चित मॉक ड्रीलच्या तयारीत असताना भारताने एअर स्ट्राईक केला. याला 'ऑपरेशन सिंदूर' असे भावस्पर्शी नाव दिले गेले. यापूर्वी आपण उरी हल्ला पाहिला आहे. मात्र, त्या आणि ताज्या हल्ल्यामधील गुणात्मक फरक जाणून घेणे तसेच त्या अनुषंगाने अन्य बाबींवर चर्चा करणे गरजेचे आहे.

पहिली बाब म्हणजे पूर्वीचा उरी हल्ला व्याप्त काश्मीरपर्यंतचा होता. तेथील जैश-ए-महम्मद वा लष्कर-ए-तोयबा या गेल्या दोन दशकांपासून भारत आणि विशेषतः जम्मू आणि काश्मीरमध्ये हिंसाचार पसरवण्याचे काम करणाऱ्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना उद्ध्वस्त करण्याचे काम या पहिल्या सर्जिकल स्ट्राईकने केले. आजचा आपला ताजा हल्ला गुणात्मकदृष्ट्या वेगळा आहे. यावेळी आपण व्याप्त काश्मीरमधीलच नव्हे, तर पाकिस्तानमधील दहशतवादी अड्डेही लक्ष्य केले. त्यांच्या पंजाब प्रांतातील जैश-ए-महंमदचा गड उद्ध्वस्त केला. तेथील सर्वांत मोठ्या मशिदीतील मदरसे भुईसपाट केले. येथूनच दहशतवादी कृत्यांसाठी तरुणांना भडकवण्याचे आणि तयार करण्याचे काम होत होते. हे प्रशिक्षित दहशतवादी तालिबान, इसिस, अल कायदासारख्या दहशतवादी संघटनांसाठी कार्यरत होत होते. अझर मसूदने उभारलेले तेच बहावलपूरमधील ठाणे आपण उद्ध्वस्त केले तसेच सीमारेषेपासून २० किलोमीटर आतमध्ये लष्कर-ए-तोयबाचा भागही उद्ध्वस्त केला आहे. म्हणजेच व्याप्त काश्मीरपुरते मर्यादित न राहता आता आपण पाकिस्तानमधील अंतर्गत ठिकाणांवरही हल्ला चढवला आहे. हल्ल्यातील हे वेगळेपण नोंद घेण्याजोगे आहे.

इथे मांडण्याजोगा दुसरा मुद्दा म्हणजे पाकिस्तानकडून बालाकोटाचा हल्ला झाल्याचे मान्य करण्यात आले नव्हते. यावेळी पाकिस्तानने अधिकृतपणे आपल्या देशातील नऊ ठिकाणांवर भारताने हल्ला केल्याचे स्पष्ट केले आहे. यात किती जणांचे प्राण गेले, किती जखमी झाले याची आकडेवारीही सांगितली आहे. तिसरी



बाब म्हणजे मागील हल्ल्याप्रसंगी आपली लढाऊ विमाने नियंत्रण रेषा ओलांडून आत घुसली होती. यावेळी आपण ही सीमा पार केली नसून आपल्याच हद्दीमधून त्यांना उडवले आहे. यावरूनही आपल्या लढाऊ विमानांची, क्षेपणास्त्रांची, हल्ल्याची क्षमता सिद्ध होते. आपल्याकडे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ आहे. या माध्यमातून सैन्याच्या तिन्ही दलांमध्ये एकवाक्यता आणि सुसूत्रता आहे. परिणामस्वरूप ताजा हल्ला एअरफोर्स आणि ग्राऊंड फोर्स यांच्या एकत्रित साहाय्याने पूर्ण केला गेला. त्यामुळेच तो संघटित होता, सुनियोजित होता. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या हल्ल्यात आपण एकाही सामान्य नागरिकाला, पाकिस्तानमधील लष्करी आस्थापनांना नुकसान पोहोचविलेले नाही. त्यामुळेच आपल्यावर कोणीही आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग केल्याचा आरोप करू शकत नाही.

खरे तर भारत हा अत्यंत संयमी, जबाबदार देश आहे. अगदी इतिहास काळापासून पाहिले तरी आपण कधीच कोणावर प्रथम हल्ला केलेला नाही, हे दिसते. आताही आपण तसे करत नाही. त्यामुळेच भारताने केलेल्या ताज्या हल्ल्याचे स्वरूप धोका असणारी ठिकाणे आधीच उद्ध्वस्त करणे या स्वरूपाचा आहे. स्वाभाविकच संयुक्त राष्ट्र समूहानेही याला मान्यता दिली आहे. याच मुद्यांच्या आधारे इस्रायलने हमास, लेबनॉन, इराणवर अनेकदा हल्ले केले होते. याच मुद्याच्या आधारे अमेरिकेने इराकमध्ये आपले सैन्य घुसवले होते. या पृष्ठभूमीवर पाकिस्तानमधील या भागातील मदरशांमध्ये दहशतवाद्यांची भरती प्रक्रिया आणि प्रशिक्षण होत असल्याचे माहिती असल्यामुळे ही वस्तिस्थाने नामशेष करण्याची आपली कृती समर्थनीय ठरते. तेथे प्रशिक्षण घेणारे दहशतवादी पुढे सीमा ओलांडून भारतात घुसतात आणि नरसंहार घडवून आणतात. त्यांना संपवण्यामागे आपल्यापुढील धोका कमी करणे हाच स्पष्ट हेतू दिसतो.

हे करताना आपल्याकडून कोणत्याही आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन वा भंग झालेला नाही. कारण हा हल्ला कोणत्याही देशावर नसून तेथे शरण घेणाऱ्या दहशतवादी संघटनांवर आहे. असे असतानाही पाकिस्तानकडून सडेतोड उत्तर देण्याची धमकी देण्यात आली आणि काही आगळिक झाली तर मात्र तो आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग असेल, असे सांगितले गेले. पाकिस्तानने आपल्यावर हल्ला करण्याचा निर्णय घेतला तर अर्थातच त्यांना तो भारताच्या लष्करी तळांवर करावा लागेल. येथील सर्वसामान्य नागरिकांवर करावा लागेल. असे केले तर पाकिस्तानकडून युद्धाच्या हेतूने पाऊल टाकले गेल्याचे म्हणता येईल. हा निश्चितच आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग असेल आणि भारताला प्रचंड ताकदीने त्यांना प्रतिकार करण्याचा अधिकार असेल.

पाकिस्तानपुढील प्रश्न आता अधिक जटिल बनले आहेत, यात शंका नाही. हे लक्षात घेऊनच पाकिस्तानने आक्रस्ताळेपणा करण्यास सुरुवात केल्याचे दिसले. भारताने केलेल्या ताज्या हल्ल्यात आपले काही नागरिक, महिला, लहान मुले मारले गेल्याचे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तसा तो सातत्याने होत राहील. कारण भारतावर हल्ला करण्याचे कारण पुढे करायचे तर आपल्याकडे तसे काहीही नाही. आपल्याकडे दहशतवाद्यांची प्रशिक्षणस्थळे नाहीत. भारत कधीही इतर देशांमध्ये दहशतवादी पाठवत नाही. त्यामुळे पाकिस्तान इथे नेमके काय उद्ध्वस्त करणार? हा प्रश्न आहे. याचे कारण शोधण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायापुढे आपले सामान्य नागरिक मारले गेल्याचा कांगावा केला जाईल. पण त्यांचा हा प्रयत्न केविलवाणा म्हणाला लागेल. त्याला यश वा जगाकडून समर्थन, सहानुभूती मिळणार नाही. अर्थात शत्रूला कधीही कमी समजायचे नसते. ताकद नसली तरी पाकिस्तान फणा काढणारच नाही, असे समजून चालणार नाही. आपले एक क्षेपणास्त्र त्यांचे नुकसान घडवू शकत असेल तर त्यांचे एक क्षेपणात्र आपलेही मोठे नुकसान करू शकते. त्यामुळे हल्ला रोखण्यासाठी भारत कोणती पावले उचलतो, कोणती सिद्धता करतो हे आता पाहावे लागेल. माझ्या मते, कितीही वल्गना केल्या जात असल्या, तरी पाकिस्तान प्रत्युत्तर देईल, असे वाटत नाही. कारण त्यांचा कोणताही हल्ला रोखण्यासाठी आपल्याकडे पुरेशी यंत्रणा आहे. त्यांची क्षेपणास्त्रे रोखणारी अर्ली वॉर्निंग सिस्टिम आपल्याकडे आहे.

(लेखक संरक्षण क्षेत्राचे ज्येष्ठ अभ्यासक आहेत.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# अपयशाचा उत्सव!

गुणवत्तायादीत अव्वल येऊन उत्तम यश संपादन करणाऱ्या मुलांचे कौतुक तर सारेच करतात. दहावी-बारावीच्या परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक सर्वत्र आनंद साजरा करताना, एकमेकांना पेढे भरविताना दिसतात. मात्र दुसरीकडे अपयश आलेल्या विद्यार्थ्यांना शिव्यांची लाखोली वाहिली जाते. यशाचा उत्सव साजरा करणे ही तर आपली परंपरा आहे. मात्र अपयशी ठरलेल्या विद्यार्थ्यांना धीर देण्यासाठी, त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी उत्सव करण्याची अशी कुठलीही परंपरा समाजात नाही. मग अपयश आलेल्या विद्यार्थ्यांनी काय करायचे? त्याने पालकांचे, शेजाऱ्यांचे फक्त टोमणे ऐकायचे का? जणू एक परीक्षा नापास झाल्यामुळे त्या विद्यार्थ्यांचे आयुष्यच संपल्यासारखे आपण त्याच्याशी वागू लागतो. पण आपल्या लक्षात हे येत नाही की, असल्या प्रकारांवर त्या अपयशी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास गमविला जातो. काही मुले तर हा धक्का सहन करू न शकल्याने आत्महत्येचा मार्ग सुद्धा निवडतात. मुले असा टोकाचा निर्णय का घेतात? कधी पालकांनी किंवा समाजाने याचा विचार केला आहे का? अपयशी मुलांना कोसणाऱ्या पालकांच्या आणि टोमणे मारणाऱ्या समाजातील लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजण घालण्याचे काम कर्नाटकातील एका कुटुंबाने केले आहे. कल्पनेच्या पलीकडे जाऊन या कुटुंबाने त्यांच्या मुलाच्या अपयशाचा दिवस एखाद्या उत्सवासारखा साजरा केला. कर्नाटकातील बागलकोट येथील बसवेश्वरा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये शिकणारा अभिषेक चोलचागुड्डा हा विद्यार्थी दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत एकूण सहा विषयात नापास झाला. त्याला एकूण ३२ टक्के गुण म्हणजे ६२५ पैकी २०० गुण मिळाले. त्याचा असा निकाल पाहिल्यानंतर पालकांनी त्याला रागाविले नाही तर त्याच्यासाठी सरप्राईज पार्टी आयोजित केली. आपल्या अपयशी मुलासाठी त्यांनी एक खास केक मागविला. संपूर्ण कुटुंबासह अभिषेकने केक कापून सर्वांना मिठाई वाटली. आणि हे सगळे करताना अभिषेकच्या चेहऱ्यावर हास्य होते. अभिषेकचे वडील यल्लप्पा चोलचागुड्डा म्हणतात की, अभिषेकला परीक्षेत ३२ टक्के गुण मिळाले असले, तो अपयशी झाला असला तरी त्याने परीक्षेदरम्यान खूप मेहनत घेतली होती. वर्षभर परिश्रम घेऊनही त्याला अपयश आले. त्याची मेहनत खरी होती. म्हणून आम्ही त्याच्या परिश्रमासाठी अपयश आल्यानंतरही तो दिवस उत्सवासारखा साजरा केला. यातून तो एकटा नाही, याची आम्ही त्याला जाणीव करून दिली. पुढे जाऊन अभिषेकचे वडील म्हणतात, हा उत्सव त्याचे अपयश लपविण्यासाठी मुळीच नव्हता, तर त्याच्या प्रयत्नांची कबुली देण्यासाठी होता. त्यांच्या मते या छोट्याशा उत्सवामुळे त्यांच्या मुलाचा आत्मविश्वास परत आला, आणि आता तो पुढील प्रयत्नांसाठी पूर्णपणे तयार आहे. वडिलांनी साजरा केलेल्या या उत्सवानंतर अभिषेक म्हणाला, मला माझ्या कुटुंबाने अपयश आल्यानंतर एकटे पडू दिले नाही. आता मी पुढच्यावेळी नक्कीच यशस्वी होणार. मुळात मुलांना परीक्षेत मिळालेल्या गुणांवरून पालक मुलांची हुशारी ठरवीत असतात.

अपेक्षेप्रमाणे परीक्षेत गुण मिळाले नाही तर पालक मुलांवर रागावतात, संताप व्यक्त करतात. परिणामी अपयशी ठरलेली मुले घरातील तणावग्रस्त वातावरणामुळे मानसिकरीत्या खचून जातात. आणि टोकाचे पाऊल उचलतात. प्रत्येकच पालकाला आपला मुलगा डॉक्टर किंवा इंजिनीअर व्हावा आणि तो देखील नामांकित संस्थेमधून व्हावा अशी अपेक्षा असते. आपण मुलांची आवड, त्यांची क्षमता, त्यांच्या सभोवतालचे वातावरण या गोष्टींकडे दुर्लक्ष करून यशाचे मोजमाप करताना त्याला मिळालेल्या गुणांच्या आकडेवारीवर नजर राखून धरतो. सध्या इथेच पालक चुकत आहेत. अपयश आलेल्या विद्यार्थ्यांना टोमणे मारण्यापेक्षा, त्यांना कोसण्यापेक्षा, त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केल्यास अपयश आलेले विद्यार्थी सुद्धा भविष्यात उंच भरारी घेऊ शकतील. केवळ दहावी किंवा बारावीच्या परीक्षेत मिळालेल्या गुणांवरून त्यांची हुशारी ठरविण्यापेक्षा अपयश आलेल्या विद्यार्थ्यांना समजून घेतल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढेल. खऱ्या अर्थाने अपयशी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी फेल्युअर पार्ट्यांच्या आयोजनाची गरज आहे. आयुष्यात अनेक चढ-उतार येतच राहणार. परीक्षा म्हटलं की कुणीतरी पास, कुणीतरी नापास होणार. अशा क्षणी पुन्हा एकदा नव्या जोमाने संघर्ष करण्यासाठी आपल्या मुलाला किंवा मुलीला मानसिक आधार देणे पालकांचे कर्तव्य आहे. अपयशाने निराश न होता, पुन्हा अभ्यास करून स्पर्धेच्या युगात ताठ मानेने पाल्याला उभे करणे, त्याच्यात सकारात्मक विचार रुजवणे आवश्यक आहे. हिंमत न हारता, तू चालत राहा. आम्ही तुझ्या पाठीशी आहोत, असा भाव त्याच्यात निर्माण केला पाहिजे. अभिषेकच्या अपयशाचा उत्सव विद्यार्थ्यांना टोकाचे पाऊल उचलण्यापासून नक्कीच वाचवू शकेल.

९९२२९९९५८८

# बलिदानातून गोत्रजांचा उद्धार करणारी वासवी माता

## विशेष

**- डॉ. सचिन लादे**, पंढरपूर (७५८८२१६५२६)

आंध्र प्रदेशातील पश्चिम गोदावरी जिल्ह्यातील थानकुसा तालुक्यात पेनुगोंडा नावाचे एक गाव आहे. प्राचीन काळी पेनुगोंडा हे राज्य होते, या राज्यामध्ये राजा कुसुमश्रेष्ठी व राणी कुसुमांबा हे राज्य करत होते. या दांपत्याला बऱ्याच वर्षानंतरही मूल होत नव्हते म्हणून ते आपले गुरु भास्कराचार्य यांना शरण गेले. भास्कराचार्यांनी राजा कुसुमश्रेष्ठीला पुत्रकामेष्टी यज्ञ करण्यास सांगितले. आपल्या गुरुच्या आज्ञेप्रमाणे कुसुमश्रेष्ठींनी यज्ञ केला व या यज्ञामुळे देवता प्रसन्न झाल्या, त्यांनी यज्ञेश्वरामार्फत प्रसाद दिला आणि त्याचवेळी आकाशवाणी झाली, की हा प्रसाद ग्रहण केल्यानंतर कुसुमश्रेष्ठी - कुसुमांबा यांना आपत्य होईल, त्याचवेळी सर्व देवतांनी त्यांना आशीर्वाद दिला. त्यानंतर कुसुमांबा यांनी वैशाख शुद्ध दशमी, वार शुक्रवार, उत्तरा नक्षत्रावर कन्या राशीमध्ये दोन जुळ्यांना जन्म दिला. मुलाचे नाव वीरूपाक्ष व मुलीचे नाव वासवी ठेवण्यात आले. अत्यंत संस्कारी वातावरणात विरूपाक्ष व वासवी हे दोघे हळूहळू मोठे होत होते.

याचवेळी क्षत्रियांचा राजा विष्णूवर्धन हा युद्धामध्ये विजय मिळवून आपल्या राज्यात परत जाताना पेनुगोंडा या राज्यात आला, त्यावेळी राजा कुसुमश्रेष्ठींनी त्यांचे आदरातिथ्य करून विजयी मिरवणूकही काढली. या समयास आपल्या परिवाराची कुसुमश्रेष्ठींनी राजा विष्णुवर्धन यास परिचय करून दिला, त्यावेळेस वासवीला पाहून राजा विष्णुवर्धन प्रभावीत झाला व तो तिच्या प्रेमात पडला. राजा विष्णुवर्धन आपल्या राज्यात परतला खरा, परंतु त्याच्या मनात सातत्याने वासवीबरोबर विवाह करण्याचा विचार घोळत होता. खरे तर विष्णुवर्धन हा राजा विवाहित होता, त्यास पत्नी व आपत्येदेखील होती. तसेच तो वेगळ्या कुळामध्ये - वर्णामधील होता, तरीही वासवीबरोबर लग्न करण्याचा त्याने विचार पक्का करून तशी मागणी राजा कुसुमश्रेष्ठी यांच्याकडे केली.

विवाहाचा प्रस्ताव देऊन राजा विष्णुवर्धन यांनी आपले प्रतिनिधी पेनुगोंडास पाठविले. या प्रस्तावावर विचार करण्यासाठी राजा कुसुमश्रेष्ठीने राजसभा बोलावली. आर्य वैश्यामधील ७१४ गोत्रजांना चर्चेसाठी बोलावण्यात आले. वेगळ्या वर्णामध्ये व विवाहित असणाऱ्या राजा विष्णुवर्धन यास आपली कन्या देऊ नये असे राजा कुसुमश्रेष्ठीला वाटत होते. ७१४ पैकी १०२ गोत्रजांचे प्रतिनिधी कुसुमश्रेष्ठींच्या बाजूने होते तर राजा विष्णुवर्धन यांना विरोध केल्यास ते युद्ध लादतील या भीतीने ६१२ गोत्रजांचे प्रतिनिधी वासवी व विष्णुवर्धन यांच्या विवाहाच्या बाजूने उभे राहिले. राजसभेत एकमत होत नसल्याचे पाहून कुसुमश्रेष्ठींना खूप दुःख झाले. आपली कन्या वासवीचा राजा विष्णुवर्धन यांच्याशी विवाह लावून देण्यास कुसुमश्रेष्ठींनी ठाम नकार दिला. ही बातमी समजताच राजा विष्णुवर्धन याने युद्ध करण्याचा निर्णय घेतला. युद्ध करून वासवीला जिंकून तिच्याशी विवाह करण्याचा विष्णुवर्धनने निश्चय केला. ही बातमी पेनुगोंडा येथील नगरात पसरल्यानंतर राजा व प्रजा चिंताक्रांत झाले. ही बातमी समजल्यानंतर आपल्यामुळे आपल्या राज्यावर येणाऱ्या संकटाचा विचार करून वासवीने एक वेगळीच योजना आखली. तिने आपली ही योजना वडिलांना समजावून सांगितली व जे १०२ गोत्रजांचे प्रतिनिधी कुसुमश्रेष्ठींच्या बाजूने उभे राहिले, त्यांना देखील ही योजना सांगण्यात आली. राजा कुसुमश्रेष्ठींनी वासवीच्या आदेशाचे पालन करण्याचा हुकूम काढला. सर्व नगरांमध्ये सजावट करण्यात आली.

कुसुमश्रेष्ठी व १०२ गोत्रजांचे प्रतिनिधी सपत्निक गावातील नगरेश्वर मंदिराजवळ जमा झाले. तेथून सर्वजण वासवीच्या सांगण्यावरून गोदावरी नदीवर आले. तेथे वासवीच्या आदेशाने आधीच १०३ अग्नीकुंडांची तयारी करण्यात आली होती. मधल्या अग्नीकुंडासमोर वासवी स्वतः उभी राहिली आणि १०२ गोत्रज दांपत्यांना प्रत्येक अग्निकुंडासमोर उभे राहण्यास सांगितले. माझ्यामुळे युद्ध लादले जाऊन आपल्या नगरातील प्रजेला त्रास होणार असेल व वेगळ्या वर्णांमध्ये माझा विवाह करून जर परंपरा खंडित होणार असेल तर त्यापेक्षा मी प्राणार्पण करून हे संकट दूर करणार आहे. माझा व गोत्रजांचा स्वाभिमान टिकविण्यासाठी मी प्राणार्पण करणार आहे. मी स्वतः अग्नीकुंडात उडी मारणार आहे, आपणही उडी मारण्यास तयार आहात का? असा जेव्हा वासवीने इतरांना प्रश्न केला, तेव्हा सगळे विचारात पडले. सर्वांच्या लक्षात आले, की वासवी ही एक सामान्य मुलगी नाही. तिच्यामध्ये दैवी शक्ती वास करीत आहे. तिला आपले विश्वरूप दाखवायचे आहे. वासवीने सांगितले, की मी आदिशक्तीचा अवतार आहे, मीच महिषासुराचा वध केला आहे, शुंभ आणि निशुंभ राक्षसाचाही वध मीच केला आहे, त्रेतायुगामध्ये मी सीता देवीचे रूप धारण केले होते, द्वापारयुगात यशोदेच्या पोटी दुर्गा या नावाने मीच जन्म घेतला होता, या कलियुगामध्ये स्त्रियांच्या पावित्र्याचे रक्षण करण्याचा मी निश्चय केला आहे, म्हणूनच मी वासवी ब्रह्मचारिणी या नावाने आर्य वैश्य कुळामध्ये जन्म घेतला आहे. वासवीचे मूळ रूप पाहून सर्वांनी तिला साष्टांग नमस्कार केला.अग्नीकुंडात उडी घेऊन प्राणार्पण करण्यापूर्वी तिने सांगितले, माझ्या या योजनेची माहिती मिळताच विष्णुवर्धन राजाचा नाश होईल. माघ शुद्ध द्वितीया या दिवशी माता वासवीने अग्निकुंडात उडी घेऊन प्राणार्पण दिले. त्याचबरोबर १०२ गोत्रज वैश्य दांपत्यांनी ईश्वरांचे चिंतन करीत अग्निकुंडाला प्रदक्षिणा मारली व प्रसन्न चित्ताने वासवीप्रमाणे अग्निकुंडात उड्या घेतल्या. तेव्हापासून १०२ गोत्रजांना आर्य वैश्य म्हणून ओळखले जाते.

वासवीसहित १०२ गोत्रजांनी प्राणार्पण दिल्याची वार्ता विष्णुवर्धन राजास कळताच त्याला धक्का बसला. त्याच्या हृदयाचे व डोक्याचे तुकडे - तुकडे झाले, त्याची जीवनयात्रा संपुष्टात आली. त्याने जसे कर्म केले तसे त्याला फळ मिळाले. विष्णुवर्धन राजाचा अहंकाराने अंत झाला. ही बातमी कळताच त्याचा पुत्र नरेंद्र त्वरित पेनुगोंडा नगरीत आला व त्याने वासवीचा बंधू विरूपाक्षच्या पायावर लोळण घेतली. वीरुपक्षाने त्यास जवळ घेऊन अलिंगण दिले. आता तरी धर्माचे पालन कर असे वचन नरेंद्र याच्याकडून घेतले. त्यानंतर गुरु भास्कराचार्यांनी विरुपाक्षास काशीला जाऊन पित्याचे पिंडदान करण्यास सांगितले. तेथून आल्यानंतर नगरेश्वर मंदिरामध्ये वासवी कन्यका परमेश्वरी देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली व त्यानंतर दुसऱ्याच दिवशी विरूपाक्ष यास पेनुगोंडा राज्याचा राजा म्हणून राज्याभिषेक करण्यात आला.

श्री.वासवी कन्यका परमेश्वरी देवीने आपल्या प्राणाचे बलिदान देऊन स्त्री कुळाचे, स्त्रीच्या पावित्र्याचे, स्त्रीच्या सन्मानाचे, आपल्या कुळाचे व आपल्या गोत्रजांचे रक्षण केले व बलिदानातून देखील आपण आपल्या गोत्रजांचा उद्धार करू शकतो याचा आदर्श घालून दिला. आज वैशाख शुद्ध दशमी म्हणजेच श्री.वासवी कन्यका परमेश्वरी देवीच्या जयंतीचा दिवस. श्री वासवी कन्यका परमेश्वरी देवीला शतशः नमन!

## वाचक पत्रे

### पीडित कुटुंबांना न्याय मिळाला

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी केलेल्या काश्मीरमधील पहलगाम भ्याड हल्ल्यात निष्पाप २७ हिंदू पर्यटकांना धर्म विचारून त्यांना निवडून ठार करताना दहशतवाद्यांनी त्याच्या बायकांना, मोदींना जाऊन सांगा, असे निर्लज्जपणे सांगितले होते. गेली कित्येक वर्षे पाकिस्तान या दहशतवाद्यांना पोसत आहे. त्यांच्याद्वारे त्याने भारताविरुद्ध एकप्रकारचे छुपे युद्ध सुरू ठेवले आहे. याआधी २०१९ मध्ये बालाकोट एअर स्ट्राईक केला होता. भारतीय वायुसेनेच्या १२ मिराज २००० जेट विमानांनी नियंत्रण रेषेच्या पलीकडे जाऊन बालाकोट जवळील दहशतवादी अड्ड्यांवर हल्ला चढवला. भारतीय सैन्यावर पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याला उत्तर म्हणून हा हवाई हल्ला करण्यात आलेला होता. पाकिस्तान या एअर स्ट्राईकवरून बोध घेऊन आपल्या दहशतवादी कारवाया थांबवेल असे वाटले होते. पण पाकिस्तान आपला दहशतवादी एजेंडा सोडण्यास तयार नाही.

पहलगाम हल्ल्याची चीड देशवासीयांच्या मनात गेली कित्येक दिवस होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना तसेच दहशतवादी हल्ल्यातील पीडित कुटुंबीयांना आश्वस्त केले होते की त्यांना नक्कीच न्याय मिळेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमातून देशाला संबोधित करताना, पहलगाम हल्ल्यावर भाष्य केले होते. हल्ल्याचा कट रचणाऱ्यांना कठोर उत्तर दिले जाईल, असं म्हणत पंतप्रधानांनी पुन्हा एकदा पहलगाम येथे हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना कडक इशारा दिला होता. दोन आठवडे उलटून गेल्यानंतर कारवाई होत नसल्याने अस्वस्थता होती. अखेर बुधवार मध्यरात्रीच्या सुमारास भारताने 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमधील दहशतवादी ठिकाणांवर हल्ला केला. या मोहिमेअंतर्गत एकूण नऊ ठिकाणी हवाई दलाने व्याप्त काश्मीर तसेच शंभर किलोमीटर आत पाकिस्तानमध्ये जाऊन तेथील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले आहे. ज्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी आपल्या आया-बहिणींचे कुंकू पुसले त्यांना तेथेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली सरकारने अखेरीस 'ऑपरेशन सिंदूर' राबवून चौथे अस्मान दाखविले आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### शूरवीर जवानांचे अभिनंदन

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथील इस्लामिक दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांची धर्म विचारून हत्या केली. त्याचा प्रतिशोध घेण्यासाठी व्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांच्या मुख्यालयावर आमच्या शूर भारतीय जवानांनी हल्ले करून पाक पुरस्कृत दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले. त्यासाठी भारतीय शूर जवानांचे आणि भारताच्या प्रखर नेतृत्वाचे अभिनंदन केले पाहिजे. संपूर्ण भारताला भारतीय जवानांनी केलेल्या पराक्रमाचा अभिमान आहे. 'ऑपरेशन सिंदूर'ने भारत जगातील शक्ती व शस्त्रसंपन्न राष्ट्र असल्याचा परिचय झाला आहे. जगातील बलाढ्य राष्ट्रे भारताच्या पाठीशी आहेत. काश्मीरमध्ये पर्यटनाचा आनंद घेणाऱ्या महिलांचे सिंदूर हिसकावून पुरुषांना ठार मारणाऱ्या दहशतवाद्यांचा प्रतिशोध 'ऑपरेशन सिंदूर'ने घेतला गेला. भारतीय सिंदूरचा परिणाम भारतीय जवानांनी आपल्या राष्ट्रधर्मानी दिला. ''मोदी को जाके बता देना'' असे म्हणणाऱ्या दहशतवाद्यांची आज स्थिती भीषण झाली आहे. पाकड्यांनी आतंकवादाचा कारखाना केला. भारतीय जवानांनी त्यांच्या अड्ड्यांवर हल्ला करून अनेक दहशतवादी मारले. भारताचे नेतृत्व कणखर, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेणारे आहे. संपूर्ण जनमानस देशाच्या नेतृत्वाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

**अमोल तपासे**/नागपूर

### मोदींची दूरदृष्टी नव्हे, दिव्यदृष्टी

पाकिस्तानसोबत सध्याचे तणावपूर्ण संबंध व वातावरण बघता भारताकडून मोठ्या कारवाईची अपेक्षा होती, ती पूर्ण झाली. ज्या २७ निरपराध पर्यटकांना गोळ्या घालून ठार मारले त्यांच्या कुटुंबांची सुद्धा सरकारकडून हीच अपेक्षा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कूटनीतीचे फळ आज आपल्याला अनुभवाला येत आहे. २०१४ ला मोदी पंतप्रधान झाल्यावर त्यांनी विविध देशांना भेट देणे सुरू केले. विरोधी पक्ष आणि लोकांना वाटत होते की मोदींना परदेशात फिरायला मिळाले नाही म्हणून जातात. अरे अल्प बुद्धीवाले, मोदींना समजणे कठीण आहे. आज या गोटींची महती पटली जेव्हा अमेरिका, रशिया, फ्रान्स, इस्रायलसारखे देश भारताला पाठिंबा देत आहेत. पाकिस्तानची चीन सोडून कोणीच बाजू घेत नाही आहे. हे सर्व मोदींनी भारताला आर्थिक बाबतीत समृद्ध केल्यामुळेच शक्य झाल आहे. आपल्या देशाला पाठिंबा देण्यामागे त्यांना मोदींबद्दल प्रेम आहे असे नाही, तर या मोठ्या देशांचे आर्थिक हित यात लपले आहे. अशा या संकटाच्या वेळी आपण मोदींसोबत राहायला हवे. दुसरीकडे काँग्रेसचे नेते राहुल गांधींच्या अल्प बुद्धीची जितकी कीव करावी तेवढी कमीच आहे. त्यांच्या आजीला व वडिलांना दहशतवाद्यांनीच मारले हे विसरून मोदींना साथ देण्याऐवजी त्यांच्यावर आरोप करतात. याला म्हणतात विनाशकाले विपरीत बुद्धी.

**राजेंद्र मनोहर वाडी**/९४२३६३२२३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## समर्थ कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९४:८९ टक्के

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.७ मे -**

तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी/मार्च २०२५ च्या बारावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९४:८९ टक्के लागला आहे.

विज्ञान शाखेतून अरूण रामदास याचवड याने ८२:६७ टक्के गुण घेऊन प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. भुमिका अविनाश शिरोळे या विद्यार्थ्यींनीने ८१:०५ टक्के गुण घेऊन व्दितीय आली आहे. तर नंदिनी रवींद्र चिमणदरे ही ८०:६७ टक्के गुण घेत तृतीय आली आहे.

विज्ञान शाखेत एकूण १९६ विद्यार्थी परिक्षेस बसले होते. पैकी सहा विद्यार्थी विशेष प्राविण्यात उत्तीर्ण झाले आहेत. १०९ प्रथम श्रेणीत तर ७० द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्था सदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, जेष्ठ प्रा. बी. एस. बाबळसुरे, रसूल पठाण याच्यांसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## ▶▶संक्षिप्त वृत्त...

### एचएससी बोर्ड परीक्षेत श्यामलाल महाविद्यालयाचे यश

**उदगीर, दि.७ मे -**

एचएससी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेमध्ये श्यामलाल कनिष्ठ महाविद्यालयाचा अनेक वर्षाच्या परंपरेनुसार घवघवीत निकाल लागला. श्यामलाल कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९८ टक्के तर कला शाखेचा निकाल ६५ टक्के लागला आहे. कला शाखेमध्ये सर्वप्रथम कसबे जीवन विजयकुमार ८३.५० टक्के, सर्व द्वितीय तेलंग पूनम माधव ७४.१७ टक्के, सर्व तृतीय केंद्र नम्रता नामदेव ७३.१७ टक्के. तसेच विज्ञान शाखेमध्ये सर्वप्रथम दंडीमे संस्कार सुधाकर ६९.६७, सर्व द्वितीय -पाटील श्रेयस संजीव ६७.८३, सर्व तृतीय शेळके प्रतीक्षा बालाजी ६५.८३ या यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुपोषपाणि आर्य, उपाध्यक्ष गिरीश मुंडकर, सचिव संकाय, सहसचिव अंजुमणि आर्य, प्राचार्य खंदारे बी.एम., पर्यवेक्षक लिमये, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक घोगरे एस.व्ही., मोघेकर एम.आर. सगर, पाटील पी.बी., पाटील एस.जे., सोनकांबळे एस.आय., शिरसे आदिंनी केले.

### आबासाहेब इंग्लिश स्कूलचा बारावीचा १०० टक्के निकाल

**देवणी, दि.७ मे -**

तालुक्यातील आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ यावर्षी



इयत्ता बारावी वर्गाचे शंभर टक्के निकाल लागून घवघवीत यश मिळवले. यामध्ये दीपक हेडगापुरे विद्यालयातील प्रथम तर माने महेश द्वितीय, बिरादार दिनेश तृतीय क्रमांक पटकावले आहे. आबासाहेब इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज यांचे दुसरी बॅच घवघवीत यश संपादन केले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आनंदाने जल्लोषाने उत्साहात आनंद व्यक्त केले. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष गोविंदराव भोपणीकर व संस्थेचे सचिव गजानन भोपणीकर व शाळेचे प्राचार्य उपप्राचार्य इत्यादी अभिनंदन केले.

### तुकाराम पाटील यांचे निधन

**शिरूर अनंतपाळ, दि.७ मे -**



तुकाराम प्रल्हाद पाटील उर्फ आबा हृदयविकाराच्या अतिशय अल्प आजारात वयाच्या ६० व्या वर्षी काळाच्या पडद्याआड झाले. यांच्या वरती दैठणा येथे दि.७ मे रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. यांच्या पश्चात यांच्या परिवारामध्ये पत्नी, दोन मुलं, सुना, नातवंड यांचे सेवानिवृत्त शिक्षक अशोकराव पाटील तर एक मुलगा भारतीय लष्करात शिपाई म्हणून कार्यरत आहे.

### पाकिस्तानात एअर स्ट्राईक; भाजपाकडून स्वागत

**धाराशिव, दि.७ मे -**

भारतीय वायू सेनेने आज पहाटे पाकिस्तानातील बहावलपूर, मुरीदके, सियालकोट आणि पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळांवर एअर स्ट्राईक करत अनेक दहशतवादी ठिकाणे नष्ट केली. भारतीय पर्यटकांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा बदला घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सशस्त्र दलाने मिट्टी में मिला देंगे हा इशारा कृतीतून दाखवला. याचा धाराशिव शहर भाजपच्या वतीने जल्लोष साजरा करण्यात आला.

# बेलकुंड, सोनचिंचोली येथील औद्योगिक वसाहतीच्या भुसंपादनास मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.७ मे -**

औसा विधानसभा मतदारसंघातील बेलकुंड-चिंचोली सोन भागातील २४७.५९ हेक्टर क्षेत्रावर आरक्षित केलेल्या जमिनीवर pass throuसह पध्दतीने भुसंपादन करण्याच्या आटीचा समावेश करण्यात आला होता. यासंदर्भात संबंधित तज्ज्ञांशी चर्चा करून प्रचलित भूसंपादन प्रणालीनुसार करण्यात यावे, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे केली होती. औद्योगिक वसाहतीची उपयुक्तता विचारात घेऊन प्रचलित भूसंपादन प्रणालीनुसार करण्यासंदर्भातील शासकीय आदेश मंगळवार दि.७ मे रोजी आदेश देण्यात आले आहेत.



लातूर जिल्ह्यातील सर्वच एमआयडीसीमध्ये नव्या उद्योगासाठी भूखंडाची उपलब्धता तसेच एमआयडीसीच्या विस्ताराची आवश्यकता पाहता या क्षेत्रात पायाभूत सुविधा वाहतूक दळणवळण तसेच मनुष्यबळ सोय उपलब्ध असल्यामुळे बेलकुंड-चिंचोली सोन येथील खाजगी २४७.५९ हेक्टर क्षेत्राची भूसंपादन कारवाही करण्याकरिता संदर्भीय शासन निर्णयामधील Pass-through पद्धतीने भूसंपादनाची अट रद्द करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. लातूर जिल्ह्यातील लातूर व औसा सर्वच एमआयडीसीमध्ये नव्या उद्योगासाठी जागा शिल्लक नाही. आणि एमआयडीसी विस्तारासाठी वावही नाही. नव्याने अस्तित्वात आलेली बेलकुंड सोनचिंचोली एमआयडीसी नागपूर-औसा-तुळजापूर-रत्नागिरी या राष्ट्रीय महामार्गालगत आहे. निर्माण आधीन असलेल्या सोलापूर-तुळजापूर-धाराशिव हा रेल्वे मार्ग बेलकुंड चिंचोली सोन एमआयडीसी पासून अवघ्या २५ किमी अंतरावर आहे. मोठे साठवण क्षमता असलेले निम्न तेरणा प्रकल्प अत्यंत जवळ आहे. राष्ट्रीय महामार्ग रेल्वे मार्ग कनेक्टिव्हिटी, मुबलक पाणी उपलब्धता, विजेची उपलब्धी आणि परवडणारे मनुष्यबळ यामुळे बेलकुंड-चिंचोली सोने एमआयडीसी गुंतवणुकीसाठी ड्रीम डेस्टिनेशन ठरणार आहे.

बेलकुंड-चिंचोली सोन हा भाग भूकंपग्रस्त भागांमध्ये असून आजूबाजूचा सर्वच परिसर हा भूकंपग्रस्त असल्याने भूकंपग्रस्त कुटुंबासाठी सुद्धा येथील एमआयडीसी नवसंजीवनी ठरणार आहे.

### रोजगार निर्मितीमुळे आर्थिक घडी बसेल :आ. अभिमन्यू पवार

बेलकुंड-चिंचोली सोन एमआयडीसीला जिल्ह्यातील सर्वात रोजगारक्षम एमआयडीसी म्हणून नावारूपास आणण्यासाठी अगदी लहानातील लहान बाबीकडे सुद्धा गांभीर्यपूर्वक लक्ष दिले जात आहे. एकंदरीत या भागात या एमआयडीसी च्या रुपाने नवे उद्योग व रोजगार निर्मिती उपलब्ध होणार असून त्यामुळे या परिसराची आर्थिक घडी बसेल आसा विश्वास आ. पवार यांनी व्यक्त केला.

## महात्मा गांधी महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.७ मे -**

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ चा निकाल आज जाहीर झाला असून महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर (जि. लातूर) ने उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

विज्ञान शाखेचा निकाल ९८.५७ टक्के लागला असून ४ विद्यार्थी विशेष प्राविण्य व ३५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेत महाविद्यालयातून राऊत्रे प्राची रविशंकर ही ८४.१७ टक्के गुण घेऊन सर्वप्रथम, घोगरे निशा संतोष ही ७६.५० टक्के गुण घेऊन सर्व द्वितीय, पठाण अफान अल्लाबक्ष हा ७५.८३ टक्के गुण घेऊन सर्व तृतीय आला आहे. आणि ७०.०० टक्के पेक्षा जास्त ०८ विद्यार्थी आहेत.

वाणिज्य शाखेचा निकाल ९०.७८ टक्के लागला असून ८०.०० टक्केच्यावर ०६ विद्यार्थी आहेत. ०८ विद्यार्थी विशेष प्राविण्य व २१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य शाखेत गंगथडे राम दत्ता हा ८९.१७ टक्के गुण घेऊन सर्वप्रथम, गोरटे दिपाली नारायण ही ८७.६७ टक्के घेऊन सर्वद्वितीय व हागदळे भाग्यश्री शिवराज ही ८६.१७ टक्के गुण घेऊन सर्व तृतीय आली आहे. कला शाखेचा निकाल ६३.०० टक्के लागला असून ७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेत माने नंदिनी आनंद ही ८०.१७ टक्के गुण घेऊन सर्वप्रथम, भस्मापुरे अनुजा सुधाकर ही ६८.०० टक्के गुण घेऊन सर्व द्वितीय आली आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. किशनराव बेंडकुळे, सचिव अ‍ॅड.पी.डी. कदम, उपाध्यक्ष अ‍ॅड. विजयकुमार देशमुख, उपाध्यक्ष युवराज पाटील, सहसचिव सुरेशराव देशमुख, प्राध्यापक प्रतिनीधी प्रा. हेमंत पाटील, सर्व संचालक, प्राचार्य डॉ.एस.आर. शेळके, उपप्राचार्य डॉ.जे.पी. कुलकर्णी, पर्यवेक्षक डॉ.एस.डी. साडेगावकर, प्रा.एस.के. गायकवाड, प्रा.ए.एन. शिंदे, कार्यालयीन अधिक्षक डी.के. गाजरे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

### रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**धाराशिव, दि.७ मे -**

शहरातील नामवंत व सर्वात जुने कॉलेज असलेल्या रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील सन १९९५ ते २००० या कालावधीत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सोमवारी दि.५ मे रोजी हॉटेल ॲपल येथे स्नेहमेळावा झाला. तब्बल २५ वर्षांनी वर्गमित्र एकमेकांना भेटल्याने सर्वांचा आनंद द्विगुणीत झाला.

## देवणी तालुक्यातील दोन हजार आठशे घरकुलाचे उद्दिष्ट पूर्णत्वाकडे : सागर वरंडेकर

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.७ मे -**

सर्वसामान्य गरीब लोकांना हक्काचं घरकुल असावं म्हणून केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आंबेडकर आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर अवास योजना, तसेच यशवंतराव चव्हाण अवास, व मोदी अवास नावाने घरकुल योजना चालू केल्या आहेत. देवणीचे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी सागर वरंडेकर यांनी सन २०२४ व २५ या वर्षात तालुक्यातील दोन हजार आठशे घरकुल मंजूर करून घेतले असून त्यापैकी तीनशे घरकुल पूर्ण झाले आहेत.

तर दोन हजार पाचशे घरकुल प्रगतीपथावर आहेत या सर्वच योजनेतील २१०० शे घरकुल लाभार्त्यांना पहिला हप्ता देण्यात आला आहे.

तर ५९० लाभार्थीना दुसरा हप्ता देण्यात आला आहे. तर तिसरा हप्ता ९० लाभार्थी यांना देण्यात आल्याची माहिती गटविकास अधिकारी सागर वरंडेकर यांनी दिली.

देवणी पंचायत समिती स्थापन झाल्यापासून सर्वात अधिक घरकुलाचे उद्दिष्टे हे गटविकास अधिकारी सागर वरंडेकर यांच्या कालावधीत आले आहे. ते अतिशय परिश्रमाने घरकुलाकडे लक्ष देऊन घरकुलाचे उद्दिष्टे पूर्ण करून घेत आहेत.



त्यामुळे सर्वसामान्य गरीब लोकांचे घरकुलाचे स्वप्न साकार होतांना दिसत आहे.

सन २०२४ व २०२५ या आर्थिक वर्षात घरकुलात पन्नास हजार रुपयेची वाढ झाली.

त्यापैकी पस्तीस हजार रुपये घरकुलसाठी व पंधरा हजार घरावर सोलर बसविण्यासाठी आहेत. घरकुलासाठी १ लाख २० हजार, नरेगा मस्टर मजूर १८ हजार रुपये, शौचालय १२ हजार रुपये असे जवळ पास दोन लाख सहा हजार रुपये लाभार्थीना मिळणार आहे. त्यामुळे चालल्या प्रकारचे घरकुल निर्माण होणार अहेत.

जवळपास तीन हजार लोकांचे घरे बसाविण्याचे भाग्य गटविकास अधिकारी यांना लाभले आहे. त्यामुळे गटविकास अधिकारी सागर वरंडेकर सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## सामान्य रुग्णालय उदगीर येथे जनजीवणी प्रतिष्ठानच्या मोफत थंड पाणी वाटप

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.७ मे -**

जनजीवणी प्रतिष्ठाणच्या वतीने उन्हाळ्यात सामान्य रुणालय उदगीर येथील रुणांच्या नातेवाईकांना पिण्यासाठी थंड पाण्याची मोफत सोय व्हावी म्हणून जलदात्यांच्या सहकार्याने गेल्या वर्षी दररोज २५ ते २७ पाण्याच्या कॅनची दोन महिन्यासाठी व्यवस्था करण्यात आली होती. याही वर्षी सामान्य रुग्णालय येथील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने दि.५ मे रोजी सकाळी ११ वा. सामान्य रुग्णालयाच्या ट्रामा केअर सेंटर येथील ओपीडी विभागत मोफत थंड पाणी वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शंकरलिंग मठाचे मठाधिश सुखदेव स्वामी महाराज व उद्घाटक दिलीप गाडे पोलिस निरीक्षक उदगीर शहर हे होते तर प्रमुख पाहुणे उद्धव हैबतपूरे महाराज, सामान्य रुग्णालयाचे डॉ. शशिकांत देशपांडे, मातृभूमी महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष सतिश उस्तुरे, चंद्रचकोर कारखाने, डॉ. नागेश स्वामी आदी उपस्थित होते.

यावेळी जनजीवनी प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. शशिकांत देशपांडे यांनी मत व्यक्त करताना म्हणाले कि जनजीवनी प्रतिष्ठनच्या वतीने गेल्या वर्षीही सामान्य रुग्णालय येथील रुग्णांच्या नातेवाइक व कर्मचाऱ्योसाठी उन्हाळ्यात पिण्यासाठी थंड पाण्याची मोफत व्यवस्था केली होती याही वर्षी पुढाकार घेतला. सामान्य रुग्नालयात सर्व सुविधा उपलब्ध असून सर्वप्रकारच्या आजाराचे निदान मोफत केले जाते याचा सर्वसामान्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रतिष्ठानचे सहसचिव महादेव घोणे यांनी केले.

यावेळी जनजीवनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी, उपाध्यक्ष अ‍ॅड. दयानंद उदबाळे, सचिव अ‍ॅड. शिवाजी बिरादार, कोषाध्यक्ष डॉ. प्रशांत राजूरकर, योगेश चिद्रेवार, श्रीपाद सिमंतकर, श्रीपाद करंजीकर, आनंद महामुनी, मोतीलाल डोईजोडे, विश्वनाथ गायकवाड, दिनेश देशमुख, प्रा. गोविंद इंगळे, प्रमोद जोशी आदी उपस्थित होते.

### सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचे समता परिषदेकडून जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ मे -**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२२ चे ओबीसी आरक्षण कायम ठेवून घेण्यात याव्यात असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाला धक्का न लागता या निवडणुका होणार असल्याने अखिल भारतीय समता परिषदेच्या वतीने धाराशिव शहरातील महात्मा फुले चौक येथे जल्लोष साजरा करण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष बिभीषण खुणे, संतोष डोरले, प्रशांत वेदपाठक, रॉबीन बगाडे, व्यंकट जाधव, मनोज वाघमारे, नंदकुमार कुऱ्हाडे, भजनदास जगताप, तुळजापूर तालुकाध्यक्ष प्रदीप राऊत, शशिकांत महामुनी, महेश लोकरे उपस्थित होते.

# जिल्हा, तालुकास्तरीय अल्पसंख्यांक समिती गठित करा

### पालकमंत्र्यांकडे एमआयएमची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.७ मे -**

अल्पसंख्यांक समाज अद्याप विकासापासून दुर असून विकासाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी जिल्हा व तालुकास्तरावर अल्पसंख्यांक समिती गठित करा, अशी मागणी एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे निवेदनाद्वारे केले आहे.

पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचा औसा येथे शुक्रवार दि.२ मे रोजी लोकार्पण व पाहणी दौरा झाला. यावेळी एमआयएमच्या वतीने मागणी करण्यात आली. आमदार अभिमन्यू पवार, लातूरचे जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, सुनील उटगे, सभापती चंद्रशेखर सोनवणे उपस्थित होते. लातूरसह औसा तालुक्यातील अल्पसंख्यांक समाज अद्याप मागासलेला



आहे. या मागसलेपणामुळे विकासापासुन दुर आहे. समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकासाच्या विविध योजनांची माहिती समाजापर्यंत पोहंचत नाही. व विकासाच्या योजना पासुन समाज दूर गेला आहे. त्यामुळे मुस्लिम समाज सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या मागास पडत चाललेला आहे.

विधानसभेच्या निवडणुका होऊन जवळपास ५ महिन्यांचा कालावधी संपलेला आहे. अजून कोणत्याही शासकीय कमिट्यां नियुक्त करण्यात आल्या नाहीत. या लवकरात लवकर गठीत करण्यात याव्यात. तसेच प्रत्येक कमीटीमध्ये विरोधी पक्षाच्या प्रतिनिधींना संधी देण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. लातूर जिल्हा तसेच औसा तालुका स्तरीय अल्पसंख्यांक आयोगाचे गठण तात्काळ करण्यात यावे. तसेच जिल्हानिहाय व तालुकानिहाय स्वतंत्र अल्पसंख्यांक समितीची गठीत करण्याचे आदेश त्वरीत देण्यात यावेत. वेळोवेळी अल्पसंख्यांक विभागासाठी शासनांनी प्रस्तावित केलेल्या योजना व माहिती ज्या-त्या विभागाने तात्काळ तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय समितीपुढे ठेवून त्याची समितीमार्फत अंमलबजावणी करावी. अल्पसंख्यांक बहुल शहरांना मागील पाच वर्षापासुन अल्पसंख्यांक निधी देण्यात येत नाही. प्रस्तावित प्रस्तावांना मंजुरी देऊन वाटप करण्याचे आदेश देण्यात यावे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे शैक्षणिक व व्यवसायिक कर्ज मंजुरी-वाटप बंद असून तात्काळ पुर्ववत सुरु करुन वितरीत करण्यात यावेत. लातूर जिल्ह्यासह औसा तालुक्यातील अनेक गरजुंचे कर्ज प्रस्ताव मौलाना आझाद महामंडळाकडे प्रलंबीत आहेत. संबंधीत कर्जदारांच्या मालमत्तेवर बोजा चढवण्यात आलेला आहे. परंतु कर्ज वाटप करण्यात आले नाही. तात्काळ कर्ज वाटप करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यावेळी एमआयएम औसा प्रमुख सय्यद मुजफ्फर अली इनामदार, शेख नय्युम, शेख मुशीर, अजहर कुरेशी, शेख अलीम आदि उपस्थित होते.

## श्री अनंतपाळ यात्रा महोत्सवास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.७ मे -**

शिरूर अनंतपाळ नगरीचे ग्रामदैवत श्री अनंतपाळ महाराजांच्या यात्रेस दि.७ मे पासून सुरुवात झाली असून या यात्रा महोत्सव काळात विविध धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे या मध्ये दिनांक ७ मे ते ११ मे दरम्यान रोज दुपारी २ ते ५ या दरम्यान महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध, गायन सम्राट, शिव कथाकार शि.भ.प कुमारसागर स्वामी महाराज लोहारेकर यांची भव्य शिवकथ आयोजित करण्यात आली आहे.

तसेच दि.८ मे रोजी राजेश्वर स्वामी महाराज लाळीकर, दि.९ मे रोजी आश्विनी स्वामी उदगीरकर, दि.१० मे रोजी अमोल महाराज बनवसकर तर या शिवकथा व किर्तन महोत्सवाचा समारोप निमित्ताने दि.११ मे रोजी सदगुरू, वेदांताचार्य १०८ दिगांबर शिवाचार्य महाराज वसमतकर यांचे भव्य किर्तनाचे आयोजन करण्यात आले असून या भव्य शिवकथा व किर्तन महोत्सवात शहरातील व तालुक्यातील नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन अनंतपाळ देवस्थान ट्रस्टचे मार्गदर्शक अ‍ॅड. संभाजी पाटील व डॉ. बाळासाहेब पाटील यांनी केले आहे.

याप्रसंगी यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष उमाकांत देवंगरे गुरूजी, सचिव किसन इंदलकर, कोषाध्यक्ष अनिल देवंगरे, शिवकथा व किर्तन महोत्सव समितीचे अध्यक्ष सोमेश्वर तोंडारे, संयोजक महादेव आवाळे, संतोष शेटे, अशोक कोरे, व्यंकट हांद्राळे, शिवदास उंबरगे, संभाजी पारशेटे, परमेश्वर सागवे उपस्थित होते.

यावेळी दररोज मायावती गणेश धुमाळे, व शिवकथा समारोप प्रसंगी खासदार डॉ. शिवाजीराव काळगे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# सुनील गोयल यांना रोटरीचा 'एक्सलन्स इन सर्व्हिस टू ह्युमॅनिटी' जागतिक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालन्याचे प्रसिद्ध उद्योजक आणि समाजसेवक सुनील गोयल यांना २०२४-२०२५ या वर्षासाठी रोटरी इंटरनॅशनलतर्फे 'एक्सलन्स इन सर्व्हिस टू ह्युमॅनिटी' हा अतिशय मानाचा आणि जागतिक दर्जाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. रोटरीचे सदस्य नसलेल्या जगभरातील फक्त १५० व्यक्तींना हा पुरस्कार जाहीर झाला असून, त्यात सुनील गोयल यांचाही समावेश आहे. जालना जिल्ह्यासाठी ही एक अत्यंत गौरवाची आणि अभिमानाची बाब ठरली आहे.

हा पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती रोटरी इंटरनॅशनलच्या अधिकृत ईमेलद्वारे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांना कळविण्यात आली. त्यानंतर रोटरीच्या प्रांतीय बैठकीत सुनील गोयल यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच याप्रसंगी रोटरीच्या सर्विस अबाउ सेल्फ या जागतिक पुरस्काराचे मानकरी अरुण अग्रवाल यांचाही सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर प्रांतपाल डॉ. सुरेश साबू,




मुंबईचे माजी प्रांतपाल चंद्रशेखर नौलवेकर, माजी प्रांतपाल जुबिन अमेरिया, डॉ. राजीव प्रधान, हरीश मोटवानी, सन २०२५- २६ चे प्रांतपाल सुधीर लातूरे, सन २०२६-२७ चे प्रांतपाल जयेश पटेल, सौ. निर्मला साबू, सौ. सपना गोयल, उपप्रांतपाल किशोर देशपांडे यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी बोलताना डॉ. सुरेश साबू म्हणाले की, सुनील गोयल यांच्या मानवसेवा व समाजसेवेच्या कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली, याचा आम्हाला अभिमान वाटतो. रोटरीचे सदस्य नसतानाही त्यांचे योगदान इतके प्रभावशाली आहे की, त्यांना जगातील फक्त १५० निवडक व्यक्तींमध्ये स्थान मिळाले. माझ्या कार्यकाळात याआधी ज्येष्ठ रोटरियन अरुण अग्रवाल यांनादेखील सर्विस अबाऊ सेल्फ हा जागतिक पुरस्कार मिळाला होता आणि आता सुनील गोयल यांनादेखील पुरस्कार जाहीर झाल्याने जालन्यातील प्रांतपाल पदाच्या कार्यकाळात हे दुसरे जागतिक गौरवाचे यश मिळाले, हा संपूर्ण जालन्यासाठी मोठा सन्मान आहे. हा सन्मान म्हणजे केवळ एका व्यक्तीचा गौरव नाही, तर त्यांच्या माध्यमातून संपूर्ण प्रांतातील सामाजिक कार्य आणि मूल्याधिष्ठित उपक्रमांची आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली ठसठशीत नोंद आहे. रोटरी इंटरनॅशनलतर्फे देण्यात येणारा 'एक्सलन्स इन सर्व्हिस टू ह्युमॅनिटी' पुरस्कार हा मानवतेसाठी केलेल्या अपूर्व योगदानाची दखल घेणाऱ्या सर्वोच्च पुरस्कारांपैकी एक मानला जातो व सर्वांकरता ही बाब प्रेरणा देणारी आहे, असे ते म्हणाले.

यावेळी रोटरी प्रांत ३१३२ च्या ११ जिल्ह्यातून सर्व प्रतिनिधी, रोटरी सदस्य, तथा माजी व नियोजित प्रांतपालांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन प्रांतीय मुख्य सचिव डॉ. नितीन खंडेलवाल यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार प्रांत सचिव डॉ. सौ. सुमित्रा गादिया यांनी मानले.

## संक्षिप्त

## टोळीप्रमुख उडीद कुरेशी व अमोल दांडेकर दोन गुन्हेगार तडीपार

**तभा वृत्तसेवा**
**मंठा / प्रतिनिधी**



सातत्याने वेगवेगळे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करणाऱ्या दोन जणांना सहा महिन्यासाठी जालना जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक बंन्सल यांनी पारित केले असल्याची माहिती मंठा पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांनी प्रतिनिधींना दिली आहे. पोलीस ठाणे हद्दीत मध्ये सातत्याने गुन्हे करणारे मंठा शहरातील टोळी प्रमुख मोहसीन उर्फ (उडीद )रहेमत कुरेशी वय २८ राहणार इंदिरानगर , अमोल प्रकाश दांडेकर वय २५ राहणार अशोक सम्राट नगर मंठा यांना सहा महिन्याकरिता तडीपार करण्याबाबतचा प्रस्ताव हद्दपार प्राधिकरण तथा पोलीस अधीक्षक जालना यांच्याकडे सादर केलेला होता.

## श्री गुरुदेव कनिष्ठ महाविद्यालय वडीगोद्री च्या विद्यार्थ्यांचे

**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**



अंबड तालुक्यातील श्री गुरुदेव विद्या मंदिर वडीगोद्री येथील विद्यार्थिनीचे घवघवीत यश कला व विज्ञान या शाखेमध्ये एकूण १६१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यामध्ये १५५ विद्यार्थी हे उत्तीर्ण झाले. यामध्ये विज्ञान शाखेतून अंजली सुरेश काळे ह्या विद्यार्थीनीने ७८% घेऊन पहिला क्रमांक मिळवला तसेच कला शाखेत जाधव पुष्पा हीने ७२.६७ टक्के मिळून पहिला क्रमांक मिळवला. महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल १००% टक्के तसेच कला शाखेचा ९२.२०% निकाल लागला. या निकालाबद्दल विवेकानंद शिक्षण संस्थेचे सचिव यशवंत भाऊ शिसोदे अध्यक्ष अक्षय भाऊ शिसोदे कोषाध्यक्ष तुषार भाऊ शिसोदे व सहसचिव श्रीमंत तात्या शिसोदे तसेच शाळेचे प्राचार्य आर के माळी सर,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले .

## तहसिलदार विजय चव्हाण यांनी मठ पिंपळगाव येथील तीन वाळू माफियायांच्या सातबारावर टाकाला बोजा

**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील मठ पिंपळगाव येथील वाळू माफिया यांच्या शेतीवर टाकला बोजा४१,१२,६२५/- टाकण्यात आले तिघांची क्षेत्र ४ हेक्टर ०७ आर आहे तहसिलदार विजय चव्हाण: मौजे मठ पिंपळगाव, धनगर पिंपरी शिवारातून वेळोवेळी रात्री आपरात्री अवैधरित्या रेती उत्खनन, वाहतूक करून, रेतीची चोरली, रेती चोरी केल्याप्रकरणी एफ आय आर दाखल करण्यात आलेला होता...

त्या अनुषंगाने चौकशी करून झालेल्या उत्खननाचा पंचनामा करण्यात आला....त्या पंचनामाच्या आधारे सर्व संबंधितांना नोटीस देण्यात आल्या परंतु नोटिसीचा खुलासा वेळेच्या आत सादर न झाल्याने संबंधितांना मोठ्या प्रमाणात संधी देऊनही खुलासा प्राप्त न झाल्यामुळे व सदरील व्यक्तीकडून चोरीचे प्रकार, अवैध रेती उत्खननाचे प्रकार न थांबल्यामुळे सदरील व्यक्ती चोरी वाहतूक व रेती उत्खनन या सर्व बाबींमध्ये वारंवार आढळून आल्याने संबंधितांच्या सातबारावर रुपये ४११२६२५ एवढा बोजा चढवण्यात आलेला आहे... सर्वांचे मिळून एकूण क्षेत्र चार हेक्टर सात आर क्षेत्र असून सदरील खातेदार यांनी सात दिवसाच्या आत दंड / पैसे भरल्यास बोजा करण्यात येईल...दंड / पैसे नाही भरल्यास त्यांच्या सातबारावर महाराष्ट्र शासन असे नाव लावण्यात येणार आहे.... महाराष्ट्र शासन हे नाव जोपर्यंत दंड अथवा बोजा क्लियर करणार नाही तोपर्यंत असेल .

## भोकरदन येथे कृषी सहाय्यक कर्मचाऱ्यांचे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

कृषी विभागाच्या होऊ घातलेल्या आकृतीबंधामध्ये कृषी सहाय्यकांच्या पदोन्नतीचा प्रश्न सोडविण्यासह इतर मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी राज्यातील कृषी सहाय्यक संघटनेने आंदोलन पुकारले असून त्याच अनुषंगाने भोकरदनमध्ये कृषी सहाय्यक संघटनेचे आंदोलन करण्यात आले. व हे आंदोलन विविध टप्प्यात सुरू करण्यात आले असल्याचे संघटनेचे सचिव राजेंद्र तळेकर यांनी सांगितले सध्या राज्यात कृषी सहाय्यकांची एकूण ११५२७ पदे अस्तित्वात असून कृषी पर्यवेक्षकांची ७०० पदे मंजूर आहेत त्यामुळे कृषी सहायकांना सेवेचे वीस ते पंचवीस वर्षे झाल्यानंतर ही पदोन्नती मिळत नाही यासोबत विविध मागणीसाठी व कृषी सहाय्यक यांना प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर कामकाज करत असताना उद्भवणाऱ्या विविध अडचणींची सोडवणूक करण्यात यावी त्यासाठी कृषी सहाय्यक संघटना ऐन खरिपाच्या तोंडावर आक्रमक आंदोलनाची भूमिका घेत आहे कृषी सहाय्यक संवर्गाच्या विविध अडचणी संदर्भात संघटनेने शासन दरबारी निवेदन देऊन बैठकांमध्ये मागणी केली आहे कृषी सहाय्यक संवर्गाचे पदनाम बदलून सहाय्यक कृषी अधिकारी करण्यात यावे कृषी सेवक कालावधी रद्द करून कृषी सहाय्यकांना नियमित कृषी सहाय्यक पदाचे आदेश देण्यात यावे कृषी विभागांमध्ये वाढत्या ऑनलाईन कामकाजाचा व्याप लक्षात घेता कृषी सहाय्यकांना लॅपटॉप उपलब्ध करून देण्यात यावे.

## आमदार हिकमत उडान यांनी केला मुंबईचे नवे पोलीस आयुक्त दिवेन भारती यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**

दि ७ मे घनसावंगी आमदार डॉ हिकमत उढाण यांनी केला आयपीएस अधिकारी श्री. देवेन भारती यांची आज आमदार डॉ हिकमत दादा उढाण आणि अजित भैय्या उढाण यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीवेळी त्यांनी देवेन भारती यांचे नवीन पदाबद्दल अभिनंदन केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या. देवेन भारती यांनी १९९८ ते २००० या कालावधीत जालना येथे पोलीस अधीक्षक (डझ) म्हणून काम केले होते. या भेटीदरम्यान जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि त्यांनी त्या काळातील अनुभवांवर चर्चा केली. हिकमत दादा उढाण आणि अजित भैय्या उढाण यांनी भारती यांच्या कर्तृत्वाचे कौतुक करत त्यांच्या नवीन जबाबदारीसाठी पाठिंबा व्यक्त केला. देवेन भारती, १९९४ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी, यांनी यापूर्वी मुंबईत विशेष पोलीस आयुक्त, सहआयुक्त (कायदा व सुव्यवस्था), आणि महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख अशा महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याच्या तपासातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

## सैन्य दलाकडून दहशतवाद्यांचे अड्डे उद्धवस्त : जालन्यात काँग्रेस पक्षातर्फे आनंदोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनीधी**

पाकव्याप्त काश्मीरसह पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर जोरदार हल्ला चढवत भारतीय सैन्य दलाने केलेल्या सडेतोड कारवाईचे खा.डॉ.कल्याण काळे आणि माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वाखाली जालन्यात काँग्रेस पक्षातर्फे स्वागत करून फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला. भारतातील विविध राज्यातून काश्मीर मधील पहेलगाम येथे पर्यटनासाठी



आलेल्या निष्पाप २७ पर्यटकांना पाकिस्तानातून आलेल्या काही दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून त्यांची हत्या करण्यात आली होती.या घटनेने देशभरात मोठी खळबळ उडाली आणि निष्पाप पर्यटकांच्या निर्घृणपणे हत्या करणाऱ्या पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांना कायमस्वरूपी धडा शिकवा अशी मागणी देशभरातील जनतेतून करण्यात आली. केंद्र सरकारने देखील या घटनेची गांभीर्याने दखल घेत कारवाईच्या दिशेने पाऊल उचलले. केंद्र सरकारच्या वतीने करण्यात येणाऱ्या कारवायांना काँग्रेस पक्षाचा पूर्णपणे पाठिंबा राहील अशी ग्वाही काँग्रेस नेते तथा विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिली होती. भारतीय सैन्य दलाने अत्यंत नियोजन पद्धतीने आज बुधवारी पहाटे पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानातील दहशतवादी अड्ड्यांवर अचूक हल्ले चढवत नेस्तनाबूत केले. सैन्य दलातर्फे करण्यात आलेल्या या हल्ल्यात अनेक दहशतवाद्यांसह त्यांच्या नातेवाईकांचा खात्मा झाल्याचा दावा केला जात आहे. या यशस्वी कारवाईनंतर जालना लोकसभेचे खासदार डॉ.कल्याण काळे आणि माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या नेतृत्वाखाली आज बुधवारी दुपारी जालना शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात काँग्रेस पक्षाच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी करत दहशतवाद विरोधी कारवाईचे स्वागत केले. यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारत माता की जय,सैन्य दलाचा विजय असो, पाकिस्तान मुर्दाबाद अशा विविध घोषणा देत जालनेकरांचे लक्ष वेधले. यावेळी विजय चौधरी, राम सावंत, रमेश गौरक्षक, जगदीश भरतीया, विनोद यादव, कपिल भुरेवाल, सदाशिव भुतेकर, गजानन लाड, शेख अनास, योगेश पाटील यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्त्यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# खते बियाणांची विक्री करताना शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये - आ .बबनराव लोणीकर

### व्यापाऱ्यानी साठेबाजी न करता, शेतकऱ्यांना रास्तभवात बी बियाणे खते उपलब्ध करून द्यावी

**तभा वृत्तसेवा**
**जालना /प्रतिनिधी**

शेतकऱ्याच्या पेरणीचे दिवस जवळ आले असून, खरिपाच्या पेरण्या आणि तोंडावर येऊन ठेपल्या आहेत अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांची बी बियाणे खते खरेदीसाठी लगबग सुरू होत असून, त्यांना रास्त भावांमध्ये बी बियाणे खते उपलब्ध झाली पाहिजेत यासाठी कृषी विभागाने काम करावे असे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले

ते परतूर येथे कृषी विभागाने आयोजित केलेल्या खरीप पूर्व हंगाम बैठकी प्रसंगी बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की, भेसायुक्त बी बियाणे लिंकिंग करणे असे प्रकार कटाक्षाने कसे टाळता येतील यासाठी लक्ष देऊन कृषी विभागाने सतर्क रहावे, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या डीलर सब डीलर यांच्यावर क** कारवाई करण्याचा इशारा यावेळी त्यांनी बैठकीदरम्यान दिला ब शेतकरी आपल्या घरातील तुडुक मिळून विकून बी बियाणे खते औषधे खरेदी करत असतो मात्र नफेखोरीच्या नादामध्ये अनेक वेळा शेतकऱ्यांची फसवणूक केली जाते त्यामुळे याबाबतीत आपण स्वतः गंभीर असून कृषी विभागानेही गंभीरतेने शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन यावेळी बोलताना त्यांनी केले



पुढे बोलताना ते म्हणाले की, दरवर्षी शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी बँका नको त्या जाचकाठी घालत असतात विनाकारण शेतकऱ्यांना त्रास होईल अशा प्रकारची वर्तणूक बँकांनी न करता शेतकऱ्यांना तात्काळ पीक कर्ज कसे उपलब्ध करून देता येईल या साठी शाखा व्यवस्थापकांनी लक्ष देण्याचे आवाहन केले

पुढे ते म्हणाले की उद्दिष्टापेक्षा कमी कर्ज वितरित करणाऱ्या बँकांची गळ केली जाणार नसून राज्य शासनामार्फत रिझर्व बँकेला उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या बँकांचा अहवाल पाठवण्यात येईल याची खबरदारी बँकांनी घ्यावी व शेतकऱ्यांना तात्काळ पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे असेही यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

केंद्र व राज्य सरकार केळी मोसंबी संत्रा चिकू आधी फळ पिकावर अनुदान देते त्या अनुदानाचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा यासाठी कृषी विभागाने शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून शेतकऱ्यांना फळ पिकाच्या अनुदानाचा फायदा द्यावा असेही यावेळी त्यांनी सांगितले येणाऱ्या टप्प्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेतील गावांना कृषी विभागामार्फत मोठा फायदा होणार असून या योजनेतील गावांमध्ये फळबाग सिंचन विहिरी शेत तलाव ठिबक तुषार यासह ट्रॅक्टर रोटावेटर व अन्य शेती उपयोगी साहित्य उपलब्ध करून दिले जाते त्यासाठी निवड झालेल्या गावातील सरपंच ग्रामसेवक कृषी सहाय्यक यांनी या योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत कसा पोहोचेल यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले पुढे बोलताना ते म्हणाले की आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी, शेतकऱ्यांपर्यंत प्रत्येक गोष्टीची तंत्रज्ञानाची माहिती देण्यासाठी, मतदारसंघातील प्रत्येक सर्कल मध्ये, अध्यात्म वस्तीची जोड घालत कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाची माहिती देण्यात येणार असल्याचे यावेळी बोलताना ते म्हणाले पुढे बोलताना ते म्हणाले की, येणाऱ्या काळामध्ये प्रगतशील शेतकऱ्यांचा संपत्ती सत्कार करण्यासाठी आपण कटिबद्ध असून, शेतकऱ्यांच्या पोरांनी राजकारणाला चवीपुरते वापरत आधुनिक शेतीकडे आपले लक्ष केंद्रित ति करावे जेणेकरून ग्रामीण भागातील शेती क्षेत्राचा विकास शेतकऱ्याची आर्थिक उन्नती साधली जाईल अशा प्रकारची उत्कृष्ट शेती करावी असेही यावेळी बोलताना ते म्हणाले यावेळी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार प्रतिभा गोरे, उपविभागीय कृषी अधिकारी श्री रोडगे, गटविकास अधिकारी राजेश तांगडे, रमेश भापकर, संपत टकले अशोकराव बरकुले उपसभापती संभाजी वारे तुकाराम सोळंके परमेश्वर लाटे, मधुकर मोरे, अनिरुद्ध कातारे, ओमप्रकाश मोर, गोविंद मोर, बाबाराव थोरात, नसरुल्ला काकड, भगवान आरडे, गणेश सोळंके, नामदेव खोसे यांच्यासह मोठ्या संख्येने विविध विभागाचे अधिकारी तलाठी मंडळ अधिकारी ग्रामसेवक कृषी सहाय्यक सरपंच उपसरपंच यांची उपस्थिती होती .

## वझर सरकटे येथून हजारो ब्रास वाळू चोरी

### ग्रामपंचायतसह महसूल विभागाचे दुर्लक्षच

**तभा वृत्तसेवा**
**तळणी /प्रतिनिधी**

तळणी येथून जवळच असलेल्या वझर सरकटे येथील पूर्णा नदीच्या पात्रातून दररोज शेकडो ब्रास वाळू चोरी होत असून शासनाच्या लाखो रुपयाच्यां महसुल ला चूना लावण्याचे काम वझर सरकटे येथील स्थानिक टेम्पो व ट्रॅक्टर धारक करत आहेत विशेष बाब म्हणजे या अवैध वाळू वाहतूक व उपश्यास स्थानिक ग्रामंपचायतचे काही महत्वाचे पदाधिकारी यांची वाहने असून त्यांना राजकीय पाठीबा असल्याने महसुल प्रशासनाच्या वतीने या ठिकाणी कारवाई करण्यात टाळाटाळ होत आहे . पूर्णा नदी पात्रातून होत असलेल्या अवैध वाहतूक व उत्खननावर महसूल प्रशासंनाकडून सतत कारवाया सुरू असल्या तरी वझर सरकटे येथे आतातपर्यन्त एकही कारवाई का नाही विशेष बाब म्हणजे या ठिकाणा वरील सर्व वाळू ही जिल्हाच्या बाहेर विदर्भात जात आहे . वझर सरकटे वरून चांगेफळ मार्गाने ही वाळू जिल्हाच्या बाहेर सोन्याच्या भावाने विक्री केली जाते . वझर सरकटे येथून विदर्भाच्या सिमेत जाण्यासाठी जवळचा रस्ता असल्याने गावातील काही राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांनी विदर्भातील काही वाहने हाताशी धरून . वाळू चोरी करत आहेत या मध्ये ग्रामंपचायतच्या प्रमुख पदाधिकार्याचा ही समावेश आहे गौण खनिज मालमतेचे रक्षण करण्याची जबाबदारी ग्रामंपचातयची असताना सुधा या कडे दुर्लक्ष होत आहे

महसुल प्रशासनाकडून नियुक्त करण्यात आलेले बैठे पथक हे भूमीगत झाले आहे . वझर सरकटे येथे नियुक्त केलेले बैठे पथक गायब असून कोणाच्या दबावामुळे या ठिकाणी वरील बैठे पथक गायब करण्यात आले . धडाकेबाज कारवाया करून शासनाला कोटी रुपयांचा महसूल जमा करून देण्यार्या मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे वझर सरकटे येथील अवैध वाळू उत्खननावर कारवाई करतील का या मंडळाचे मडळ अधिकारी तलाठी हे पूर्ण पणे या अवैध वाळू उपश्याकडे दुर्लक्ष करीत आहेत . स्वःत जिल्हाधिकार्यानि या अवैध वाळू चोरी कडे लक्ष देऊन कारवाई करण्याच्या सुचना मंठा महसुल प्रशासनाला द्याव्यात अशी मागणी पूढे येत आहे वझर सरकटे येथील अवैध वाळू उत्खननासदर्भात ना पथकातील कर्मचारी बोलत आहे ना महसुलचे वरीष्ठ बोलत आहे

# धरणविरोधी समितीने पुन्हा थांबवले प्रकल्पाचे बांधकाम

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. ०८ मे-**

पाटबंधारे विभागाकडून ७ मे रोजी निम्न पैनगंगा प्रकल्पाचे बांधकाम सुरू झाल्याची माहिती मिळताच, बुडीत क्षेत्रात वातावरण एकदम ढवळून निघाले. लगेचच दुसऱ्या दिवशी, ८ मे रोजी, निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समिती विदर्भ-मराठवाड्याच्या पदाधिकाऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी खंबाळा येथील बांधकाम स्थळावर एकत्र जमत तीव्र विरोध करत सूरु असलेले धरणाचे काम थांबवले.

दि. ७ मे रोजी खंबाळा येथे पाटबंधारे विभागाकडून धरण बांधणीचे काम सुरू झाल्याची माहिती मिळताच, धरणग्रस्त भागातील बाधित शेतकऱ्यांनी आज गुरुवारी ०८ मे रोजी सकाळी १० वाजता धरणविरोधी संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांसह आक्रमक भूमिका घेत सुरू असलेले धरण रेषेचे काम थांबवले. या काम बंद आंदोलनात निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रल्हादराव जगताप, यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व प्रसिद्ध प्रमुख तथा संघटन सचिव मुबारक तंवर, प्रल्हादराव गावंडे, बंडू नाईक, विजय राऊत, विजय समगीर, बंटी जोमदे, निलेश कुमरे, माणिक कोवे, गुलाब मेश्राम, विजय पाझारे, गजानन



डाखोरे,जयराम मिश्रा, विठ्ठलराव अडकिणे, विलास गावंडे, उत्तमराव भेंडे, अतुल वानखडे, पंजाबराव जगताप, विष्णू गावंडे, बंडू कुलसंगे, रवी भोंगाडे, सुभाष मिरासे, प्रमोद जगताप, रितेश राऊत, कैलास देशमुख, संतोष बोटरे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी लोअर पैनगंगा प्रकल्पाचे अभियंता पवार, मांडवी पोलिस ठाण्याचे ठाणेदार शेख, माहूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार शिवप्रकाश मुळे यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने चोख पोलिस बंदोबस्त उपस्थित होता.

**सरकारने बाधितांच्या मागण्या गांभीर्याने घ्याव्यात**

गेल्या २८ वर्षांपासून सुरू असलेल्या बुडीत व बाधित क्षेत्रातील ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांच्या तिव्र विरोधानंतर, आता निम्न पैनगंगा प्रकल्पाचे बांधकाम पुढे नेण्यासाठी सरकार कोणता दृष्टिकोन स्वीकारेल हे पाहणे आता महत्वाचे ठरणार आहे. पाटबंधारे विभागाचे अधिकारी जसेही कामाला सुरुवात करतात तोच आपल्या योग्य मागण्या घेऊन प्रकल्पातील बाधित शेतकरी आणि ग्रामस्थ त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी प्रकल्पाच्या कामाला विरोध करतात आणि बांधकाम थांबवतात. आता वेळ आली आहे की सरकारने या बुडीत क्षेत्रातील बाधित शेतकरी, मजूर आणि ग्रामस्थांच्या मागण्या गांभीर्याने घ्याव्यात आणि ही गुंतागुंतीची समस्या लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करावा. भूसंपादन आणि पुनर्वसनासाठी योग्य भरीव मोबदला निश्चित करावा आणि तो सार्वजनिकरित्या जाहीर करून पारदर्शकता दाखवावी कारण, जेव्हा कोणतीही गोष्ट तिच्या क्षमतेपेक्षा जास्त आणि बराच काळ ताणली जाते, तेव्हा ती वस्तू तुटते हा निसर्गाचा नियम आहे. लोअर पैनगंगा प्रकल्पाचे बांधकाम करणाऱ्या सिंचन विभाग आणि निषेध करणाऱ्या धरणविरोधी संघर्ष समितीचे अधिकारी आणि शेतकरी यांच्यात देखील आता अशीच संघर्षपूर्ण परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. कधी सुरु, कधी बंद या झंझटीला आता केवळ प्रकल्पग्रस्तच नाही तर सामान्य जनताही पुरती कंटाळली असल्याचे दिसून येत आहे. हे सुद्धा तेवढेच खरे.

# अनाठाई खर्च टाळून मुस्लिम समाजाने लावले आठ जोडप्याचे विवाह

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ०८ मे-**

येथील जामा मस्जिद कमेटी जुनी आबादी उमरी नव तरुण व शहर वासियां च्या वतीने दि. ५ मे रोजी उमरी येथील गिरीषभाऊ गोरठेकर सस्कृतीक सभागृहात सकाळी साडेअकरा वाजता मुस्लिम समाजाचा सामुहिक विवाह सपन्न झाला या सामुहिक विवाह मेळाव्यात आठ जोडप्याचे विवाह थाटात साजरा केला.

या सामुहिक विवाहात वधु, वरास गादी, पलग, कुलर, कपडयाचे जोडे, चादीचे जोडवे सर्व ससार उपयोगी साहित्य देण्यात आले असुन वधु वराकडील पाहुणे मडळीना सुरुची भोजन देण्यात आले. या विवाह सोहळयास मुफ्ती आजिजसाब रहेमानी सदर जमीयाती उलेमा हदगाव,काजी शरीयत मुफ्ती मुजीब साब भोकर मौलाना शफीसाब, मुफ्ती आजिमसाब काजी मुबीनसाब उपस्थित होते.

या विवाहास आशीर्वाद देण्यासाठी युवा नेते सभापती शिरिष गोरठेकर, राष्ट्रवादी काग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस डा विक्रम देशमुख, माजी नगरध्यक्ष प्रविणभाऊ सारडा, माजी नगरध्यक्ष श्रीनिवास अनतवार माजी नगरध्यक्ष महमद रफिक




सेठ , शिवसेना तालुका प्रमुख सुभाष पेरेवार,माजी नगरसेवक अनिल दर्डा, माजी नगरसेवक रतन खदारे, गणेश यम्मेवार, भारत सावळे, मुफ्ती आजिमसाब हाजी, तखीऊल्ला बेग, नवाज बेग,माजी नगरसेवक ऐजाज खान, गणेश यम्मेवार, शेख रशीद सेठ, हाजी अहेमद बेग यांनी विवाह सोहळ्यास उपस्थित राहुन वधु वरास आशीर्वाद दिले. उमरी जामा मस्जीद येथील तरुण सय्यद जुबैर, शेख ताजोदीन, कान्ट्रक्टर हाजी ताजोदीन, काजी मुबीन, आमन कुरेशी, रिजवान कुरेशी, खाजा आतार व शहरातील मुस्लिम नवतरुणाणी तसेच उमरी येथील सर्व मुस्लिम समाजाच्या वतीने हा विवाह सोहळा सपन्न झाला. हा उपक्रम गेल्या तिन वर्षापासून चालु कमेटीस चालू या विवाह सोहळयास शहर व तालुक्यातील असख्य मुस्लिम बाधव ऊपस्थीत होते.

## संक्षिप्त वृत्त

### डंकीन दर्गा येथे नांदेडात आज सैलानी बाबांचा संदल

**नांदेड**-हजरत हाजी अब्दुल रहेमान उर्फ सैलानी बाबांचा संदल येत्या दि.०९ मे (शुक्रवारी) सायंकाळी ५ वाजता गंगाचाळ डंकीन समोर



असलेल्या दर्गा येथे होणार असल्याची माहिती येथील मुख्य पुजारी रघुबाबा यांनी दिली आहे.गेल्या अनेक वर्षांपासून शहरातील गंगाचाळ डंकीन भागात असलेल्या सैलानी बाबांच्या दर्गा येथुन संदल मिरवणूक काढण्यात येते. यावर्षीही येत्या दि.०९ मे (शुक्रवारी) सायंकाळी ५ वाजता गोदावरीच्या घाटावरुन या संदल मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. ही मिरवणूक भीमघाट, देगावचाळ, पक्कीचाळ पोलीस चौकी ते गंगाचाळ पासून डंकीन समोरील सैलानी बाबांच्या दर्गा येथे पोहचेल. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती गणपत धबाले, पप्पु (प्रदीप) जाधव, विलास धबाले, विश्वनाथ घडलिंगे, शुभम ठाकूर, शशिकांत भुसेवाड, विश्वनाथ वाघमारे, रमेश गोडबोले, डॉ.अब्दुल बाकी, मुकुंद भोळे, राजू मोरे, बंटी लांडगे, ॲड.महेश हाळदे, परमेश्वर भुजबळ, बबु काकडे, ॲड.विकास वाघमारे, केशव नवरे, मारोती सवंडकर, कांचन ठाकूर, पप्पू ठाकूर,अर्शद भाई यांची उपस्थिती राहणार आहे. तरी सर्वधर्मीय सैलानी बाबा भक्तांना सदरील कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सैलानी बाबा दर्गा ट्रस्टच्यावतीने चांदू बुरुडे, राजूसिंघ महाराज, बिट्टूसिंघ महाराज, बाबुभैय्या ठाकूर, ॲड.जोशी, बलभिम बनसोडे, तुळशिराम कोकरे,पप्पू गवारे, तुळशीराम कोकरे, अर्जुन ठाकूर, मुख्तारभाई, चंदु वाघमारे यांनी केले आहे.

### शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावी बोर्ड परीक्षेत सर्वोत्तम निकाल

**नवीन नांदेड**-जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी, संचलित शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय सिडको नांदेड येथील इयत्ता बारावी विज्ञान आणि कला शाखेतील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ मधील परीक्षेत उत्तीर्ण होण्याची आणि सिडको हाडको भागातून सर्वोच्च निकालाची परंपरा कायम राखली आहे. कला व विज्ञान शाखेचा एकत्रित निकाल ९५.६५ टक्के असा लागला आहे. शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाने परीक्षेच्या निकालात याही वर्षी आपली गुणवत्ता कायम ठेवली आहे. विज्ञान शाखेत एकूण १०८ विद्यार्थी प्रविष्ट होते त्यातील १०८ विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. विज्ञान शाखेचा एकत्रित निकाल १००टक्के असा लागला आहे. विज्ञान शाखेत प्रथम येण्याचा मान मोरे शशांक साईनाथ याने ८४.६७ टक्के गुण मिळाले आहेत. तर लोहकरे अवधूत साईनाथ ८४.५० टक्के गुण मिळवून द्वितीय आला आहे आणि कु. मोरे ऋतुजा मोहन या विद्यार्थिनीने ८४.३३ मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला आहे. तसेच कला शाखेचा निकाल ८६.७९ टक्के लागला असून एकूण ५३ विद्यार्थी प्रविष्ट होते त्यातील ४६विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. कला शाखेतून रेपेकर अमित मोहन याने ८७.८३ गुण मिळवत प्रथम, कु. गच्चे ऋतुजा राजेश ६५.३३ गुण मिळवत व्दितीय तर कु.महाजन वैदेही भारत ६४.३७गुण मिळवून सर्व तृतीय आली आहे. या गुणवत्तापूर्ण यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शिवाजी जाधव, उपाध्यक्ष रवी जाधव, प्राचार्य साहेबराव देवरे, पर्यवेक्षक विकास पाटील ,वरिष्ठ लिपिक वसंत वाघमारे आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### गाव तिथे शाखा नोंदणी अभियान प्रभावीपणे राबवावे: रावणगावकर

**मुदखेड** -मुदखेड येथील शासकीय विश्रामगृह येथे दि. ७ मे रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा पवार गट मुदखेडच्या वतीने आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष



बाळासाहेब रावणगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. याबैठकीदरम्यान जिल्हाध्यक्ष रावणगावकर यांनी शहरातील व तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना बूथ कमिटी स्थापन करण्यासाठी कामाला लागावे व तसेच गाव तिथे शाखा घर तिथे सभासद नोंदणी अभियान प्रभावीपणे राबवावे आणि स्थानिक स्वराज्य निवडणूक व जिल्हा परिषद निवडणूक ग्रामपंचायत निवडणूक लढवण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काम करावे असे आव्हान उपस्थित कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना केले आहे. या बैठकीला उपस्थित असलेले सुरेश बिलेवाड पंचायत समिती माजी सभापती श्याम पाटील किनाळकर, शंकर पाटील गंड्रस तालुका कार्याध्यक्ष, शहर प्रमुख मोहम्मद बुरान, तालुका उपाध्यक्ष प्रदीप ढगे, ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष गजानन बोडके, पिंटू शिंदे, दिलीप सरोदे तालुका सरचिटणीस, शेख मुकिद शेख जानीमिया अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष, शेख इरफान अल्पसंख्यांक शहराध्यक्ष, मोहम्मद हकीम उपाध्यक्ष, ज्ञानेश्वर गायकवाड शहर उपाध्यक्ष, शेख खाजामिया शहर उपाध्यक्ष, रामा नारायण गुंजकर, माधव पाटील व्यवहारे, सचिन सुळेकर, मोहम्मद समी, सलमान पठाण, महिला आघाडी शहराध्यक्ष रुक्मिणीबाई कुंचटवाड, तालुका महिला आघाडी उपाध्यक्ष अनुसयाबाई बालाजी हमंद, यांची उपस्थिती होती. या आढावा बैठकीला तालुकाध्यक्षांनी मात्र पाठ फिरवली असल्याचे दिसून आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस राहुल चौदंते यांनी केले तर आभार व्यक्त शहराध्यक्ष मोहम्मद बुरान यांनी केले.

# विद्यार्थ्यांमध्ये बदल घडवणे म्हणजे अभ्यासू वृत्ती निर्माण करणे : डॉ. मनेश कोकरे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ०८ मे-**

श्री. गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी येथील संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी आपल्या दोन वर्षाच्या संचालक पदाचा कार्यकाळ पूर्ण केल्याप्रसंगी दोन वर्षाच्या कार्यकाळात संस्थेच्या नावलौकिकासाठी त्यांनी अनुभवलेल्या प्रसंगातून त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये व प्राध्यापकांमध्ये विशेष बदल घडवून आणण्यास प्रयत्न केला व ते यशस्वी झाल्याचे मत व्यक्त केले.

श्री. गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी येथील संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी या संस्थेत विद्यार्थी व अन्य विभागात विभाग प्रमुख ते संचालक पदापर्यंतचा प्रवास आपण अनुभवला आहे. या अनुभवातून विद्यार्थी कसा घडवला पाहिजे आणि घडवण्यासाठी काय करायचं ते याचा अभ्यास करून ७५ टक्के विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध अभ्यास करुन त्यांना घडवण्याचा



प्रयत्न केला आहे आणि पुढेही करणार आहे. विद्यार्थी दशेपासून या संस्थेची जुने ऋणानुबंध असल्याचे सांगितले. विद्यार्थी दशे पासून विविध विभागाच्या विभाग प्रमुख पासून ते संचालक पदापर्यंत यशस्वीरीच्या काम करण्याची संधी मिळाली आहे. याप्रसंगी संस्थेचे नावलौकिक करत असताना विद्यार्थ्यांमध्ये बदल घडवावे लागतात आणि ते बदल घडवीत असताना त्या त्या विभागाचे विभाग प्रमुखांचे सहकार्य असणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांना घडवत असताना त्यांच्यातील बारीउ सारी गोष्टींचा अभ्यास करावा लागतो आणि त्या विद्यार्थ्यातील असलेले अवगुण शोधून जसे की जास्त वेळ मोबाईल न पाहणे,वारंवार अनुपस्थित राहणे, अभ्यासू विद्यार्थ्यांचे छेड काढणे असे प्रश्न शोधून त्यांना अभ्यासाला पूर्ण वेळ व्यस्त करणे ठेवता येईल. यावर विचार करून त्यांना अभ्यास व त्यांची प्रात्यक्षिके देणे व त्यातील निकष काढून घेणे तेव्हा विद्यार्थी परिपूर्ण इंजिनिअर बनण्यास लाईक होतो आणि या सर्व गोष्टी प्रत्येक विभागाच्या विभाग प्रमुख, अधिष्ठाता, प्राध्यापक यांनी काळजी घेतली पाहिजे. पुढे बोलताना ते म्हणाले की हे सर्व नाट्यमय कलाकृती आहे. यामध्ये संचालकांनी संचालकाचे पात्र निभावले पाहिजे, प्राध्यापकांनी प्राध्यापकाची, विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांचे तर पालकांनी पालकाचे पात्र यशस्वीरित्या पार पाडले तर हे नाटक परिपूर्ण सुंदर असा सादरीकरण करता येते. किंवा परिपूर्ण होते यात काही वेगळं करावी ची गरज नाही प्रत्येक विभागाचा प्राध्यापकाने लक्षपूर्वक विद्यार्थ्यांना कामाला लावले तर ते अगदी कुशल इंजिनिअर बनतील पण केव्हा मेहनत घेतली तर त्यासाठी गेले दोन वर्षापासून या सर्व बाबीवर मी माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीने काम करून विद्यार्थ्यात मोठे बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करून विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी ग्राउंडची व्यवस्था करून त्यांच्या नक्कीच बदल घडून आणण्यास यशस्वी होत आसल्याने मला मानसीक समाधान वाटते आणि यापुढेही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी होईल तेवढे प्रयत्न करू अशी माहिती डॉ.मनेश कोकरे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना दिली.

# अनधिकृत बांधकामाबाबत आदिवासी विकास संघटनेची तक्रार

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ०८ मे-**

शहरातील गट क्रमांक ४७९ वार्ड क्रमांक २मधील मालमत्ता क्रमांक २७८६ जुना वार्ड क्रमांक ३ मध्ये होणारे अनधिकृत बांधकाम पाडण्यात यावे अशी तक्रार आदिवासी संघटना महाराष्ट्राचे सचिव विजय मोरे यांनी तहसीलदार मार्फत जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे केली आहे.

तक्रारी निवेदनात म्हटले आहे की त्यांच्या मालकीचे क्षेत्रफळ सोडून जवळ पास ३ फूट अधिक जागेवर अतिक्रमण करून पाठीमागे असलेल्या नाल्यामध्ये नगर परिषदेची कुठलीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे दिगंबर सूर्यवंशी गोपीनाथ सूर्यवंशी यांनी पक्क्या घराचे बांधकाम केले आहे शासकीय जागेत अतिक्रमण करून बांधकाम करण्यात आले आहे शासनाची फसवणूक करण्यात आलेली आहे या प्रकरणी जाय मोक्यावर जाऊन पंचनामा करण्यात यावा व अनधिकृत केलेले बांधकाम पाडण्यात यावे नाल्याचे रुंदी करण करण्यात यावे अन्यथा लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला असून निवेदनावर आदिवासी विकास संघटना प्रदेश सचिव विजय मोरे व गंगाधर नकलवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत निवेदनाच्या प्रती संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

# आ.भीमराव केराम यांच्या हस्ते किनवट आगारातील ३ बसेसचे लोकार्पण



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ०८ मे-**

राज्य परिवहन विभागाच्या ३ बसचे लोकार्पण आ. भिमराव केराम यांच्या हस्ते किनवट आगारात आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. आ. केराम यांनी नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक २६ बस आपल्या किनवट माहुर विधानसभा क्षेत्राकरिता मंजुर करवुन घेण्यात यश मिळवले आहे.

आज आयोजित कार्यक्रमात माध्यमांना बोलतांना आ. भिमराव केराम यांनी सांगितले कि, राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पाठपुरावा करुन नांदेड जिल्ह्यात सर्वाधिक किनवट माहुर विधानसभा क्षेत्राकरिता नविन बसेस मंजुर करुण घेतल्या आहेत. त्यात १० बस माहुर आगाराकरिता मंजुर केलेल्या आहेत त्यातील ५ बस मागील महिण्यात लोकार्पण करण्यात आलेल्या आहेत तर किनवट आगारा करिता १६ बस मंजुर करण्यात आलेल्या आहे त्यातील ३ बसचे आज लोकार्पण होत असुन उर्वरीत बस लवकरच उपलब्ध होणार आहेत. तर राज्य परिवहन महामंडळाच्या बस हे सर्वसामान्य जनतेचे हक्काचे दळणवळणाचे माध्यम असुन याठीकाणी नागरीकांना चांगल्या व दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात या करिता आपण सतत प्रयत्नशिर राहणार असुन आगामी काळात किनवट आगारातील अंतर्गत सुविधा, बस व प्रवासी निवारे उभारण्यात येणार आहेत. तर मांडवी बस स्थानकांच्या विकासाकडे तसेच मांडवी येथे उपलब्ध सुविधामध्ये देखिल वाढ करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. आपला मतदारसंघ हा धार्मिक यात्रेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असुन राज्यातील भाविक माहुर येथे माता रेणूकेच्या दर्शनाकरिता मोठ्या प्रमाणात येतात, याकरिता माहुर आगारातील उपलब्ध सुविधा व भाविकांना भेडसावणा-या समस्या लक्षात घेऊन यामध्ये लवकरच सुधारणा करण्यात येत असुन असे विविध प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीकरिता प्रलंबित असुन त्यातील तांत्रिक बाबीची पुर्तता झाल्या बरोबर यावर काम सुरु होईल.

यावेळी आयोजित कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, मंडल अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, आगार प्रमुख व्हाय.एच. खिल्लारे, वाहतुक निरिक्षक गंगय्या सटलावार, सेवानिवृत्त पो. नि. यशवंत जाधव, माजी शहराध्यक्ष संतोष चनमनवार, दुर्गा मंडळाचे विजय कन्नलवार, सामाजिक कार्यकर्त्ये निसार भाटी, गजेंद्र दासरवार, दारलावार, शेपुरवार, मठपती डवरे यांच्यासह रा.प. कर्मचारी, प्रवासी व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलान संतोष अनंतवार यांनी केले तर आभार प्रदर्शन गंगय्या सटलावार यांनी केले.

# सस्ती अदालत कार्यक्रमाचा जनतेने लाभ घ्यावा

## तहसीलदार किशोर यादव यांचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**माहुर, दि. ०८ मे-**

शासनाकडून आयोजित 'सस्ती अदालत' कार्यक्रमात शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांनी आपली प्रकरणे ठेवून जागेवरच निपटारा करून घेण्यासाठी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा,असे आवाहन माहूरचे तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे

सामान्य शेतक-यांना अतिक्रमित शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे करणे कामी जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी पंधरा दिवसातून एकदा एका ठिकाणी शक्यतो तहसिल कार्यालयात किंवा गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी सस्ती अदालत या नावाने छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यांमध्ये सस्ती अदालत हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने परिपत्रक दिनांक १६.०४.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे.



त्या अनुषंगाने, माहूर तालुकास्तरीय समितीची स्थापना करण्यात आली असून, तहसिलदारकिशोर यादव हे या समितीचे अध्यक्ष आहेत. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी तहसिल कार्यालय अथवा गरजेनुसार मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी सस्ती अदालत आयोजीत करण्यात येणार आहे. सदर अदालत मध्ये संबंधित नागरीक यांचे शेतरस्ता/पाणंद रस्त्यावरील अतिक्रमण काढणे बाबतची प्रकरणे या बाबत सर्व संबंधीत शेतकरी यांचेसोबत चर्चा करुन तसेच समुपदेशन करुन सामंजस्याने निकाली काढणे बाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.

उद्या शुक्रवार दिनांक ०९ मे रोजी सकाळी ११.०० वाजता पहिली सस्ती अदालत सर्व मंडळ स्तरावर आयोजित केली आहे तसेच दर महिण्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी मंडळ मुख्यालयी सस्ती अदालत चे आयोजन करण्यात येणार आहे.त्यामुळे सर्व नागरिकांसह शेतकऱ्यांनी या सस्ती अदालत कार्यक्रमात सहभागी होऊन आपापली प्रकरणं निकाली काढून घ्यावीत, असे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी केले आहे

# भारतीय पंगत आणि पळसाच्या पत्रावळी' कालबाह्य

**तभा वृतसेवा**
**फुलवळ, दि. ०८ मे-**

पळस ही भारतात उगवणारी एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. याची पाने तळहाताएवढी रुंद व जाड असतात. जेवणाच्या पत्रावळीसाठी याच्या पानांचा वापर होतो. भारतात या झाडास वसंत ऋतूत (होळीच्या सुमारास) गर्द केशरी रंगाची फुले येतात. या फुलांचा पूर्वी रंग करण्यास वापर होत असे. कृत्रिम रासायनिक रंगामुळे ही पद्धत मागे पडली आहे. याच्या बिया फार कडू असतात. त्यास पळसपापडी म्हणतात. त्याचा औषधी उपयोग आहे. अक्षय्य तृतीया (वैशाख शु.३) या दिवशी याच्या पत्रावळींचा वापर जरूर होतो. पळसाच्या झाडाला पाने तीन पानाच्या समूहातच असतात, यावरून पळसाला पाने तीनच ही म्हण मराठी भाषेत रुढ झालेली आहे. या वनस्पतीला पानगळीनंतर आलेल्या लाल रंगाच्या फुलांना ज्वालासारखा आकार आणि रंग असतो. संपूर्ण झाड पेटल्यासारखे दिसते.

कधीकाळी रानावनातून खुडून आणलेल्या हिरव्यागार पळसाच्या पानाच्या पाणी शिंपडून ओल्या





केलेल्या पत्रावळीच्या पंगती बसलेल्या दिसायच्या. त्यातील काडी तोंडात जाऊ नये म्हणून जेवण करणारा काळजी घेतच भोजनाचा आनंद लुटायचा. सोबत पळसाच्या पानांच्या द्रोणातून वाढली जाणारी आमटी,ताक पानात सांडू नये म्हणून पंगतीला बसल्यावर द्रोणाला छोटासा टेकू म्हणून भात लावून ठेवायचा.हे दृष्ट पहात मोठ्या झालेल्या पिढीला आता मात्र जमाना बदल गया म्हणण्याची वेळ आली आहे. कारण आता पळसाच्या हिरव्यागाव पत्रावळीच गायब झाल्या आहेत. लग्न समारंभात पळसाच्या पत्रावळ्यांची जागा केव्हाच थर्माकोलने घेतली होती मात्र थर्माकोल वर बंदी आल्यानंतर मशीन द्वारे तयार होणाऱ्या सिल्व्हर कोट पत्रावळीची चलती दिसून येत आहेत.

पूर्वीच्या काळी पळसाच्या पानांचे द्रोण व पत्रावळी हद्दपार झाल्याचे पाहायला मिळत आहे. पळसाच्या पानांपासून बनविलेले द्रोण व पत्रवाळी, तसेच केळीचे पाने याला पूर्वी खूप महत्व होते.मात्र तंत्रज्ञान च्या युगात मशीन वर तयार होणाऱ्या स्वतः मिळणाऱ्या पत्रावळीना पसंती मिळू लागली आहे.

लग्न समारंभ व धार्मिक कार्यात पळसाच्या पानाच्या पत्रावळी असायच्या. मात्र अलिकडच्या काळात वृक्षतोड व हायटेक जीवन पद्धतीमुळे पळसाच्या पानांपासून बनविण्याचे प्रमाण कमी झाले आहे. आता त्या दिसेनाशा झाल्या आहेत. दरम्यान, सध्या कागदी पानांच्या व मशीन सिल्व्हर कोटेड पत्रावळ्या, प्लास्टिकचे ग्लास याचा सर्रास वापर सुरु आहे. याचा वापर पर्यावरणास व मानवी आरोग्यास घातक आहे. केळीच्या, पळसाच्या पत्रावळीवर जेवण आरोग्यस हितकारक आहे, पण याचा विचार कोणीही करत नाही. झाडे जपायला हवी, पळसाच्या जेवणावळी घातल्या जात होते, हे आता फक्त सांगण्यापुरतेच राहिले आहे. जीवनमानातील बदलांमुळे शहरात पळसाच्या पत्रावळींची जागा स्टीलच्या ताट-वाट्यांनी घेतली होती. त्यानंतरच्या काळात अंगत,पंगत संस्कृती लोप पावत चालली आणि त्याची जागा बुफे लंच-डिनरने घेतली. या बुफे पद्धतीत मोठ्या ताटांची जागा छोट्या बुफे प्लेटसनी घेतली. छोट्या गावांतील लग्नसमारंभात व इतर कार्यक्रमांत जेवण्यासाठी पळसाच्या पानांपासून तयार होणारी पारंपारीक पत्रावळ वापरात होती. मात्र आता ती तिथूनही हद्दपार होण्याच्या मार्गावर आहे. त्याजागी आता खेडोपाडीही होणाऱ्या छोट्या-मोठ्या लग्न समारंभात व इतर कार्यक्रमांतदेखील थर्माकोल व कागदाच्या तयार केलेल्या पत्रावळींनी जागा घेतली आहे. द्रोणाची जागा प्लास्टिकच्या द्रोणाने घेतली आहे. सध्या समारंभांमध्ये कागदी पत्रावळी व द्रोणांचा जास्त वापर होताना दिसतो. या कागदी किंवा थर्माकोलच्या पत्रावळींना केळीच्या पानांचा आकार दिलेला असतो. शिवाय एका बाजूला मेणाचा वापर करुन पत्रावळी चकचकीत केल्या जातात. मात्र कोटिंग केलेल्या पत्रवळी आरोग्यासाठी घातकच असतात.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## सद्गुरू बंकटस्वामी कृपाळू आणि साक्षातकारी संत - स्वामी प्रकाशांनदगिरीजी महाराज

### जगाच्या पाठीवर देवाकडे दुःख मागणारी एकमेव कुंती माता आहे - स्वामी प्रकाशांनदगिरीजी महाराज





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ मे**

सद्गुरू बंकटस्वामी कृपाळू आणि साक्षातकारी संत आहेत असे प्रतिपादन भागवताचार्य स्वामी प्रकाशांनदगिरीजी महाराज देवगडकर यांनी केले.संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ पुण्यतिथी उत्सवात भागवत कथेच्या पहिल्या दिवशी बोलत होते यावेळी प्रमुख उपस्थिती ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प.किसन महाराज पवार, श्री ह भ प दिनकर महाराज मते,श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प दिनेशानंद महाराज काळे श्री ह भ प सुरेश महाराज जाधव यांच्यासह हजारो भावी भक्तांची उपस्थिती.

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या ८१ वा पुण्यतिथी उत्सवात श्रीमद् भागवत कथाव्यास स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या सुमधुर वाणीतून भागवत कथा सुरू आहे.

तिसऱ्या दिवशी कथा सांगताना, वराह भगवान अवतार कथा ,दक्षप्रजापती यज्ञ कथा प्रसंग,भगवान वीरभद्र अवतार कथा, ध्रुवबाळ कथा, भगवान वृषभदेव कथा, भरत राजा कथा सांगितली. त्यानंतर ध्रुव बाळाची कथा,ध्रुव संताकडे कडे गेल्यावर प्रश्न विचारले आपला उद्धार कशाने होईल, देव कशांने भेटेल संताकडे गेल्यावर उद्धारासाठी मागणी केली पाहिजे.पाच वर्षाच्या ध्रुवाणे मधुवनामध्ये घोर तपश्चर्या केली. त्यानंतर देव प्रसन्न झाले.ज्याचा सखा हरी त्यावर विश्व कृपा करी. ध्रुवा कडे मृत्यू आला तर डोक्यावर पाय ठेवून विमानात बसून चालले. ज्या कुळात हरी भक्त जन्मला येतात त्या ४२ कुळाचा उद्धार करतात. त्यामुळे एकदा तरी हरी भक्त कुळात जन्मला यायला हवा.. अस महाराज म्हणाले.यावेळी कथेमधील भजनामध्ये मंडपातील श्रोते मंत्रमुग्ध झाले. या कथेत हजारो भाविक भक्त उपस्थित होते..

## सर्व विभागांनी ३१ मे पूर्वी पावसाळा पूर्व तयारी पूर्ण करावी-जिल्हाधिकारी जॉन्सन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ मे**

सर्व विभागांनी त्यांच्या कक्षेत असलेल्या पावसाळापूर्व कामे ३१ मे पूर्वी पूर्ण करावीत तसेच येणाऱ्या पावसाळ्यात नागरिकांसाठी शासन यंत्रणेची सज्नता ठेवून पावसामुळे हानी होणार नाही याची खबरदारी घ्यावी असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज दिले.

येणाऱ्या पावसाळयापूर्वी सर्व विभागांनी करावयाच्या कामांचा आढावा जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत घेतला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने, अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी पूर्व तयारी बाबत माहिती दिली.

जनजागृती करा

पावसाळा सुरू होताना जिल्ह्यात अनेक ठिकाणी वीज पडण्याच्या घटना होतात. गावपातळीवर पडणाऱ्या विजेपासून बचाव करण्याच्या उपायांबाबत जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. पातळीवर ग्रामसभामधून याबाबत माहिती देणे तसेच गावा-गावात जनजागृती पर संदेश लावणे, भिंतीपत्रके या माध्यमातून लोकांना माहिती देता येईल असे ते म्हणाले.जिल्ह्यात ३०६ गावे नदी काठावर वसलेली आहेत तथापि गेवराई तालुक्यातील ३२, माजलगाव तालुक्यातील २६ आणि परळी वैद्यनाथ तालुक्यातील ५गावांना नदीच्या पुराचा धोका आहे. बीड शहरात देखील सन २००६ आणि सन २०१६ मध्ये पूरस्थिती निर्माण झाली होती.



## केंद्राच्या जातिनिहाय जनगणनेवर विश्वास नाही: भानुदास माळी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ मे**

केंद्र सरकारने जातिनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली असली तरी ही जणगणना करण्यासाठी २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली नसल्याने ही जनगणना होईल की नाही याचाबत शंका असल्याचे काँग्रेसच्या ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी यांनी आज (दि. ८) रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेत सांगितले.

या पत्रकार परिषदेस ओबीसी विभागाचे राष्ट्रीय समन्वयक राजेंद्र राख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, कांचनकुमार चाटे, नवनाथ बापु थोटे, प्रविणकुमार शेप, संभाजी जाधव, वसंत मुंडे, गणेश बजगुडे, परवेज कुरेशी आदींची उपस्थिती होती.

केंद्र सरकारने जातिनिहाय जनगणना करण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्याचे श्रेय काँग्रेसचे नेते खासदार राहुल गांधी यांना जाते. त्यांनीच जातिनिहाय जनगणना करण्याची मागणी लावून धरली होती. याबाबत राष्ट्रीय पातळीवर आंदोलन व जनजागृती केली होती. केंद्र सरकारने जातिनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली असली तरी या जातिनिहाय जनगणनेसाठी २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करावी लागणार आहे. ती केंद्र सरकारने केलेली नाही त्यामुळे केंद्रातील सरकार जातनिहाय गणना करणार की नाही ? आणि केली तर कुठल्या एजन्सीमार्फत करणार असा प्रश्न भानुदास माळी यांनी उपस्थित करून जातनिहाय गणनेसाठी ज्या राहुल गांधींनी लोकसभेत आक्रमक पावित्रा घेऊन सरकारला जातनिहाय गणना करण्यास भाग पाडले त्या काँग्रेस नेते खा.राहुल गांधी यांचा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभाग यांच्या वतीने येत्या जुन महिन्यात छत्रपती संभाजीनगर येथे ओबीसी मेळावा व खा.राहुल गांधी यांच्या नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.






जिल्हा परिषद बीड अंतर्गत आरोग्य सेवक ५० टक्के पुरूष उमेदवार यांची तात्काळ नियुक्ती मिळेपर्यंत जिल्हा परिषद बीड समोर आमरण उपोषण सुरू आहे. (छाया-कृष्णा शिंदे)

## बागपिपळगावात चोरट्यांनी शेतकऱ्याचे घर फोडुन ५० हजाराचा मुद्देमाल चोरून नेला

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.८ मे**



तालुक्यातील बागपिपळगाव येथील एका शेतकऱ्याचे अज्ञात चोरट्यांनी घर फोडुन सोन्याची पोत व नगदी ८ हजार असा ५० हजाराचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना बुधवार रोजी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास घडली.या प्रकरणी घटनेचा पोलीसांनी पंचनामा केला असुन या प्रकरणी उशिरा पर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता.

गणपत खरात राहणार बागपिपळगावं असे चोरी झालेल्या शेतकऱ्याचे नावं असुन ते बुधवार रोजी रात्री नेहमी प्रमाणे घरात झोपले असता बुधवार रोजी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास बाजुला असलेल्या दुसऱ्या खोलीचे अज्ञात चोरट्यांनी कुलुप तोडुन घरात प्रवेश करून घरातील लोखंडी पेटी चोरट्यांनी घेवुन गेले व बाजुला असलेल्या भिमराव लगड याच्या शेतात फोडुन पेटी मधील ४० हजाराची सोन्याची पोत व नगदी ८ हजार रूपये असा ५० हजार रूपयाचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला.हि घटना गुरूवार रोजी सकाळी घरातील लोक उठल्यावर लक्षात येताच लगेच पोलीसांना घटनेची माहिती दिल्या नंतर घटनेस्थळी बीट अमंलदार रामनाथ उगलमुगले यांनी घटनेचा पंचनामा केला असुन या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात उशिरा पर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता.या झालेल्या चोरीचा तपास पोलीसांनी तातडीने लावावा अशी मागणी शेतकरी कुटुंबाने केली आहे.

## शेतकऱ्यांनी सस्ती अदालतीचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.८ मे**

विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगरला भेट देणाऱ्या नागरिकांच्या बहुतांशी तक्रारी या शेतरस्ते, पाणंदरस्ते वरील अतिक्रमणाबाबत असल्याचे निदर्शनास आल्याने या विषयाबाबत बीड जिल्ह्यातील सर्व सबंधित नागरिकांशी थेट संवाद साधण्याकरिता वेबिनारचे आयोजन करण्यात येऊन संबंधित नागरिकांसोबत संवाद साधण्यात आला.

त्यामधील मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा सहभाग शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करून देण्याच्या अनुषंगाने मागणी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी मामलेदार मधील तरतुदी मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील तरतुदी आणि वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, परिपत्रके तसेच मंत्री, (महसूल) महाराष्ट्र राज्य यांनी शेत रस्त्यावर अवलंबित असलेली प्रकरणी एका महिन्यात निकाली काढण्याबाबत निर्देशाच्या अनुषंगाने तालुक्यातील शेतरस्ते,पाणंद अतिक्रमणाबाबत प्रभावी कार्यवाही करणे गरजेचे असल्याने.सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालय यांच्याकडील निर्देशानुसार जिल्ह्यातील तालुकास्तरावर वेळोवेळी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात तडजोड होऊन जलद गतीने प्रकरणाचा निपटारा व्हावा व सामान्य जनतेस न्याय मिळावा यासाठी वेळोवेळी लोक आदालतीचे आयोजन करण्यात येते.त्याच धरतीवर सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना पंधरा दिवसातून एकदा एका ठिकाणी तहसील कार्यालयात आणि मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी 'सस्ती अदालत'या नावाने बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यात 'सस्ती अदालत' हा उपक्रम राबविण्यासाठी महिन्यातील दुसरा व चौथा शुक्रवार या दिवशी राबविण्यात येणार आहे सबब शेतरस्ते,पांदण रस्तयाबाबत तक्रारी असलेल्या शेतक-यांनी या सस्ती अदालतीचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.

## 'जल जीवन'च्या कामासाठी उपसरपंचाचे उपोषण सुरू

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ मे**




माजलगाव तालुक्यातील ब्रह्मगाव येथे जल जीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम रखडल्यामुळे गावातील नागरिकांना पाण्यासाठी प्रचंड हाल सहन करावे लागत आहेत. या पार्श्वभूमीवर गावचे उपसरपंच अनिल कांबळे यांनी बुधवार (ता.७) पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

याबबात त्यांनी निवेदनात म्हटले आहे की, २२ डिसेंबर २०२३ रोजी या योजनेचे टेंडर झाले होते, परंतु दीड वर्ष उलटूनही प्रत्यक्ष काम सुरू झालेले नाही. गावात टँकरने पाणी आणण्याची वेळ येते आहे. महिला आणि वृद्धांना रोजच्या वापरासाठी पाण्यासाठी लांब अंतरावर चालावे लागते. उन्हाळ्यात ही परिस्थिती अधिकच बिकट झाली असून, पाण्यावाचून गावकऱ्यांचे हाल सुरू आहेत. यासंदर्भात ता. ११ एप्रिल रोजी जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले होते. मात्र, त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही. त्यामुळे वैतागलेल्या ग्रामस्थांच्या वतीने कांबळे यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला असून काम तत्काळ सुरू झाले नाही तर पुढील आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही कांबळे यांनी दिला आहे.

## धर्मवीर संभाजीराजे जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी पृथ्वीराज पंडित



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.८ मे**

गेवराई शहरातील छत्रपती संभाजीराजे मित्र मंडळच्या वतीने आज छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीची बैठक होऊन

धर्मवीर संभाजीराजे जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी गेवराई तालुक्याचे युवानेते पृथ्वीराज पंडित यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीला दीपक आतकरे,सतीश दाभाडे, विलास ठाकूर, दत्ता दाभाडे शिवनाथ परळकर,अक्षय कालवडे, सोमनाथ गांडुळे, शरद वादे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत कार्यकारिणी घोषित करण्यात आली. उपाध्यक्षपदी सतीश दाभाडे, विनोद सौदरमल, अवेज सेठ, सचिवपदी संदीप मडके, शिन बेद्रे,करण जाधव, सहसचिवपदी राहुल मोटे, किशोर वादे, कार्याध्यक्षपदी समाधान मस्के,महेश मोटे, सहकार्याध्यक्षपदी सोमनाथ गिरगे, बाबू गायकवाड, कार्यकारणी सदस्य म्हणून मुन्ना मोटे, मुकेश महाजन, शाम रुकर, सहकोषाध्यक्षपदी संतोष सुतार,मनोज हजारे, नविद्भाई मशायक, विजय तावस्कर, भागवत घोडके यांची निवड करण्यात आली. सर्व पदाधिकाऱ्यांचा छत्रपती संभाजीराजे मित्र मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आली.

## महाराष्ट्र कोटा पालक मित्र मंडळाच्या वतीने राजस्थानातील कोटा येथे फुले चित्रपट विचार उत्सव संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ मे**

सामाजिक क्रांतीचे जनक थोर समाज सुधारक राष्ट्रपिता महात्मा फुले व पहिल्या महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित फुले चित्रपट पाहण्यासाठी राजस्थानमधील कोटा येथील गोल्ड सिनेमा गृह, आकाश मॉल, एरोड्रम सर्कल येथे महाराष्ट्र कोटा पालक मित्र मंडळाच्या पालक मित्रांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले. याप्रसंगी न्यायाधीश रजनी ब्रिजेश,न्यायाधीश नरेंद्र आणि महाराष्ट्र मंडळाचे प्रमुख किशोर वाघ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र राजस्थान संवाद कार्यक्रमातून राष्ट्रपिता महात्मा फुले विचार प्रचार मित्र मंडळ राजस्थान महाराष्ट्र मंडळाची स्थापना करण्यात आली.



या कार्यक्रमाची विशेष बाब म्हणजे ज्योतिबा आणि सावित्रीबाई यांच्या भूमिकांमध्ये महाराष्ट्र माळी समाज अधिकारी-कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष श्री. नरेंद्र वानखडे आणि सौ. रेखाताई वानखडे (खामगाव, बुलढाणा) यांच्या वेशभूषेने सर्व राजस्थानी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

या प्रसंगी सत्र न्यायाधीश रजनी ब्रिजेश, न्यायाधीश नरेंद्रसिंह, महाराष्ट्र पालक मित्र मंडळ कोटा प्रमुख किशोर वाघ, गोल्ड सिनेमा येथील भंवरसिंह जादौन, नरेंद्र सैनी आणि महाराष्ट्र मंडळाचे सदस्य सुरेश झरेकर

महेश राजपूत, श्रीमती सावित्रीबाई धनवे,विलास खंदारे, संतोष घानखेडे,नरेंद्र वानखडे,रेखा वानखडे, किशोर वाघ,गणेश सुरुशे, नितीन मेरत,दीपक शिंदे,संजय टकाळे,उमेश चिपडे,वसंत मिरगे,सुलोचना मिरगे,नम्रता साबू , विष्णू लहासे ,सुशील ढाकणे , पवन कामड व स्थानिक कोटा रहिवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपा युवा नेते अक्षय मुंदडांच्या वाढदिवसानिमित्त अंबाजोगाईत १३ मे रोजी चला हवा येऊ द्या, मराठी पाऊल पढते पुढे कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ मे**

भारतीय जनता पार्टीचे युवा नेते अक्षय मुंदडा यांचा १३ मे रोजी वाढदिवस असुन त्या निमित्ताने अंबाजोगाई शहरात भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये चला हवा येऊ द्या आणि मराठी पाऊल पढते पुढे याचा समावेश असुन शहर तथा पंचक्रोशीतील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन पक्षाचे शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी केले. दरम्यान कार्यक्रमाच्या पुर्व तयारीसाठी अक्षय बंगल्यावर कार्यकर्त्यांची बैठक होवुन विविध समित्या वाटप करण्यात आल्या.

हा भव्य कार्यक्रम शहरातील मध्यभागी असलेल्या सेंट अँन्थोनी स्कुलच्या मैदानावर घेतला जात असुन व्यवस्थेतील प्रमुख पदाधिकार्यांनी त्या दृष्टीने मैदानाची काल पहाणी करत रचना केली आहे. युवा नेते अक्षय मुंदडा यांचा वाढदिवस तसं पहाता मोठ्या प्रमाणात साजरा करणे त्यांना स्वत:च मान्य नसते. मात्र कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव यंदा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरवल्याचे गंभीरे यांनी सांगितले. चला हवा येऊ द्या हा कार्यक्रम विनोदी म्हणुन ओळखल्या जातो. ज्यामध्ये निलेश साबळे, भाऊ कदम, सागर करांडे, कुशाल बद्रिके, भारत गणेशपुरे, श्रेया बुगडे आदींचा समावेश आहे. मागच्या दहा वर्षापासुन कार्यक्रम खर्या अर्थाने महाराष्ट्राच्या घराघरात जावुन पोहोचलेला असुन तो पहाण्यासाठी लोकांची गर्दी देखील मोठ्या प्रमाणावर वाढते. झी मराठीच्या चॅनेलवर मोठ्या प्रमाणावर रसिक कार्यक्रम पहातात. विनोदाची जुगलबंदी, मराठी गाण्यातुन विनोदी विडंबन, वेगवेगळ्या वेशभुषेत कलाकारांची तुफान कॉमेडी याचे आकर्षण रसिकांना असते. थुकरटवाडी हा त्यांचा विशेष कार्यक्रम गाजला असुन महाराष्ट्राच्या कानाकोपर्यात त्यांचे दौरे असतात. दरम्यान याच दिवशी मराठी पाऊल पढते पुढे बहारदार गीतांचा कार्यक्रम देखील होणार असल्याचेही संयोजकांनी सांगितले. या कार्यक्रमाची शहरात



जय्यत तयारी सुरु झाली. प्रमुख कार्यकर्त्यांची एक बैठक जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षय बंगल्यावर काल पार पडली. त्या बैठकीत कार्यक्रमाची रूपरेषा विविध जबाबदार्या त्यासाठी समित्यांची रचना करून प्रमुख पदाधिकार्यांना वाटप करण्यात आल्या. शहरात सेंट अँन्थोनी शाळेचे भव्य मैदान असुन किमान सहा हजार रसिक बसण्याची व्यवस्था अद्ययावत व्यासपीठ असणार आहे. सांस्कृतिक वारसा तथा साहित्य रसिकांचे माहेरघर म्हणुन ओळखल्या जाणार्या शहरात चला हवा येऊ द्या आणि मराठी पाऊल पढते पुढे दोन भव्य कार्यक्रम होणार असल्याने रसिकांच्या मनात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. सद्या तरी कार्यक्रमाची शहरात जोरदार तयारी सुरू असल्याचे लक्षात येते. या मतदारसंघाच्या आ.सौ.नमिताताई मुंदडा यांच्या माध्यमातुन विकासाची गंगोत्री शहरात आणि मतदारसंघात घेवुन येण्यासाठी शासकिय पातळीवर पाठपुरावा करण्यात स्वतः अक्षय मुंदडांचा सिंहाचा वाटा असुन त्यांच्या नेतृत्वाखाली शहर विकासात आमुलाग्र बदल झाल्याचे लक्षात येत आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच शहराच्या कानाकोपर्यातील रस्ते दर्जेदार सुमार झाल्याने सर्वत्र लोकांच्या मनातुन मुंदडा कुटुंबियांच्या बाबतीत कौतुकाचा वर्षाव होताना दिसतो. या कार्यक्रमाचा जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन संजय गंभीरे यांनी केले.

### मार्क मेमो हरवला आहे

नामे प्रशांत रमेश चव्हाण यांचा वर्ग Bsc Agri पदवीचा मार्क मेमो माजलगाव बस स्थानकातून हरवला आहे.

सापडल्या संपर्क साधावा
संपर्क
प्रशांत रमेश चव्हाण
९४०४५४९१४७